लिओ टॉलस्टॉय

कबुलीजबाब



भाषांतर : गोपाळ आजगांवकर

आदरणीय लिओ टॉलस्टॉय,

सादर प्रणाम.

...आपण लिहिलेले 'कन्फेशन्स' हे छोटेसे आत्मकथन वाचल्यावर मी स्तिमित झालो. अलीकडेच मी 'कन्फेशन्स' पुन्हा दोन वेळा वाचले आणि त्यात आपल्या मनाची जी स्पंदने मला ऐकू आली, त्यांच्यामुळे मीही अंतर्मुख झालो...

आपले कौटुंबिक जीवन सुखी-समाधानी होते. आपल्या पत्नीचे आपल्यावर उत्कट प्रेम होतेच आणि आपल्या साहित्याबद्दलही त्यांना विलक्षण आस्था होती. आपली पत्नी आणि मुले यांच्यामुळे घरात आनंदी, खेळकर वातावरण होते. आपल्याकडे असलेल्या जमीन-जुमल्यामुळे प्रपंच चालण्यात कसलीच अडचण नव्हती; इतकेच नव्हे, तर आपण वैभवशाली जीवनच जगत होता. सारी सुखे आपल्या दाराशी जणू हात जोडून उभी होती आणि एक दिवस संध्याकाळ उलटल्यावर जिना चढताना आपण थांबलात आणि वर उभ्या असलेल्या आपल्या पत्नीला म्हणालात, "मी वाट चुकलो असे मला वाटते."... परंतु नंतर काही दिवस आपण नेहमीप्रमाणे उत्साहाने जगण्याऐवजी विमनस्क अवस्थेत शून्यात पाहात असायचे. आपल्याला आपल्या जीवनाचा रस्ता चुकला, असे वाटू लागले होते. आपण लिहिले आहे, की सगळी सुखे मिळत होती, आणि तरीही आपण स्वत:ला विचारीत होतात- "सो व्हॉट?" सुखे मिळाली; पण त्यांचे प्रयोजन काय? पुढे काय? सारे काही अर्थशून्य आहे, असे आपल्याला वाटू लागले. अशा मन:स्थितीत आपण 'कन्फेशन्स' लिहिले आहे. विद्यापीठात शिकत असताना, आणि नंतर सैन्यात नोकरी करीत असताना, ख्यालीखुशालीत जगत असताना आपल्या हातून जे प्रकार घडले त्याची या पुस्तकात आपण प्रांजळपणे कबुली दिली आहे.

- ग. प्र. प्रधान

टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद या पुस्तकातून साभार

किंमत : १०० रुपये

ISBN 81-88284-87-4

कबुलीजबाब

लिओ टॉलस्टॉय

भाषांतर
गोपाळ आजगांवकर

लोकवाङ्मय गृह

कबुलीजबाब / लिओ टॉलस्टॉय
भाषांतर : गोपाळ आजगांवकर
Kabulijabab / Translated by Gopal Aajgaonkar

म/९७१

पहिली आवृत्ती ⊙ : जानेवारी २००७

मूल्य : १०० रुपये

ISBN 81-88284-87-4

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई-४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई-४०० ०२५

प्रास्ताविक

लिओ टॉलस्टॉय (१८२८-१९१०) या रशियन लेखकाला जागतिक साहित्यविश्वात श्रेष्ठ स्थान आहे. त्याच्या 'वॉर अॅण्ड पीस', 'अॅना कॅरेनिना', 'रिसरेक्शन' या कादंबऱ्यांना सार्वकालिक सर्वश्रेष्ठत्वाचा मान दिला जातो. त्याने 'क्रुईट्झर सोनाटा', 'इव्हान इलॅनविचचा मृत्यू', 'दोन शिलेदार', 'सुखी वैवाहिक जीवन' यांसारख्या श्रेष्ठ दीर्घकथा लिहिल्या. अनेक नाटकं लिहिली. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्याने अर्धशतकाहून अधिक काळ साहित्यनिर्मिती केली.

अशा साहित्यिक टॉलस्टॉयचं दुसरं रूप आहे ते धार्मिक सुधारकाचं आणि नैतिक प्रवक्त्याचं. आयुष्याच्या मध्यावर आल्यावर टॉलस्टॉय अस्वस्थ झाला. आयुष्यात त्याला अर्थ वाटेना. खरं तर या वेळेपावेतो त्याच्या साहित्यिक गुणांचा परमोत्कर्ष झाला होता. त्याच्या 'वॉर अॅण्ड पीस' (१८६९), 'अॅना कॅरेनिना' (१८७७) या कादंबऱ्या जगभर गाजत होत्या. त्याचं कौटुंबिक आयुष्य सुखाचं होतं. तो उमराव होता. त्याच्याजवळ साडेसोळा हजार एकर जमीन होती. पण आपण जगत आहोत कशासाठी हा प्रश्न त्याला पडला. या प्रश्नाचा त्याने सर्व अंगांनी वेध घेतला. अत्यंत कुशाग्र बुद्धी, तीव्र संवेदनशीलता, सर्व गोष्टी समग्रतेने पाहण्याची वृत्ती या गुणांनी त्याला साहित्यात यश दिलं होतं. तेच गुण त्याला या नैतिकतेच्या प्रश्नाच्या शोधात उपयोगी पडले.

आपल्या नैतिक प्रेरणा टॉलस्टॉयनं धर्मात शोधल्या. पण तो धर्म त्याने शुद्ध स्वरूपातच पाहिला. या त्याच्या शोधाचं अत्यंत प्रत्ययकारी वर्णन 'कन्फेशन'मध्ये येतं.

आजच्या काळात धर्माला जे महत्त्व आहे त्याहून कितीतरी पटींनी अधिक महत्त्व त्या शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या काळात धर्माला होतं. धर्म माणसाच्या जीवनात, अगदी रोजच्या आयुष्यात, पदोपदी आणि क्षणोक्षणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होता. त्यामुळे जेव्हा टॉलस्टॉयने धर्माची चिकित्सा करायला सुरुवात केली तेव्हा सर्व धर्ममार्तंड खवळून उठले. तथाकथित धर्माला खऱ्या धार्मिकतेची म्हणजेच नैतिकेतेची चाड नसते असं टॉलस्टॉय दाखवत होता आणि ते धर्माच्या ठेकेदारांना पसंत पडणं शक्य नव्हतं. त्यामुळे टॉलस्टॉयला धर्मबहिष्कृत करण्यात आलं. अर्थात त्या अगोदरच टॉलस्टॉयने चर्चबरोबरचे तसंच ऑर्थोडॉक्सीबरोबरचे संबंध तोडले होते.

युरोपातील त्या वेळच्या बुद्धिवाद्यांची प्रतिक्रियाही टॉलस्टॉयच्या विरोधी होती. ते बुद्धिवादी धर्माला कालबाह्य समजत होते तर टॉलस्टॉयला नैतिकतेची प्रेरणा देणारा आणि जगण्यास अर्थ देणारा या दृष्टीने धर्म ही फार महत्त्वाची गोष्ट वाटत होती.

टॉलस्टॉयच्या कुटुंबीयांची या आणि यापुढच्या अशा पुस्तकांबाबतची प्रतिक्रिया फार प्रतिकूल होती. टॉलस्टॉयचे आपल्या बायकोशी मतभेद या पुस्तकामुळे तीव्र झाले. त्याची जिवलग मैत्रीण या पुस्तकामुळे दुखावली गेली. तसंच आपल्या नातलगांचाही रोष त्याला ओढवून घ्यावा लागला.

मात्र अशा पूर्ण प्रतिकूल वातावरणातही आपलं धर्मचिकित्सेचं काम टॉलस्टॉयने थांबवलं नाही. 'कन्फेशन' १८७९ मध्ये पूर्ण झालं. १८८२ मध्ये 'अ युनियन ॲण्ड ट्रान्सलेशन ऑफ फोर गॉस्पेल्स' पूर्ण झालं. त्यानंतर 'व्हॉट आय बिलीव्ह' (१८८४) आलं. 'व्हॉट वुई मस्ट डू' १८८६ मध्ये आलं. त्यानंतर 'ऑन लाईफ' १८८७ मध्ये तर 'किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' १८९२ मध्ये आलं. १८९३ मध्ये 'ख्रिश्चॅनिटी ॲण्ड पॅट्रिऑटिझम', १८९६ मध्ये 'हाऊ टू रीड गॉस्पेल्स्', १८९८ मध्ये 'व्हॉट इज आर्ट', अशी पुस्तकांमागून पुस्तकं टॉलस्टॉयने लिहिली. १९०१ साली चर्चच्या धर्ममार्तंडांनी त्याला धर्मबहिष्कृत (एक्सकम्युनिकेट) केलं. त्याला त्याने एका निबंधाद्वारे उत्तर दिलं. नंतर १९०२ साली त्याने 'व्हॉट इज रिलिजन' हे पुस्तक लिहिलं. १९०८ साली त्याचं 'आय कॅन नॉट बी सायलंट' हे पुस्तक आलं. अशा प्रकारे आयुष्याच्या अखेरपर्यंत टॉलस्टॉय आपल्या नैतिकतेचं क्षितिज अधिकाधिक विस्तारत राहिला. त्याच्या या नैतिक पुनरुत्थानाचं पहिलं सुस्पष्ट दर्शन या 'कन्फेशन'मध्ये होतं.

जगभरच्या विद्वानांना टॉलस्टॉयच्या या पुस्तकांनी प्रेरणा दिली. महात्मा गांधींवरही टॉलस्टॉयचा मोठा प्रभाव होता. त्यांनी टॉलस्टॉयला 'महर्षी टॉलस्टॉय' म्हटलं आहे. आपल्या दक्षिण आफ्रिकेतील आश्रमाला त्यांनी 'टॉलस्टॉय फार्म' हे नाव दिलं होतं.

१९२८ साली लिहिलेल्या एका लेखात गांधीजी म्हणतात, 'दिवंगत राजचंद्र यांच्यानंतर ज्यांनी माझ्या जीवनावर सखोल असा आध्यात्मिक प्रभाव टाकला त्या तीन आधुनिक विचारवंतांपैकी टॉलस्टॉय दुसरे आहेत तर रस्किन तिसरे आहेत. चाळीस वर्षांपूर्वी नास्तिक्यवाद आणि संशय यामुळे निर्माण झालेल्या एका घोर पेचप्रसंगातून जात असताना 'द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' हे पुस्तक वाचावयास मिळालं आणि त्यामुळे मी फार प्रभावित झालो. त्या काळी माझा हिंसेवर विश्वास होता. हे पुस्तक वाचून माझा नास्तिक्यवाद संपुष्टात आला आणि माझी अहिंसेवरची श्रद्धा दृढ झाली.' गांधीजी पुढे म्हणतात, 'टॉलस्टॉय हे आपल्या काळातील सर्वात सत्यवादी पुरुष होते. या युगाने निर्माण केलेले सर्वात महान असे अहिंसेचे प्रेषित होते. पाश्चिमात्य जगात त्यांच्यापूर्वी आणि त्यांच्यानंतर कोणीही अहिंसेविषयी इतक्या पूर्णत्वाने, ठामपणे आणि एवढा सखोल विचार करून इतक्या अंतर्दृष्टीने बोललेलं नाही की लिहिलेलं नाही.'

एक निबंध म्हणून हा प्रदीर्घ निबंध अगदी नमुनेदार आहे. यात टॉलस्टॉयच्या मानसिक खळबळीचं प्रत्ययकारी दर्शन आहे तसंच त्याचं बौद्धिक सामर्थ्यही त्यातून प्रतीत होतं. श्रद्धेचा जो नवा अर्थ त्याने लावलेला आहे तो तर अभूतपूर्व असाच आहे.

आजच्या काळात या 'कन्फेशनला' फार मोठा अर्थ आहे. आपल्या बहुधार्मिक भारतात प्रत्येक धर्म आज अधिकाधिक आक्रमक, उन्मादी आणि असहिष्णू बनत आहे. खरी धार्मिकता ही प्रेमावर, करुणेवर, क्षमाशीलतेवर आधारित असते याचा जणू सर्वांना विसर पडलेला आहे. अशा वेळी टॉलस्टॉयच्या या निबंधाचे महत्त्व वादातीत आहे.

हे भाषांतर एल्मर मॉड (Aylmor Maude) यांच्या १९३० साली प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी भाषांतरावरून केलेलं आहे.

महात्मा गांधींच्या आत्मकथेचे 'सत्याचे प्रयोग' या नावाने मराठीत भाषांतर करणाऱ्या आप्पा पटवर्धनांना हे भाषांतर मी विनम्र भावाने अर्पण करीत आहे.

गोपाळ आजगांवकर

१

खिश्चन ऑर्थोडॉक्स चर्चची धर्मश्रद्धा बाळगणाऱ्या घरात माझा जन्म आणि बाप्तिस्मा झाला. अगदी लहानपणापासून या धर्मश्रद्धेचे माझ्यावर संस्कार करण्यात आले. पण वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत, म्हणजे जेव्हा मी विद्यापीठाचं दुसरं सत्र पूर्ण केलं, तेव्हा या धर्मश्रद्धेनुसार करावयाच्या सर्व गोष्टी मला निरर्थक वाटू लागल्या होत्या.

मला काही प्रसंग आठवतात. त्यावरून लक्षात येतं की खरं तर धर्मातील कर्मकांडावर माझा कधीच मनापासून विश्वास नव्हता. पण मला ज्यांची संथा दिली होती आणि ज्या गोष्टी माझ्या आजूबाजूची वडीलधारी मंडळी करत होती त्या गोष्टी मी करत होतो. अशाप्रकारे याबाबतीत माझी मन:स्थिती डळमळीत होती.

काही गोष्टी माझ्या चांगल्या लक्षात राहिलेल्या आहेत. तेव्हा मी पुरता अठरा वर्षांचाही नव्हतो. व्लादिमिर मिल्युटिन नावाचा ग्रामर शाळेत शिकणारा एक मुलगा (तो केव्हाच वारलाय) एका रविवारी आमच्याकडे आला. त्याच्या शाळेमध्ये लागलेला एक नवीन शोध त्याने जाहीर केला. तो शोध म्हणजे : देव नाहीच आहे आणि आम्हाला आतापर्यंत देवाबद्दल जे काही सांगितलं गेलंय ते सगळं केवळ कल्पनाविलास आहे. ही गोष्ट १८३८ मधली आहे. माझ्या वडीलभावांना या शोधाबद्दल फारच कुतूहल वाटलं. त्यांनी मला बोलावलं. आम्ही चर्चा वगैरे केल्या. आम्हाला काहीतरी थरारक असं वाटत होतं. आमच्या लेखी ही गोष्ट फार महत्त्वाची होती. देव नाही असं असू शकेलही, आम्हाला वाटलं होतं.

आणखी एक आठवण. माझा वडीलभाऊ दिमित्री तेव्हा विद्यापीठात होता.

श्रद्धा आहे. भावाच्या शब्दांनी त्याला उमजून चुकलं की काहीतरी शब्द प्रार्थना म्हणून पुटपुटणं, हातांनी क्रॉसचं चिन्ह करणं, गुडघे टेकणं या सर्व पूर्णपणे निरर्थक गोष्टी आहेत. आणि एकदा या गोष्टी निरर्थक आहेत हे कळल्यावर त्या करत राहणं त्याला अशक्य झालं.

मला वाटतं बहुतेक माणसांचं असंच होत असतं. आमच्या सुशिक्षित वर्गातील प्रामाणिक माणसांबद्दल मी हे बोलतोय. जे लोक धार्मिक श्रद्धेचा धंदा करतात आणि त्यावर आपल्या तुंबड्या भरतात, अशांबद्दल नाही. असे लोक हे शंभर नंबरी अश्रद्ध लोक असतात. कारण धर्मश्रद्धा ही त्यांच्यासाठी पृथ्वीवरचे सुखविलास भोगण्याचं साधन असते आणि मग ती धर्मश्रद्धा ही खरी धर्मश्रद्धाच उरत नाही. आमच्यामधल्या सुशिक्षित आणि प्रामाणिक माणसांसाठी ज्ञान आणि अनुभवाचा पाऊस पडताच धर्मश्रद्धेची कृत्रिम भिंत ढासळू लागते. काहींना याची जाणीव होते आणि ते मग धर्मश्रद्धा मनातून काढून टाकतात. ज्या थोड्यांना ही जाणीव होत नाही ते बाह्य अवडंबर चालू ठेवतात.

लहानपणापासून मला शिकवण्यात आलेली धार्मिक शिकवण आणि श्रद्धा माझ्या मनातून इतरांप्रमाणेच पुसून गेली. पण एक फरक मात्र होता. वयाच्या पंधराव्या वर्षापासून मी तत्त्वज्ञानावरची पुस्तकं वाचू लागलो होतो. त्यामुळे अगदी जाणीवपूर्वक मी धार्मिक शिकवणुकीला फाटा दिला. सोळाव्या वर्षापासून मी प्रार्थना म्हणणं, चर्चला जाणं, उपास करणं अशा गोष्टी समजून-उमजून बंद केल्या. लहानपणापासून मला जे शिकवण्यात आलं होतं, त्यावरचा माझा विश्वास उडाला होता. माझा विश्वास, माझी श्रद्धा कशावर तरी होती. पण ते काय आहे हे मला त्या वेळी अजिबात सांगता आलं नसतं. माझा देवावर विश्वास होता किंवा जास्त काटेकोरपणे सांगायचं तर देवाचं अस्तित्व मी नाकारलेलं नव्हतं. पण 'देव' काय आहे, त्याची नक्की संकल्पना काय आहे हे मला सांगता आलं नसतं. तसंच मी येशू ख्रिस्त किंवा त्याची शिकवण नाकारली नव्हती. पण त्या शिकवणीचं नक्की कोणतं रूप मला भावतं हेही मला सांगता आलं नसतं.

आता त्या भूतकाळाकडे पुन्हा पाहताना माझ्या असं स्पष्टपणे लक्षात येतं की माझी श्रद्धा—माझी एकमेव, खरीखुरी श्रद्धा—मी परिपूर्ण माणूस बनावं ही होती. या श्रद्धेने (आणि माझ्या नैसर्गिक प्रेरणांनी) माझ्या आयुष्याला दिशा दिली. पण परिपूर्णता म्हणजे काय, ती कशासाठी आणावी याची उत्तरं

तेव्हा मला माहीत नव्हती. मी मानसिकदृष्ट्या परिपूर्ण बनण्याचा प्रयत्न केला. शक्य होईल तेवढ्या विषयांचा अभ्यास केला. जीवनाने माझ्यासमोर जे जे म्हणून काही उभं केलं ते ते नीट जाणून घेतलं, समजून-उमजून घेतलं. माझी इच्छाशक्ती परिपूर्ण निर्दोष बनावी म्हणून मी नियम बनवले आणि ते पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केला. शारीरिक दृष्ट्या परिपूर्ण बनावं म्हणून मी तऱ्हेतऱ्हेचे व्यायाम केले. शक्ती वाढवली. चपळाई वाढवली. सहनशक्ती आणि संयम वाढावा म्हणून उपासतापास केले. शरीराला निरनिराळे कष्ट दिले. आणि हे सर्व परिपूर्ण बनावं या प्रयत्नातून झालं. पण लवकरच त्याचं पर्यवसान एकूणच परिपूर्णता आणण्याच्या प्रयत्नात झालं. आणि हळूहळू आपण आपल्या किंवा देवाच्या दृष्टीने निर्दोष परिपूर्ण बनावं, याऐवजी, आपण इतरांच्या दृष्टीने साऱ्यांपेक्षा श्रेष्ठ बनावं या इच्छेत झालं. आणि त्यानंतर लवकरच हा प्रयत्न आपण इतरांपेक्षा जास्त सामर्थ्यवान बनावं या दृष्टीने सुरू झाला. इतरांपेक्षा जास्त सामर्थ्यवान, जास्त नावलौकिक कमावलेला, जास्त महत्त्व असलेला, जास्त श्रीमंत...

□

२

तारुण्याच्या त्या दहा वर्षांचा इतिहास हृदयस्पर्शी आणि बोधपर आहे. केव्हातरी तो मी सांगेन. मला वाटतं बहुतेक जणांना असेच अनुभव येत असणार. खोल आतमध्ये—माझ्या अंतरात्म्यामध्ये—चांगला माणूस बनण्याची असोशी होती. पण मी तरुण होतो, विकारवश होतो. जेव्हा माझ्यामध्ये सद्भावना जाग्या होत असत तेव्हा मी एकटा, अगदी पूर्ण एकटा असे. जेव्हा जेव्हा मी नैतिक जीवन जगण्याची इच्छा बोलून दाखवत असे तेव्हा तेव्हा मला सगळे खुळ्यात काढत. माझा उपहास करत. पण उलट जेव्हा मी विकारांच्या आधीन होऊन बिनधास्त मौजमजा करी तेव्हा माझं कौतुक होत असे आणि माझ्या पाठीवर थाप पडत असे.

महत्त्वाकांक्षा, सत्तेबद्दल प्रेम, दुसऱ्याची मालमत्ता हवीहवीशी वाटणं, गर्विष्ठपणा, क्रोध, सूडबुद्धी—हे गुण मी उधळले की सगळेजण माझ्याकडे आदराने पाहत.

या सर्व गोष्टी करत करत मी मोठ्या माणसांसारखा झालो. माझ्या लक्षात आलं की माझ्या वागण्याला त्यांची संमती आहे. मी तेव्हा माझ्या आतेकडे राहत होतो. ती अगदी दयाळू आणि सात्त्विक बाई होती. पण ती नेहमी मला म्हणायची की कुणातरी विवाहित बाईशी संबंध ठेव. तिची ती सर्वात मोठी इच्छा होती. ती सांगायची, "तरुण माणसाला घडवणारी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या घरंदाज बाईशी व्यभिचार करणं." मी सुखी व्हावं म्हणून तिची दुसरी एक इच्छा होती. ती म्हणजे मी ए-डी-कॅम्प बनावं आणि जमलं तर अगदी झारचा ए-डी-कॅम्प बनावं. पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मी एखाद्या अत्यंत श्रीमंत मुलीशी लग्न करावं आणि जास्तीत जास्त

भूदास पदरी बाळगावेत. माझ्या सुखाबद्दल ही तिची सर्वोच्च आकांक्षा होती.

त्या वर्षांबाबत मी जेव्हा विचार करतो तेव्हा माझं मन घृणेने भरून जातं. छातीत कळ येते. मी युद्धात माणसं ठार मारली. ठार मारण्यासाठी द्वंद्वयुद्धांची आव्हानं दिली. जुगार खेळलो, हरलो. शेतकऱ्यांच्या कष्टावर मौजमजा केली आणि शेतकऱ्यांना शिक्षा ठोठावल्या. एकूण आयुष्य रंगेलपणात आणि ख्यालीखुशालीत घालवलं. लोकांची फसवणूक केली. खोटारडेपणा, चोरीमारी, तऱ्हेतऱ्हेचे व्यभिचार, दारूबाजी, हिंसकपणा, खून... असा एकही गुन्हा नाही, जो मी केलेला नाही. आणि नेमकं याच्यासाठीच लोक माझं कौतुक करायचे. इतकंच काय, माझे समवयस्क मला त्यातल्या त्यात नैतिक माणूस समजत आणि अजूनही समजतात.

अशी मी दहा वर्षं घालवली.

त्याच सुमारास मी लिहायला सुरुवात केली.

पोकळपणा, दुसऱ्याला जे मिळालं ते मला मिळालंच पाहिजे असा हव्यास आणि 'मीही कुणीतरी आहे' ही जाणीव या भावना या लेखनाच्या मुळाशी होत्या. माझ्या आयुष्यात जे मी केलं तेच मी लेखनातही केलं. पैशासाठी आणि प्रसिद्धीसाठी मी लिहीत होतो. त्यामुळे जे सत् आहे, जे मंगल आहे ते दडवणं आणि असत् आणि अमंगलाचा आविष्कार करणं आवश्यक होतं. मी तसंच केलं. कितीतरी वेळा माझ्या लिखाणात तटस्थपणाच्या बुरख्याखाली जो चांगुलपणाचा, सत्शीलपणाचा प्रवाह होता तो दडपून टाकण्याचा प्रयत्न मी केला. कित्येक वेळा तर त्याची खिल्ली उडवली. यात मी यशस्वी झालो. मला मानसन्मान मिळाले. खरं तर याच सत्शीलपणाच्या उर्मीने माझ्या आयुष्याला अर्थ दिला होता. लिखाणात मात्र मी ती उर्मी दडपून टाकत होतो.

युद्धसमाप्तीनंतर, म्हणजे वयाच्या सव्वीसाव्या वर्षी मी पीट्सबर्गला परतलो. तिथे मी लेखकांना भेटलो. लेखक म्हणून त्यांनी मला आपल्यात सामावून घेतलं. माझ्या लेखनाचं कौतुक केलं. लवकरच जगाचा अनुभव न घेता मी त्या लेखकांची जीवनविषयक भूमिका आत्मसात केली. त्या भूमिकेने माझ्या पूर्वीच्या चांगल्या, परिपूर्ण, नैतिक माणूस होण्याच्या प्रयत्नाला पूर्ण खीळ बसली. त्या लेखकांची जीवनविषयक भूमिका एका धारणेवर आधारित होती. त्या धारणेमुळे माझ्या आयुष्यातील दुराचाराला समर्थन मिळत होतं.

माझ्या लेखकमित्रांची जीवनविषयक भूमिका अशी होती की सर्वसाधारणपणे माणसाचं आयुष्य विकसित होत जातं आणि या विकासात आम्हां लोकांचा—म्हणजे विचारवंतांचा—महत्त्वाचा वाटा असतो. अशा विचारवंतांमध्ये आम्ही, म्हणजे कलावंत आणि कवी, अत्यंत महत्त्वाची भूमिका करत असतो. आमचं काम मानवजातीला शिकवण्याचं आहे. खरं तर असं सहजपणे विचारता येईल की मी काय जाणतो आणि मी काय शिकवू शकतो? पण या भूमिकेनुसार हे असलं काही माहीत असण्याची जरुरी नाही. कारण कलावंत आणि कवी अजाणता शिकवतात. मी एक नव्याने उदयाला येणारा कवी आणि कलावंत मानला जात होतो. त्यामुळे साहजिकच मी ही भूमिका स्वीकारली. मी एक कलावंत आणि कवी म्हणून लिहीत होतो आणि शिकवत होतो. काय शिकवत होतो हे माझं मलाच माहीत नव्हतं. पण असं लिहिण्याचे (आणि मानवजातीला शहाणं करण्याचे) मला पैसे मिळत होते. मेजवान्या, ऐषआराम, थोरामोठ्यांचा सहवास आणि बायका मिळत होत्या. समाजात मला मानसन्मान होता. याचाच अर्थ, जे काय मी शिकवीत होतो ते चांगलं होतं.

काव्याचा अर्थ आणि आयुष्याचा विकास यांच्यावरची श्रद्धा हा एक धर्म होता. त्या धर्माचा मी एक प्रवक्ता होतो. असा प्रवक्ता होणं हे सुखदायी आणि फलदायी होतं. आणि मी या श्रद्धेला काही खरा अर्थ आहे का, अशी कोणतीही शंका मनात बराच काळ येऊ दिली नाही. पण दुसऱ्या आणि विशेषत: तिसऱ्या वर्षी माझ्या मनात या ठाम गृहीतकाविषयी प्रश्न उभे राहू लागले. मला दिसू लागलं की त्या धर्माच्या या सगळ्या प्रवक्त्यांमध्ये एकमत नाहीये. काहीजण म्हणायचे, आम्हीच सगळ्यात श्रेष्ठ प्रबोधनकार आहोत. आम्ही जे शिकवतो तेच सगळ्यात उपयुक्त आणि शहाणपणाचं आहे. आणि बाकीचे जे शिकवतात ते साफ चुकीचं आहे. दुसरे म्हणायचे, तुमचंच साफ चूक आहे. आम्हीच खरे गुरुजन आहोत. असे सगळे आपापसात वादविवाद करायचे, भांडायचे, शिव्याशाप द्यायचे, कागाळ्या-लावालाव्या करायचे, एकमेकांना फसवायचे. आमच्यामध्ये असेही काही होते की त्यांना कोण बरोबर कोण चूक याची काही फिकीर नव्हती. आमच्या असल्या गोष्टींमधून आपला काय फायदा होतो याकडे त्यांचं लक्ष असायचं. या साऱ्या प्रकारामुळे लेखकांच्या तथाकथित धर्माबद्दल माझ्या मनात अविश्वास निर्माण झाला.

त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे एकदा का असे लेखकांच्या धर्माबद्दल डोळे उघडल्यानंतर मी त्याच्या प्रवक्त्यांचं, म्हणजे लेखकांचं वर्तन बारकाईने पाहू

लागलो. त्या धर्माचे प्रवक्ते असलेले सारेच्या सारे लेखक नीतीअनीतीची चाड नसलेले होते. बहुतेकजण तर दुर्गुणी आणि चारित्र्यहीन होते. माझ्या पूर्वीच्या सैनिकी पेशातल्या रंगेल आयुष्यात मला भेटलेल्या लोकांपेक्षाही ही लेखकमंडळी क्षुद्र होती. पण एक फरक होता. या लेखकमंडळींची आत्मतुष्टता आणि आत्मविश्वास अभेद्य होता. जसा एखाद्या पूर्ण सात्त्विक माणसाचा किंवा ज्याला सात्त्विकता माहीतच नाही अशा माणसाचा असतो, तसा.

मला जेव्हा हा धडधडीत खोटेपणा कळला तेव्हा मी तो नाकारला. पण विचित्र गोष्ट म्हणजे, या लेखकमंडळींनी मला दिलेला दर्जा काही मी सोडला नाही. तो दर्जा म्हणजे कलावंत, कवी आणि शिक्षक. मी बाळबोधपणे स्वत:ला कलावंत आणि कवी मानत राहिलो आणि असं समजत राहिलो की, आपण काय शिकवत आहोत हे कळल्याशिवाय मी लोकांना शिकवू शकेन. आणि असा मी 'कवी आणि कलावंत' लोकांना शिकवत राहिलो.

· या लेखकमंडळींशी झालेल्या जवळिकीमुळे माझ्यामध्ये एक नवीन दुर्गुण शिरला. तो म्हणजे बेफाट वाढलेला अहंकार आणि वेडसर खात्री की लोकांना शिकवणं हे माझं जीवितकार्य आहे—मग स्वत:ला कळो वा न कळो.

तो काळ आणि त्या वेळची माझी, तसेच त्या लेखकांची मनस्थिती आठवली की फार मनस्ताप होतो. त्या वेळचं ते सारं भयानक आणि हास्यास्पद वाटतं. एखाद्या वेड्याच्या रुग्णालयात गेल्यानंतर व्हावी तशी भावना होते. (आणि आज तर असे हजारो जण लिहीत आहेत.)

आमची त्या वेळी अशी बालंबाल खात्री होती की जितकं लिहिता येईल, तितकं शक्य त्या त्वरेनं सांगितलं पाहिजे, लिहिलं पाहिजे आणि छापलं पाहिजे. कारण मानवतेच्या भल्यासाठी ते आवश्यक आहे. आणि आम्ही हजारो जणं एकमेकांना खोडून काढत, शिव्याशाप देत लिहीत होतो आणि छापत होतो. कशासाठी—तर लोकांना शिकवण्यासाठी. अर्थात, आम्हाला काहीही माहीत नव्हतं. जीवनाच्या सर्वात सोप्या प्रश्नाला, म्हणजे 'चांगलं काय आणि वाईट काय' यालासुद्धा आमच्याकडे उत्तर नव्हतं. तरीही आम्ही सर्व एकमेकांचं न ऐकता एकाच वेळी बोलत होतो. स्वत:ची प्रशंसा होण्यासाठी आणि स्वत:ला पाठिंबा मिळवण्यासाठी कधी दुसऱ्याची प्रशंसा करत होतो, दुसऱ्याला पाठिंबा देत होतो, तर कधी दुसऱ्याची उणीदुणी काढत होतो. थेट वेड्यांच्या रुग्णालयातील वेड्यांसारखे.

हजारो माणसं दिवस-रात्र मरेमरेस्तोवर श्रम करून लाखो शब्द छापून

रशियाच्या कानाकोपऱ्यात पोष्टाने पोचवत होती. तरी आम्हाला ते अपुरंच वाटत होतं. आम्हाला जास्तीत जास्त शिकवायचं होतं आणि आम्हाला वेळ पुरत नव्हता. आमच्याकडे पुरेसं लक्ष दिलं जात नाही याचा आम्हाला राग येत होता.

खरोखरच ते फार विचित्र होतं, पण आज मात्र ते नीट समजून घेता येतंय. आम्हाला खरं तर एकच गोष्ट हवी होती—मिळेल तेवढा पैसा आणि मिळेल तेवढा मानसन्मान. आणि हे मिळवण्यासाठी पुस्तकं, लेख, निबंध वगैरे लिहिण्याव्यतिरिक्त आम्ही काही करू शकत नव्हतो. म्हणून आम्ही पुस्तकं आणि पेपरमध्ये लिहीत होतो. पण असं पूर्णपणे निरर्थक काम करण्यासाठी आणि तरीही आपण काहीतरी थोर आहोत अशी स्वत:ची खात्री पटवण्यासाठी आम्हाला एका स्वसमर्थन करणाऱ्या भूमिकेची गरज होती. ही भूमिका आम्ही अशी मांडत होतो की, "जे जे अस्तित्वात आहे ते ते सारं योग्य आहे, समर्थनीय आहे. ते सर्व विकसित होत असतं. तो विकास संस्कृती घडवून आणत असते. संस्कृतीचं मोजमाप पुस्तकं आणि वर्तमानपत्रं किती खपतात यावर अवलंबून असतं. आम्ही पुस्तकं लिहितो, वर्तमानपत्रांत लिहितो. म्हणून आम्हाला पैसे आणि मानसन्मान दिला जातो. याप्रकारे आम्ही सर्वात उपयुक्त आणि सर्वात श्रेष्ठ माणसं आहोत."

जर आम्ही सर्व एकमताचे असतो तर ही भूमिकासुद्धा चालू शकली असती. पण आमच्यातल्या कोणी एकाने एक विचार मांडला की दुसरा त्याच्या अगदी विरुद्ध विचार मांडे. यामुळे खरं तर आम्ही अंतर्मुख व्हायला हवं होतं. पण आम्ही याकडे नेहमी दुर्लक्ष करायचो. कारण लोक आम्हाला पैसे देत होते आणि आमच्या बाजूचे लोक आमची बाजू उचलून धरत होते. म्हणून प्रत्येकालाच आपलं वागणं समर्थनीय आणि योग्य वाटत होतं.

आता मला नीट समजतंय की आमचं हे सगळं वागणं साफ वेडेपणाचं होतं. अगदी वेड्यांच्या रुग्णालयातील वेड्यांसारखं. पण त्या वेळी मला त्याची फक्त किंचितशी आशंका आली होती. आणि सर्व वेड्यांप्रमाणे आम्ही स्वत:ला सोडून इतर सर्व माणसांना वेडे मानत होतो.

□

३

अशा प्रकारे लग्न होईपर्यंत आणखी सहा वर्षं मी हा बिनडोकपणा मजेत करत राहिलो. या काळात मी परदेशी गेलो. युरोपातलं आयुष्य, तसंच तिथल्या महत्त्वाच्या आणि विद्वान व्यक्तींशी झालेला परिचय यांच्यामुळे 'आपण एक परिपूर्ण, निर्दोष आणि चांगला माणूस बनलं पाहिजे,' या माझ्या श्रद्धेला पुष्टी मिळाली. कारण त्या व्यक्तींचीदेखील या गोष्टीवर श्रद्धा होती. आपल्या काळातील बहुसंख्य शिक्षित लोकांमध्ये ही श्रद्धा जे रूप घेते तेच रूप या श्रद्धेने माझ्यामध्ये घेतलं. ते रूप म्हणजे 'प्रगती' हा शब्द. त्यावेळी 'प्रगती' या शब्दामध्ये मला मोठा अर्थ दडलेला दिसायचा. प्रगती, विकास ही मला मोठी अर्थपूर्ण संकल्पना वाटायची. कसं जगणं माझ्या दृष्टीने सर्वोत्तम ठरेल, या प्रश्नाने माझा पिच्छा पुरवला होता. त्याचं उत्तर त्या काळात 'प्रगतीला अनुरूप होईल अशाप्रकारे जग' हे होतं. हे उत्तर कसं होतं? समजा एखादा माणूस होडी चालवतांना वादळवाऱ्यात सापडलाय. तो विचारतोय, "बोट कुठल्या दिशेला वळवू?" आणि त्याला उत्तर मिळतंय,' "आपण कुठंतरी वाहत जातोय." या उत्तरासारखं ते उत्तर होतं. अर्थात त्या वेळी मात्र हे माझ्या लक्षात आलेलं नव्हतं.

मात्र कधी कधी बौद्धिकरित्या नव्हे, तर अंत:प्रवृत्तीनुसार माझं मन या आंधळ्या विश्वासाविरुद्ध बंड करून उठायचं. प्रगतीवर आंधळा विश्वास आपल्या समाजात फार आहे. जीवनाचं आकलन लोक करून घेत नाहीत. आणि हा अभाव ते प्रगतीच्या मागे लागून स्वत:पासून लपवतात. उदाहरणादाखल सांगायचं तर पॅरिसमध्ये असताना मी एका माणसाचा शिरच्छेद पाहिला आणि प्रगतीवर माझा जो आंधळा विश्वास होता, तो डळमळीत झाला. मी शिर धडावेगळं होताना पाहिलं. एका खोक्यात ते शिर आणि धड वेगवेगळं

फेकून देऊन भरताना पाहिलं. तेव्हा मला केवळ माझ्या मनानेच नव्हे तर अवघ्या अस्तित्वाने भान आलं की आताची आपली प्रगती योग्य मार्गाने चालली आहे, असं सांगणारी कोणतीही तत्त्वप्रणाली या कृत्याचं समर्थन करू शकणार नाही. जरी या जगाच्या आरंभापासून प्रत्येकाने कुठल्यातरी तत्त्वप्रणालीनुसार अशा कृत्याचं समर्थन केलेलं असलं तरी मला ते कृत्य अनावश्यक कृत्य वाटतं, वाईट कृत्य वाटतं. एखादं कृत्य चांगलं कृत्य आहे की दुष्ट कृत्य आहे याचा निवाडा लोकांच्या मतानुसार किंवा कृतीनुसार होऊ शकणार नाही की 'प्रगती'च्या संकल्पनेच्या अनुसार होऊ शकणार नाही. तो निवाडा करणार माझं हृदय आणि मी. या साऱ्याचं लख्ख भान तो शिरच्छेद पाहताना मला आलं.

आणखी एक प्रसंग म्हणजे माझ्या भावाचा मृत्यू. प्रगतीवरचा विश्वास आयुष्याला दिशा देतो हे मानणं किती अपुरं, किती तोकडं आहे हे मला भावाच्या मृत्यूने दाखवलं. माझा भाऊ एक सत्शील, शहाणा आणि गंभीर प्रकृतीचा माणूस होता. तरुणपणीच तो आजारी पडला. वर्षभर त्याने हाल काढले आणि त्याच्या यातना मृत्यूनेच संपवल्या. आपण जगलो कशाकरता आणि याहून महत्त्वाचं म्हणजे आपण मरतो आहोत कशाकरता हे काही त्याला शेवटपर्यंत कळलं नाही. यातना सोशीत तो मरणाकडे हळूहळू जात होता. त्या वेळी त्याला आणि मला हे प्रश्न पडायचे. पण त्यांचे समाधानकारक उत्तर कुठल्याच प्रणालीकडे नव्हतं. अशा वेळी माझ्या मनात 'प्रगती'बद्दल अविश्वास उत्पन्न व्हायचा.

पण काही झालं तरी असे प्रसंग मोजकेच होते. बाकीच्या वेळी प्रगतीवर श्रद्धा ठेवून मी आयुष्य जगत होतो. माझी श्रद्धा त्या वेळी कशी होती— तर सर्व काही उत्क्रांत पावत आहे. त्याचबरोबर मीही उत्क्रांत पावत आहे. साऱ्याबरोबर माझी उत्क्रांती का होतेय हे केव्हातरी समजून येईलच, असं रूप त्या वेळी माझ्या श्रद्धेने घेतलं असावं.

परदेशाहून परतल्यावर मी गावी राहायला लागलो. शेतकऱ्यांच्या शाळांमध्ये स्वत:ला गुंतवून घेण्याची संधी मला मिळाली. हे काम माझ्या मनाजोगतं होतं. मी जेव्हा लेखन करून लोकांना शिकवण्याचा प्रयत्न करत होतो तेव्हा तो उघडउघड खोटेपणा आहे, असं मला सतत जाणवायचं. इथं मात्र तसं काही नव्हतं. इथेसुद्धा मी प्रगतीच्याच संकल्पनेनुसार काम करत होतो. पण आता त्या प्रगतीचा मी नीट साक्षेपाने विचार केला होता.

मला आता असं वाटत होतं की काही क्षेत्रांमध्ये प्रगतीच्या नावाखाली विकासाची दिशा चुकलेली आहे. आणि आदिम संस्कृतीत वाढलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना पूर्ण स्वातंत्र्याच्या वातावरणात शिकवलं पाहिजे. त्यांना योग्य वाटेल ती प्रगतीची वाट त्यांनी स्वत: निवडली पाहिजे. पण खरं सांगायचं म्हणजे एकच एक प्रश्न मला सतावत होता. तो म्हणजे, 'मलाच काय शिकवायचं ते माहीत नाही. मग मी कसा शिकवणार?' साहित्यिक वातावरणाच्या उच्च क्षेत्रात असताना मला हे कळून चुकलं होतं की स्वत:ला कळल्याशिवाय दुसऱ्याला शिकवणं शक्य नसतं. मी पाहिलं होतं की जो तो लेखक काहीतरी वेगवेगळं शिकवतोय. ती लेखकमंडळी आपापसात भांडणं करून आपलं अज्ञान एकमेकांपासून लपवून ठेवत होती. पण इथे शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये असताना त्यांना हवं ते शिकू द्यावं असा विचार करून ही अडचण मी टाळली. त्या वेळी मला असं वाटायचं की माझी शिकवण्याची फार मोठी इच्छा आहे, पण मी ती जबाबदारी टाळतोय. खरं तर मला आतून पक्कं माहीत होतं की खरं उपयुक्त आणि खरं मूल्यवान असं काय आहे, हेच मला ठाऊक नाहीये आणि म्हणून काय शिकवायचं हा खरा प्रश्न आहे. एक वर्ष शिक्षणामध्ये घालवल्यावर मी पुन्हा दुसऱ्यांदी स्वत:ला माहीत असल्याशिवाय दुसऱ्यांना कसं शिकवायचं हे पाहण्यासाठी परदेशी गेलो.

आणि मला वाटतं की मी ते परदेशी शिकलो. शेतकऱ्यांच्या मुक्तीच्या वर्षी, म्हणजे १८६१ला मी रशियाला परतलो. आता माझ्याजवळ या बाबतीतलं शहाणपण होतं. रशियाला परतल्यावर शेती करणारी कुळं आणि त्यांचे मालक यांच्यातील मी मध्यस्थ झालो. परत मी शिकवायला सुरुवात केली— अशिक्षित शेतकऱ्यांना शाळांमधून आणि सुशिक्षितांना एक मासिक प्रकाशित करून. सर्व काही सुरळीत चाललंय असं दिसत होतं. पण मी मनातून फार अस्वस्थ होतो. या गोष्टी फार काळ अशाच चालू राहणं शक्य नव्हतं. पुढे पंधरा वर्षांनी जसा मी पराकोटीच्या निराश अवस्थेत गेलो, तसाच खरं तर त्याच वेळी मी गेलो असतो. पण जीवनाची एक नवीनच बाजू माझ्यापुढे आली. तिने मला आनंदाची आशा दाखवली. ती म्हणजे माझं लग्न.

वर्षभर मी मध्यस्थाच्या, शाळांच्या आणि मासिकाच्या कामात स्वत:ला गुंतवून घेतलं होतं आणि मी पार थकून गेलो होतो. त्याचं मुख्य कारण होतं, माझा मानसिक गोंधळ. शिवाय मला मध्यस्थ म्हणून खूप झगडावं लागत होतं. शाळांचंही काही धड चाललं नव्हतं. मासिक चालवणं तर

मनाविरुद्ध होत चाललं होतं. (त्याचं कारण सरळ होतं— मला सगळ्यांना शिकवायचं होतं आणि काय शिकवायचं हे माझं मलाच माहीत नव्हतं. शिवाय ही गोष्ट मला लपवायची होती.) शेवटी मी आजारी पडलो. शारीरिक थकव्यापेक्षा मानसिक थकवाच मला जास्त आला होता. मी सगळं सोडलं. आणि स्टेपीजमधल्या बश्कीरला गेलो. कशासाठी, तर ताजी हवा हुंगण्यासाठी; घोडीचं आंबवलेलं दूध पिण्यासाठी आणि निसर्गाच्या सान्निध्यात आदिम आयुष्य जगण्यासाठी.

तिथून आल्यानंतर मी लग्न केलं. माझं आनंदी कौटुंबिक आयुष्य सुरू झालं. त्यामुळे 'आयुष्याचा अर्थ काय' हा माझा शोध पार मागे पडला. माझं घर, माझी बायको आणि माझी मुलं हे आता माझ्या आयुष्याचं केंद्र झालं. त्यांच्या पालनपोषणासाठी उत्पन्न वाढवणं भाग झालं. स्वत:मध्ये परिपूर्णता आणणं हे माझं पहिल्यांदा उद्दिष्ट होतं. ते बदलून त्याच्या जागी नंतर प्रगती आलं. आता स्वत:च्या आणि कुटुंबाच्या सुखसोयींकडे लक्ष पुरवणं हे माझं उद्दिष्ट झालं.

अशी पंधरा वर्षं गेली.

खरं तर मला लेखन करणं ही महत्त्वाची गोष्ट वाटत नव्हती. पण या पंधरा वर्षांत मी लिहीत राहिलो. लेखक असण्याची नशा काय असते हे मी आधीच अनुभवलं होतं. अफाट पैसा आणि माझ्या बिनमहत्त्वाच्या कामाचं बेफाट कौतुक यांची ती नशा होती. माझी आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी तसंच माझ्या आयुष्याचा अर्थ काय किंवा एकूण आयुष्याची सार्थकता कशात असते असे अंतरात्म्यातून उठणारे प्रश्न दाबून टाकण्यासाठी मी लेखनाला वाहून घेतलं.

आपल्या स्वत:साठी आणि आपल्या कुटुंबीयांसाठी जे जे म्हणून काही उत्तम असेल ते ते मिळवण्यासाठी प्रत्येकाने जगावं एवढंच सत्य मला माहीत होतं आणि ते मी माझ्या लेखनातून शिकवीत राहिलो.

अशा प्रकारे आयुष्य चाललं होतं. पण पाच वर्षांपूर्वी एक चमत्कारिक गोष्ट सुरू झाली. सुरुवात अशी झाली... मी अगदी गोंधळल्यासारखा झालो. वाटलं की आयुष्य थांबलंय. जणू काही मला कसं जगावं किंवा काय करावं हेच माहीत नाहीये. पार हरवल्यासारखं झालं. कशात काही अर्थ नाहीये असं वाटू लागलं. पण नंतर ही अस्वस्थता नाहीशी झाली. परत मी पूर्वीसारखा जगू लागलो. पण परत अशीच अवस्था झाली आणि नंतर तर ती परत

परत यायला लागली. परत सगळं तेच तेच. तीच सगळी अस्वस्थता. आणि परत तेच प्रश्न. हे सर्व कशासाठी? या सगळ्यातून काय निष्पन्न होणार आहे?

प्रथम मला वाटतं की हे संदर्भहीन आणि दिशाहीन प्रश्न आहेत. सगळ्यांना या प्रश्नांची उत्तरं माहीत आहेत. ती समजून घेणं तसं फारसं अवघड नाहीये. सध्या मला वेळ नाहीये. पण जेव्हा मला इच्छा होईल तेव्हा ही उत्तरं मला थोड्याफार प्रयत्नांनी सापडू शकतील. पण हे प्रश्न माझ्या मनात वारंवार उमटू लागले. माझा त्यांनी अगदी छळ चालवला. शाईचा एखादा डाग एकाच जागेवर सतत पडावा आणि त्याचा एक काळा धब्बा व्हावा, तसं माझ्या मनाचं झालं.

एखाद्या न दिसणाऱ्या पण जीवघेण्या व्याधीने आजारी पडलेल्या माणसाचं होतं तसं ते झालं. अपचनाच्या क्षुल्लक वाटणाऱ्या तक्रारी उद्‌भवतात. पण तो माणूस काही लक्ष देत नाही. पण या तक्रारी वारंवार उद्‌भवतात. त्यांचं रूपांतर न थांबणाऱ्या वेदनांमध्ये होतं. वेदना वाढत जातात. त्या माणसाला काही समजण्याच्या आधीच, ज्याला तो साधं अपचन समजला होता ती गोष्ट त्याच्या दृष्टीने जगातील सर्वात महत्त्वाची होऊन बसते. आणि ती असते मृत्यू.

माझ्या बाबतीत असंच घडलं. मला समजलं की हे साधं अपचन नाहीये. हे काहीतरी फार फार महत्त्वाचं असं आहे. माझ्यासमोर फडा काढून उभ्या राहणाऱ्या या प्रश्नांची उत्तरं मला शोधलीच पाहिजेत. आणि मी त्या प्रश्नांची तड लावण्याचा प्रयत्न केला. मला ते प्रश्न पहिल्यांदा मूर्ख, साधे आणि पोरकट वाटले होते. पण मी त्यांची उत्तरं शोधायला लागलो आणि माझी ताबडतोब खात्री पटली की, एक म्हणजे, ते प्रश्न काही पोरकट आणि मूर्ख नाहीयेत. जीवनाबद्दलचे सर्वात गंभीर आणि मूलभूत असे ते प्रश्न आहेत. दुसरं म्हणजे कितीही प्रयत्न केला तरी मी ते सोडवू शकणार नाही. समारा येथील माझ्या वतनवाडीची देखरेख करणं किंवा माझ्या मुलांच्या शिक्षणाचं बघणं किंवा पुस्तक लिहिणं या गोष्टींमध्ये लक्ष घालण्याअगोदर मला हे कळणं अत्यंत आवश्यक होतं की हे सारं मी कां म्हणून करतोय. जोपर्यंत मी हे कां करतोय हे मला समजत नाही तोपर्यंत मी काहीही करू शकणार नाही की जगू शकणार नाही. माझ्या डोक्यात त्या काळी माझ्या वतनवाडीच्या देखभालीचा विचार कायम असे. त्या वेळी अचानक असा विचार माझ्या

मनात येई, ठीक आहे. तुझी साडेसोळा हजार एकर जमीन आणि तीनशे घोडे त्या समारा वतनवाडीत आहेत. पण पुढे काय?

आणि मी परत अस्वस्थ व्हायचो. काय विचार करावा तेच सुचत नसे. जेव्हा मी माझ्या मुलांच्या शिक्षणाचा विचार करायचो तेव्हा मी स्वत:लाच विचारायचो, 'पण कशासाठी?' शेतकऱ्यांना चांगले दिवस कसे येतील याचा विचार करताना मध्येच माझ्या मनात येई. 'पण त्यामुळे माझं काय होणार?' माझ्या लेखनामुळे मला किती कीर्ती मिळेल हा विचार करताना असा प्रश्न डोक्यात येई, 'ठीक आहे. तू अगदी गोगोल, पुष्किन, शेक्सपियर किंवा मोलियर यांच्यापेक्षाही किंवा जगातल्या कोणत्याही लेखकापेक्षाही श्रेष्ठ मानला जाशील. पण त्याचं करायचं काय?' आणि अशा प्रश्नांना माझ्याकडे अजिबात उत्तर नसे. प्रश्न फडा काढून उभे राहातच असत. त्यांना ताबडतोब उत्तर देणं भाग होतं. पण माझ्याकडे या प्रश्नांची उत्तरं नव्हती. आणि या प्रश्नांनी मला जगणं अशक्य करून सोडलं होतं.

मला वाटू लागलं की मी ज्याच्यावर उभा होतो ते सारं काही नष्ट झालेलं आहे. माझ्या पायाखालचा आधार नाहीसा झालेला आहे. मी आतापर्यंत ज्या गोष्टींच्या आधारावर जगत होतो त्या आता अस्तित्वहीन झालेल्या आहेत. आता मला जगण्यासारखं काहीही उरलेलं नाही.

☐

४

माझं आयुष्य ठप्प झालं. मी श्वासोच्छ्वास करत होतो, झोपत होतो. या गोष्टी मला कराव्याच लागत होत्या. पण त्यात काही जिवंतपणा नव्हता. कारण ज्या पुरवल्या गेल्यानंतर मला सुख वाटेल, अशा इच्छाच मला उरल्या नव्हत्या. मला पक्कं माहीत होतं की मी एखादी इच्छा केली आणि ती पुरवली गेली तरी त्यापासून पुढे काहीही होणार नाही. एखादी परी जरी आली असती आणि तिने सांगितलं असतं की, 'पाहिजे ते माग, मी तुला देते' तर काय मागावं हे मला समजलं नसतं. नशेमध्ये असताना मी एखादी इच्छा केली—खरं तर इच्छा नाहीच, सवयीचा परिणाम म्हणून काहीतरी मागितलं—तरी शुद्धीवर आल्यानंतर मला समजायचं की यात काही अर्थ नाही. कारण खरं तर इच्छा करण्यासारखं काही नाहीच आहे. सत्य काय आहे हे जाणून घेण्याचीसुद्धा मला इच्छा होत नव्हती. कारण सत्याचं काय स्वरूप आहे याचा मी अंदाज बांधू शकत होतो. ते सत्य असं होतं की आयुष्य पूर्णपणे निरर्थक आहे. आयुष्याची वाटचाल करत करत मी आता या बिंदूपर्यंत आलो होतो. मला आता स्पष्टपणे दिसत होतं की पुढे फक्त विनाश आहे. आता थांबणं अशक्य होतं. मागं जाणं अशक्य होतं. डोळे मिटणं अशक्य होतं. न बघणं अशक्य होतं. आणि समोर दिसत होतं दुःख आणि खराखुरा मृत्यू—पूर्ण नष्ट होऊन जाणं.

मी या अवस्थेला आलो होतो—मी एक सुदृढ, सुदैवी माणूस. मला वाटत होतं आता पुढं जगणं शक्य नाही. कोणतीतरी अतिप्रचंड शक्ती मला कोणत्या तरी मार्गाने सर्व संपवून टाकायला भाग पाडत होती. मी असं म्हणू शकणार नाही की मला आत्महत्या करण्याची 'इच्छा' होती. जी शक्ती मला जीवनापासून खेचू बघत होती ती साध्या इच्छेपेक्षा जास्त प्रबळ, जास्त

प्रभावी, जास्त व्यापक होती. तो जोर पूर्वीच्या जिवंत राहण्याच्या प्रेरणेसारखाच पण विरुद्ध दिशेला जाणार होता. माझी सर्व शक्ती मला जीवनापासून परावृत्त करत होती. पूर्वी जसं स्वत:ला सुधारण्याचे विचार माझ्या मनात सहजपणे येत, त्याच सहजपणे आता स्वत:ला संपवून टाकण्याचे येत. स्वत:ला नष्ट करून टाकण्याचे ते विचार एवढे खेचून नेणारे असत की मला सावधगिरीने वागणं भाग पडत असे. नाहीतर न जाणो मी ते विचार झटकन अमलात आणून टाकीन. मला घाईघाईत काही करायचं नव्हतं, कारण हे प्रश्न मला नीटपणे सोडवायचेच होते. 'हे प्रकरण मला आता नीट समजत-उमजत नाही, पण केव्हातरी मी ते नीटपणे मार्गी लावीन. माझ्यापाशी वेळ आहे.' मी स्वत:शी म्हणे. आणि माझ्यासारख्या सुदैवी माणसाने मग स्वत:पासून दोरखंड लपवून ठेवला. मी सकाळी जिथे कपडे उतरवत असे त्या खोलीत एक पार्टिशनची आडवी तुळई होती. त्या तुळईला मी टांगून घेईन अशी भीती मला वाटत होती. तसंच मी शिकारीसाठी बंदूक घेऊन जाणंही बंद केलं. न जाणो, मला या सोप्या मार्गानं जीवन संपवण्याचा मोह पडायचा. आपणाला नक्की काय हवंय हे मला स्वत:लाच कळत नव्हतं. मला जीवनाची भीती वाटत होती. आणि त्याच्यापासून सुटका हवी होती. तरीही जीवनापासून काही तरी मिळेल, अशी मला आशा वाटत होती.

आणि हे सर्व केव्हा घडत होतं — तर जेव्हा मी सर्व बाजूंनी अत्यंत सुखात होतो. मी अजून पन्नाशी ओलांडली नव्हती. मला चांगली पत्नी होती. तिचं माझ्यावर आणि माझं तिच्यावर खूप प्रेम होतं. चांगली मुलं होती. माझी मोठी वतनवाडी होती. फारशी देखभाल न करताही ती वाढत-विस्तारत होती. मला माझे नातेवाईक आणि ओळखणारे पूर्वी कधी नाही एवढा मान देत होते. सगळेजण माझी प्रशंसा करत होते. आत्मस्तुतीचा फारसा दोष न पत्कारता मी सांगू शकतो की माझा मोठा नावलौकिक होता. मी वेडा नव्हतो. शेतकऱ्यांच्या तोडीने मी कापणी करायचो एवढा मी बळकट होतो. बौद्धिक दृष्ट्या मी एवढा तगडा होतो की सलग आठ-आठ दहा-दहा तास मी लिहू-वाचू शकत असे आणि नंतर मला कुठल्याही प्रकारचा शिणवटा जाणवत नसे. असं असताना, मी या अवस्थेला आलो होतो. मला जगणं शक्य वाटत नव्हतं आणि मरणाला घाबरून मी दोरी लपवून ठेवत होतो. बंदूक टाळत होतो.

माझ्यासमोर माझ्या मनाची अवस्था अशी होत होती—माझं आयुष्य म्हणजे एक मूर्ख आणि तिरस्करणीय असा विनोद आहे. हा विनोद 'कुणीतरी'

माझ्यावर केलेला आहे. ज्या कुणी मला निर्माण केलंय त्याला मी ओळखत नाहीये. पण कुणीतरी या जगात मला आणून एक मूर्ख आणि पापी विनोद केलेला आहे. माझ्यासमोर माझ्या आयुष्याचं चित्र असं उभं राहायचं.

सहजपणे माझ्या मनात यायचं की कुठूनतरी दूरवरून कुणीतरी मला न्याहळतोय. आणि स्वत:ची करमणूक करून घेतोय. तो पाहतोय मला. तो पाहातोय की या माणसाने तीस-चाळीस वर्षं कशी घालवली, कसा शिकला, कसा मोठा झाला, त्याचं शरीर आणि मन कसं विकसित झालं आणि शेवटी, पूर्ण विकसित झालेल्या मनाने याने आयुष्याच्या शिखरावरून पाहिलं तेव्हा त्याला—या मूर्खशिरोमणीला सगळीकडे पूर्ण निरर्थकपणा कसा दिसला. या मठ्ठमद्दडमूर्खाला आता कळतंय की पूर्वीही काही अर्थ नव्हता, आताही नाहीये आणि पुढेही असणार नाही... आणि 'त्याची' करमणूक होतेय.

आणि मला हसणारा तो 'कुणीतरी' खरंच अस्तित्वात आहे की नाही याच्यावरून माझ्या परिस्थितीत काहीच फरक पडत नव्हता. माझ्या छोट्याशा कृतीला किंवा अख्ख्या आयुष्याला मी काहीच अर्थ देऊ शकत नव्हतो. मला फक्त याचंच आश्चर्य वाटत होतं की जे सगळ्यांना नीटपणे फार पूर्वीपासून माहीत होतं, ते मला अगदी आरंभापासून कसं कळलं नाही. आज किंवा उद्या मी आणि ज्यांच्यावर माझं प्रेम आहे असे सारेजण आजारी पडतील आणि मरून जातील. त्यांच्या देहातून दुर्गंधी सुटेल आणि त्यांच्यावर किडे वळवळतील. बाकी काहीसुद्धा राहणार नाही. काही काळानंतर पण अगदी निश्चितपणे माझ्यासंबंधीच्या गोष्टी लोक विसरून जातील. मग मी पूर्णपणे अस्तित्वहीन होईन. मग कोणतीही धडपड मी का करावी? माणसं ही गोष्ट उघड्या डोळ्यांनी का पाहू शकत नाहीत? आणि जगत राहायचं कसं? खरं तर जगत राहणं हीच चमत्कारिक गोष्ट आहे. जीवनाची जेव्हा नशा असते तेव्हाच जगता येतं. जेव्हा ती नशा उतरते तेव्हा लक्षात येतं की हे जीवन ही केवळ एक लबाडी आहे, एक मूर्ख लबाडी आहे. हो... असंच आहे हे सगळं. जीवनात काहीही सुख देणारं नाहीये की हुशारी नाहीये. जीवन आहे फक्त क्रूर आणि मूर्ख.

फार जुन्या काळची एक पौर्वात्य लोककथा आहे. एक प्रवासी होता. तो प्रवास करत असताना एका पठारावर पोचला. अचानक एक जंगली श्वापद चवताळून त्याच्या अंगावर धावून आलं. त्याने त्या श्वापदाला चुकवलं आणि एका कोरड्या विहिरीत उडी मारली. त्याने खाली पाहिलं तर त्या विहिरीच्या

तळाशी एक सर्प त्याला गिळायला जबडा वासून बसलेला त्याला दिसला. बाहेर जावं तर श्वापद खातं, खाली उतरावं तर सर्प खातो अशा भयप्रद अवस्थेत सापडलेल्या त्या प्रवाशाने विहिरीच्या कपारीत उगवलेली एक छोटीशी फांदी घट्ट पकडली आणि त्याला तो लोंबकळत राहिला. त्याचे हात थकले. जड झाले. त्याला वाटू लागलं की एक तर त्याला वर चढावं लागेल किंवा खाली तरी उतरावं लागेल. पण तरीही तो लोंबकळत राहिला. नंतर त्याने पाहिलं की एक काळा आणि एक पांढरा असे दोन उंदीर त्या फांदीभोवती फिरताहेत आणि ती फांदी कुरतडताहेत. आता ती फांदीच तुटून पडेल आणि त्याबरोबर आपण खाली कोसळू. प्रवाशाला हे सगळं दिसतं. आपला शेवट अगदी नक्की जवळ आलाय हे त्याला कळून चुकतं. पण तो लोंबकळतच राहतो. अशा स्थितीत इकडेतिकडे पाहत असताना त्या फांदीच्या पानांवर तो मधाचे थेंब पाहतो. आपली जीभ तो बाहेर काढतो आणि ते मधाचे थेंब चाटू लागतो.

त्या प्रवाश्याप्रमाणे मीही जीवनाच्या फांदीला लोंबकळत उभा होतो. मला पक्कं उमजलं होतं की मृत्यूचा काळसर्प माझ्यासाठी जबडा वासून तयार आहे. मला हे समजत नव्हतं की अशा भयप्रद अवस्थेत मी कां म्हणून सापडलो होतो. मी मध चाटण्याचा प्रयत्न केला. पूर्वी हा मध मला किती आवडायचा. पण आता हा मध मला आनंद देत नव्हता. दिवसाचा पांढरा आणि रात्रीचा काळा असे दोन उंदीर मी ज्या फांदीला लोंबकळून उभा होतो त्याला कुरतडत होते. मी डोळे टक्क उघडे ठेवून जबडा वासलेल्या काळसर्पाला पाहत होतो. त्यामुळे तो मध मला गोड लागत नव्हता. ते दोन उंदीर आणि जबडा वासलेला तो काळसर्प यांनी माझी नजर खिळवून ठेवली होती... आणि ही काही लोककथा नाहीये. ज्याला काही उत्तर नाही, असं हे खरंखुरं वास्तव आहे. कोणालाही ते समजू शकतं.

पूर्वी जीवनाचे छोटेमोठे आनंद माझ्या मनातलं मृत्यूचं भय थोडंसं तरी कमी करत. पण आता ही फसवणूक शक्य नव्हती. 'तू जीवनाचा अर्थ समजू शकणार नाहीस. म्हणून त्याबद्दल विचार न करता जग.' असं कितीही वेळा जरी मला सांगितलं गेलं असतं तरी आता तसं करणं मला शक्य नव्हतं. मी असा खूप काळ जगलो होतो. दिवसरात्र उलटताहेत आणि मी मृत्यूच्या अधिकाधिक जवळ जातोय हे मला दिसत होतं... आणि मला फक्त हेच दिसत होतं. कारण हेच फक्त सत्य होतं. बाकी सर्व मिथ्या होतं.

मधाच्या दोन थेंबांनी माझं लक्ष मृत्यूपासून सर्वात जास्त काळ विचलित केलं होतं. ते दोन मधाचे थेंब म्हणजे माझं कुटुंब आणि माझं लेखन. (ज्याला मी कला म्हणायचो.) पण आता या गोष्टींतही मला काही रस वाटत नव्हता.

कुटुंबाविषयी मी विचार करायचो. माझे कुटुंबीय म्हणजे मी, बायको आणि मुलं. हीसुद्धा माणसंच आहेत. त्यांचीही स्थिती माझ्यासारखीच आहे. त्यांनी विदारक सत्य जाणून घेतलं पाहिजे किंवा भ्रमामध्ये आयुष्य घालवलं पाहिजे. त्यांनी कां म्हणून जगायचं? कां म्हणून मी त्यांच्यावर प्रेम करायचं? त्यांच्यावर माया करायची? त्यांचं रक्षण करायचं? त्यांना मोठं करायचं? त्यांची काळजी वाहायची? अशासाठी की त्यांनी माझ्यासारखंच निराशेच्या गर्तेत सापडावं अथवा मद्दड म्हणून जगावं? मी त्यांच्यावर प्रेम करतो, पण म्हणून काही हे सत्य मी त्यांच्यापासून लपवून ठेवू शकत नाही. आणि हे सत्य आहे मृत्यू. फक्त मृत्यू.

आणि कला... काव्य...! यशाच्या आणि प्रशंसेच्या कैफात मी फार पूर्वीच ठरवून टाकलं होतं की मृत्यू जरी दर क्षणी जवळ येत असला तरी लेखन ही गोष्ट करणं शक्य आहे. मृत्यू सर्वच गोष्टी नष्ट करून टाकतो. माझं लेखन आणि त्याचं स्मरणही हा मृत्यू पुसून टाकील. सारं काही काळाच्या पडद्याआड जाईल. पण तरीही लेखन शक्य आहे - असं मला पूर्वी वाटायचं. पण लवकरच मला कळून चुकलं की हीसुद्धा एक लबाडीच आहे. मला स्पष्टपणे दिसून आलं की कला ही जीवनाचं भूषण आहे, जीवनाचं आमिष आहे. पण खुद्द जीवनच माझ्यासाठी शुष्क बनलं होतं. - मग भूषण काय अन् आमिष काय... त्याचं आकर्षण मला कसं वाटणार? जोपर्यंत मी माझं स्वत:चं आयुष्य जगत नव्हतो आणि दुसऱ्यांच्या आयुष्यात डोकावून पाहत होतो, जोपर्यंत मला वाटत होतं की आयुष्याला अर्थ आहे, पण तो मला व्यक्त करता येत नाहीये, तोपर्यंत जीवनाचं सर्व कलांमधलं आणि कवितेमधलं प्रतिबिंब मला आनंद देत होतं. जीवन अशाप्रकारे कलेमध्ये बघणं हे आनंददायी होतं. जेव्हा मी आयुष्याच्या अर्थाचा शोध घेणं सुरू केलं, माझ्या स्वत:च्या आयुष्याकडे नीटपणे पाहणं सुरू केलं तेव्हा कलेचा आरसा माझ्यासाठी अनावश्यक, उथळ, हास्यास्पद आणि वेदनादायी ठरला. त्या आरशात आता मला माझी अवस्था दिसू लागली. मी किती मूर्ख आहे हे मला कळलं. माझी निराशा मला दिसून आली. जेव्हा माझ्या खोल अंतरात्म्यामध्ये मी असं मानत होतो की आयुष्याला अर्थ आहे, प्रयोजन आहे तेव्हा जीवनाचं कलेतील प्रतिबिंब पाहण्यात आनंद होता, मौज होती. सुखी, दु:खी,

करुणाकारी, हृदयस्पर्शी, सुंदर, भयानक अशी जीवनाची वेगवेगळी रूपं बघणं आनंददायी होतं. पण जेव्हा मला कळून चुकलं की आयुष्य हे निरर्थक आणि भयानक आहे तेव्हा कलेतील प्रतिबिंबाचं मला काही वाटेनासं झालं. आता मला त्या आरशात तो जबडा वासलेला काळसर्प आणि ते दोन उंदीर दिसत होते. ते उंदीर माझं आयुष्य कुरतडत होते आणि एक दिवस त्या काळसर्पाच्या जबड्यात मी पडणार होतो. अशा वेळी मला त्या मधुथेंबांची काय गोडी वाटणार?

आणि हे एवढ्यावरच थांबलेलं नव्हतं. मला जर एवढंच समजलं असतं की आयुष्याला काही अर्थ नाहीये तरी मी ते ढकलत नेलं असतं. आपल्या नशिबातच असलं आयुष्य आहे असं मी समजलो असतो. एखादा माणूस रानात राहणारा आहे आणि त्याला माहीत आहे की या रानातून बाहेर जायला मार्ग नाहीये तर तो जसा राहील तसा मी राहिलो असतो. पण मी माझं समाधान अशा प्रकारे करून घेऊ शकत नव्हतो. कारण मी त्या माणसासारखा होतो जो रानात वाट चुकलाय आणि घाबरघुबरा होऊन वाट शोधण्यासाठी इकडेतिकडे धावतोय. त्याला माहीत आहे की असं धावल्यामुळे आपण अधिकाधिक गोंधळतोय. आपल्या प्रत्येक पावलागणिक आपण अधिकाधिक चुकतोय. पण अशी धडपड केल्याशिवाय त्याला राहवत नाहीये.

ते सारं खरोखरच भयानक होतं. त्या भीतीपासून सुटका मिळवण्यासाठी मला आत्महत्या करण्याची इच्छा होत होती. माझ्यासाठी जे निश्चितपणे वाढून ठेवलंय त्याची भीती मला वाटत होती. मला समजत होतं की माझ्या आताच्या अवस्थेपेक्षाही ती अवस्था जास्त भीतीदायक आहे. पण तरीही मी धीमेपणाने वाट पाहू शकत नव्हतो. माझ्या हृदयातील एखादी धमनी फुटेल किंवा दुसरं काहीतरी बंद पडेल आणि सगळा खेळ खलास होईल हे जरी मला स्पष्टपणे दिसत होतं तरी तो शेवट येईपर्यंत धीमेपणाने मी वाट पाहू शकत नव्हतो. त्या थंडकाळ्या काळोखाच्या भीतीपुढं दुसरं काही सुचत नव्हतं आणि त्या भीतीपासून लवकरात लवकर दोरीचा फास लावून किंवा बंदुकीची गोळी झाडून मी स्वत:ची सुटका करून घेऊ इच्छित होतो. अशी सुटका करून घेण्याच्या तीव्र इच्छेने मी आत्महत्येकडे खेचून घेतला जात होतो.

मी स्वत:ला अनेकवार विचारलं, 'पण कदाचित मी एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलंय असं तर नाही ना? एखादी गोष्ट मला समजलीच नाहीये असं तर नाही ना? माणसानं असं निराश व्हावं हे नैसर्गिक नाहीये.' आणि मी

माझ्यापुढे उभ्या असलेल्या प्रश्नांची उत्तरं माणसाने शोधून काढलेल्या ज्ञानविज्ञानात शोधायचा प्रयत्न सुरू केला. मी हा शोध अगदी खूप काळपर्यंत काळजीपूर्वक आणि चिकाटीने चालू ठेवला. अहोरात्र मी वाचनचिंतन करत राह्यचो. मला केवळ वरवरचं कुतूहल नव्हतं. बुडणारा माणूस आधार शोधतो तसा मला आधार हवा होता.

मी सर्व शास्त्रं धुंडाळली. पण मला जे हवं ते काही मिळालं नाही. माझी उलट खात्री पटली की ज्या कोणी माणसांनी जीवनाचा अर्थ ज्ञानविज्ञानाच्या शाखांमध्ये शोधण्याचा प्रयत्न केला त्यांनाही काही आधार सापडलेला नव्हता. इतकचं नव्हे तर 'माणसाला एक गोष्ट वादातीतपणे कळू शकते. ती म्हणजे जीवनाचा निरर्थकपणा' हे त्यांनी सरळसरळ मान्य केलं होतं आणि इथे जीवनाची अर्थपूर्णता शोधण्यासाठी मी ज्ञानविज्ञानाचा आधार शोधत होतो!

सर्व दिशांनी मी माझा शोध चालू ठेवला होता. मी शिकलेला होतो. विद्वान लोकांशी माझ्या ओळखी होत्या. ज्ञानविज्ञानाच्या सर्व शाखांमधील अनेक शास्त्रज्ञ आणि हुशार लोक माझ्या ओळखीचे होते. त्यांनी मला पुस्तकं दिली, चर्चा केल्या, विज्ञानाला जीवनाच्या प्रश्नांसंबंधी काय म्हणायचं आहे ते सर्व मी जाणून घेतलं.

आणि मला कळून चुकलं की विज्ञानाला जेवढं कांही सांगता येतं त्यापेक्षा जीवनाच्या प्रश्नांसंबंधी सांगण्यासारखं विज्ञानाकडे काहीही नाहीये. विज्ञानाच्या निष्कर्षांचं जीवनाच्या प्रश्नांशी काही देणंघेणं नसतं. विज्ञान ज्या गंभीरपणे आणि उच्च स्थानावरून आपले निष्कर्ष घोषित करतं त्यावरून मला पूर्वी असं वाटायचं की यातील काहीएक भाग असा आहे की जो मला समजत नाहीये. म्हणून मी खूप काळ विज्ञानासमोर नम्र बालक असा उभा होतो. माझे प्रश्न आणि त्याला विज्ञानाने दिलेली उत्तरं यांचा काहीच मेळ नव्हता. पण मला असं वाटायचं माझ्या अज्ञानामुळे हे असं होतंय. पण हा काही खेळ किंवा मनोरंजन नव्हतं. माझ्या जीवनमरणाचा हा प्रश्न होता. शेवटी मी या निष्कर्षाप्रत आलो की माझे प्रश्न योग्य आहेत. खरं तर सर्व ज्ञानाची उभारणी या प्रश्नांवर झाली पाहिजे. विज्ञानाकडे जर या प्रश्नांची उत्तरं नसतील आणि तरी ती देण्याचा आव विज्ञान आणत असेल तर ते न्यून विज्ञानाचं आहे. माझ्या प्रश्नांचं नाही

ज्या प्रश्नाने वयाच्या पन्नासाव्या वर्षी मला आत्महत्येच्या टोकापर्यंत

आणून सोडलं होतं तो माझा प्रश्न अगदी साधासरळ होता. खरं तर हा प्रश्न अगदी अजाण बालकापासून ते शहाण्या वृद्धापर्यंत सर्वांच्या मनात असतो. या प्रश्नाचं उत्तर दिल्याशिवाय जगताच येत नाही. तो प्रश्न म्हणजे, 'मी आज जे करतोय किंवा उद्या जे करणार आहे त्यापासून काय निष्पन्न होणार आहे? माझ्या सर्व आयुष्यापासून काय निष्पन्न होणार आहे? माझ्या आयुष्याचे फलित काय आहे?'

हा प्रश्न अशा प्रकारे मांडता येईल, 'मी कां जगावं? कशासाठीही काय म्हणून इच्छा करावी? कुठलीही गोष्ट कां म्हणून करावी?' किंवा वेगळ्या प्रकारे म्हणायचं तर, 'माझ्या आयुष्याला असा काही अर्थ आहे का की जो अटळ मृत्यू नष्ट करू शकणार नाही?'

या एका प्रश्नाचं मी विज्ञानाकडून उत्तर मागत होतो. प्रश्न वेगवेगळ्या प्रकारे मांडला असला तरी तो मुळात एकच होता. मला आढळलं की या प्रश्नावरून माणसाच्या ज्ञानामध्ये दोन विरोधी पक्ष पडले आहेत. एका पक्षाचं उत्तर नकारात्मक आहे तर दुसऱ्याचं होकारात्मक आहे. पण खरं पाहता या दोन्ही पक्षांकडे या प्रश्नाचं उत्तरच नाहीये.

विज्ञानाची एक शाखा या प्रश्नाची दखलच घेत नाही. पण तिच्यासमोर असलेल्या प्रश्नांची काटेकोर आणि स्पष्ट उत्तरं देते. ही शाखा म्हणजे प्रयोगशील विज्ञानाची शाखा. या शाखेच्या सर्वोच्च स्थानी आहे गणित. विज्ञानाची दुसरी शाखा या प्रश्नाची दखल घेते, पण त्याचं उत्तर मात्र देत नाही. ही शाखा म्हणजे अमूर्त विज्ञानाची शाखा. या शाखेच्या सर्वोच्च स्थानी आहे अध्यात्मशास्त्र.

अगदी तरुणपणापासून मला अमूर्त विज्ञानाची गोडी होती. पण नंतर मला गणिती विज्ञान आणि नैसर्गिक विज्ञाने हीसुद्धा आवडू लागली. जोपर्यंत माझा प्रश्न मी स्वत:लाच थेटपणे केलेला नव्हता आणि जोपर्यंत त्या प्रश्नाने माझ्या डोक्यामध्ये अक्राळविक्राळ रूप धारण करून त्याच्या ताबडतोब उत्तरासाठी मला वेठीला धरलं नव्हतं तोपर्यंत विज्ञान जी थातुरमातुर उत्तरं देत होतं त्यावर मी वेळ मारून नेत होतो.

प्रयोगविज्ञानाला अनुसरून मी स्वत:ला समजावलं, 'प्रत्येक गोष्ट विकसित होते आणि स्वत:ला वेगळी सिद्ध करते. यामध्ये ती अधिकाधिक गुंतागुंतीची, अनेक पदरी अशी बनते आणि पूर्णत्वाकडे जाते. या विकासप्रक्रियेचे नियम आहेत. तू संपूर्णाचा एक भाग आहेस. ते संपूर्ण जास्तीत

जास्त जाणून घेतलंस, तसंच उत्क्रांतीची प्रक्रिया जाणून घेतलीस की तुला तुझं संपूर्णातील स्थान समजून येईल आणि तू स्वत:ला जाणू शकशील.'

आता हे कबूल करताना लाज वाटते, पण त्या वेळी हे स्पष्टीकरण मला समाधानकारक वाटलं होते. तो काळ नेमका असा होता की मी स्वत: वाढत होतो. माझं मन आणि अवघं व्यक्तिमत्त्व अनेक पदरी बनत होतं. शरीर बळकट होत होतं. खूप गोष्टी माझ्या अवतीभवती घडत होत्या. माझ्या मनावर त्यांचा ठसा उमटत होता. माझ्या विचारांची कक्षा रुंदावत होती. माझं आकलन वाढत होतं. आणि त्यामुळे साहजिकच मला असं वाटत होतं की माझ्यामध्ये जी वाढ होत आहे ती नैसर्गिक नियमांप्रमाणे होते आहे. त्या नैसर्गिक नियमांमध्ये मला माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळेल. पण केव्हातरी माझी वाढ थांबली. मला जाणवलं की मी आता वाढत नाहीये, उलट मी आता उतरणीला लागलोय. माझं शरीर दुबळं बनत चाललंय. माझे दात पडताहेत. तेव्हा मला स्पष्टपणे कळून चुकलं की या नियमाने मला काहीच स्पष्टीकरण दिलेलं नाहीये. मी त्या काळात जे काही पाहिलं त्यालाच मी नियम समजलो. नंतर मी त्या तथाकथित नियमाचं आणखी काटेकोर परिशीलन केलं. मला समजलं की असा अनंत काळापर्यंत विकास होण्याचा काही नियम असणंच शक्य नाही. 'अनंत अशा अवकाशात आणि अनंत अशा काळात प्रत्येक गोष्ट विकसत असते, अनेक पदरी बनत असते, पूर्णत्वाकडे जात असते आणि स्वत:चं वेगळं रूप सिद्ध करत असते,' असं सांगणं म्हणजे खरं तर काहीच न सांगणं आहे. हा फक्त शब्दांचा खेळ आहे. त्याला अर्थ नाही. कारण एकदा का अनंत म्हटलं की मग तिथं साधं नाही की अनेक पदरी गुंतागुंतीचं नाही, पुढे जाणं नाही की मागे जाणं नाही, प्रगती नाही की परागती नाही. सगळं सारखंच.

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या साऱ्यात 'माझ्या इच्छावासनांसह असलेला मी म्हणजे कोण आहे?' या प्रश्नाला काही उत्तरच नाहीये. माझ्या लक्षात आलं, ही विज्ञानं फार लक्षणीय आहेत, फार आकर्षक आहेत. पण जीवनाच्या प्रश्नापासून ती जितकी विन्मुख आहेत तितक्या प्रमाणात जी जास्त काटेकोर आणि स्पष्ट आहेत. जीवनाच्या प्रश्नाला उत्तर देण्याचा जेव्हा ती प्रयत्न करू लागतात तेव्हा ती संदिग्ध आणि रूक्ष बनतात.

जीवनाच्या प्रश्नांसंबंधी उत्तर देण्याचा प्रयत्न करणाऱ्या विज्ञानाच्या शाखा म्हणजे शरीरशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र ही शास्त्रं. त्यांच्याकडे

वळलं तर विचारांची भयावह अभावग्रस्तता, संदिग्धता, असंबद्ध प्रश्न सोडवण्याच्या अकारण आव आणि सतत एकाची प्रमेयं दुसरा खोडतोय किंवा तो शास्त्रज्ञच आपल्या एका प्रमेयाविरुद्ध दुसरं प्रमेय मांडतोय असं दृश्य दिसतं.

आपण विज्ञानाच्या दुसऱ्या शाखेकडे म्हणजे गणित, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांकडे वळलो तर असं दिसतं की ही शास्त्रं जीवनाच्या प्रश्नांसंबंधी विचार करत नाहीत. त्यांच्या क्षेत्रातील प्रश्नांचा विचार करतात. ही शास्त्रं म्हणजे माणसाच्या बुद्धीचा उत्तुंग विलास आहे. पण आपणाला आधीच माहीत असतं की त्यांच्याकडून जीवनाच्या प्रश्नांबद्दल आपणाला उत्तर मिळणार नाहीये. ही शास्त्रं जीवनाच्या प्रश्नांकडे चक्क दुर्लक्ष करतात. ती म्हणतात, 'तू कोण आहेस आणि तू का जगतो आहेस या प्रश्नाबद्दल आमच्याकडे काही उत्तर नाहीये. आम्ही त्याबद्दल विचारही करत नाही. पण तुला जर प्रकाशाचे नियम, रासायनिक समीकरणं, विकासाचे नियम, शरीराचं आकारमान आणि त्याचे नियम, संख्यांचे नियम याची माहिती हवी असेल तर आमच्याकडे त्याबद्दलची निस्संदिग्ध, काटेकोर आणि बिनतोड उत्तरं आहेत.'

एकूण म्हणजे प्रयोगशील विज्ञानाची जीवनाच्या प्रश्नांबाबत भूमिका अशी असते-

प्रश्नः मी का जगतो?

उत्तर : अनंत अशा अवकाशात आणि अनंत अशा काळात अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म असे कण आपले रूप बदलतात आणि अनंत गुंतागुंतीच्या रूपात परिवर्तित होतात आणि जेव्हा तुला परिवर्तनाचे नियम समजतील तेव्हा तुला आपण या पृथ्वीवर का जगत आहोत हे समजेल.

मग अमूर्त विज्ञानाला अनुसरून मी स्वतःला समजावलं, 'सर्व मानवजात चैतन्यतत्त्वांना आणि आदर्शांना प्रमाण मानून जगत आहे. ही तत्त्वं आणि आदर्श मानवजातीला दिशा दाखवतात. हे आदर्श धर्मांमध्ये, विज्ञानामध्ये, कलांमध्ये, शासनव्यवस्थांमध्ये आविष्कृत केले जातात. हे आदर्श अधिकाधिक उच्चतर बनत जातात आणि मानवजात अधिकाधिक सुसंस्कृत, सुजाण, सुखी बनण्याकडे वाटचाल करते. मी मानवजातीचा एक भाग आहे. त्यामुळे मानवजातीचे आदर्श समजून घेणं आणि त्याप्रमाणे वाटचाल करणं हे माझं

कर्तव्य आहे.' आणि माझ्या दुबळ्या मनोवस्थेत अशा उत्तराने मी समाधान पावायचो. पण जेव्हा जीवनाचा प्रश्न माझ्यासमोर पुन्हा एकदा स्पष्टपणे उभा राहिला तेव्हा हा सिद्धान्त कुठल्याकुठे विरून गेला. एकतर ही शास्त्रं एका लहानशा मानवसमूहाचा विचार करतात आणि असा विचार करून जे निष्कर्ष काढतात ते सर्व मानवजातीला लागू पडतील असं उद्धटपणे समजतात. हा त्यांचा पहिला दोष. मानवजातीचे आदर्श नक्की कोणते याबद्दल त्यांचं जराही एकमत नाही हा दुसरा दोष. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या सिद्धान्तांचा मूर्खपणा किंवा साधेपणा हा आहे की 'मी कोण आहे?' किंवा 'मी का जगत आहे?' किंवा 'माझे कर्तव्य काय?' या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी त्या प्रश्नकर्त्याने प्रथम याचं उत्तरं शोधलं पाहिजे की संपूर्णाचं जीवन काय आहे. आणि संपूर्णाचं जीवन तर त्याला माहीतच नसतं. म्हणजे आपण कोण आहोत हे समजण्यासाठी त्या माणसाने प्रथम ही अत्यंत गुंतागुंत असलेली अख्खी मानवजात समजून घेतली पाहिजे... आणि इथं तर एक माणूस दुसऱ्याला समजून घेऊ शकत नाही.

मला हे कबूल केलं पाहिजे की एक काळ असा होता की माझा या सगळ्यावर विश्वास होता. त्या काळात माझे स्वत:चे असे लाडके आदर्श होते. माझ्या मनाच्या लहरीनुसार मी ते ठरवले होते. माझ्या लहरी या मानवजातीचे नियम ठरू शकतील, असा सिद्धान्त शोधण्याच्या प्रयत्नात मी त्या काळी होतो. पण जेव्हा जीवनाचा प्रश्न थेट स्वरूपात माझ्यापुढे उभा राहिला तेव्हा हा सगळा सिद्धान्त वगैरे कुठल्याकुठे भिरकावला गेला. मला कळून चुकलं की प्रयोगविज्ञानामध्ये ज्याप्रमाणे खरी विज्ञाने आणि उपविज्ञाने असतात (जी त्यांच्या कुवतीपलीकडचे प्रश्न सोडवायला बघतात) त्याप्रमाणे अमूर्त विज्ञानाच्या विभागातही खूप शास्त्रं अशी आहेत की जी संदर्भहीन प्रश्नांची उत्तरं देतात. न्यायशास्त्र, समाज-इतिहासशास्त्र अशी उपशास्त्रं माणसाच्या आयुष्याचे प्रश्न मानवजातीचा अभ्यास करून सोडवता येतील, अशा भ्रमात असतात.

प्रयोगशील विज्ञान जीवनाच्या प्रश्नाला उत्तर देतं, 'अनंत अवकाशात अनंत काळात अनंत अशा अणूंमध्ये जे बदल होतात आणि त्यातून ज्या अनंत अशा गुंतागुंती निर्माण होतात त्याचा अभ्यास कर. मग तुला तुझं आयुष्य समजून येईल.' हे उत्तर कोणाचं कसं बरं समाधान करू शकेल?

जीवनाच्या प्रश्नाला अमूर्त विज्ञान उत्तर देतं, 'मानवजातीचा आरंभ

आपणास माहीत नाही. मानवजातीचा अंत कसा होईल हेही आपणास माहीत नाही. मानवजातीचीही आपणास कणमात्र माहिती नाही. अशा मानवजातीचा अभ्यास कर. मग तुला तुझं जीवन कळून येईल.' आणि प्रयोगशील विज्ञानाच्या उपशास्त्रांप्रमाणे या अमूर्त विज्ञानाच्या शाखेतील उपशास्त्रंही जेव्हा जीवनाच्या खऱ्या प्रश्नांशी भिडण्याचा प्रयत्न करतात तेव्हा जास्त मूर्ख, जास्त प्रमादशील, जास्त संदिग्ध, जास्त विसंगत बनत जातात. प्रयोगशील विज्ञानापुढचा प्रश्न असतो तो भौतिक घटनांमधील कार्य आणि कारण यांच्या अनुक्रमाचा. आदिकारण, म्हणजे सर्वात मूळ कारण कोणतं हा मुद्दा प्रयोगशील विज्ञानापुढे उपस्थित केला की त्याचा सर्व इमला कोसळतो आणि ते आपला अर्थ गमावून बसतं. अमूर्त विज्ञानापुढचा प्रश्न असतो जीवनाचं आदितत्त्व शोधण्याचा. त्याच्यापुढे सामाजिक किंवा ऐतिहासिक अशा परिणामस्वरूप घटनांचा मुद्दा उपस्थित केला की तेही आपला अर्थ गमावून बसतं.

प्रयोगशील विज्ञान सकारात्मक ज्ञान देतं. मानवी बुद्धीची झेप दाखवतं. कुठपर्यंत-तर जोपर्यंत त्याच्यासमोर या साऱ्याचं मूळ कारण कोणतं हा प्रश्न उपस्थित केला जात नाही तोपर्यंत: अमूर्त विज्ञान जोपर्यंत घटनांची परिणामस्वरूप कारणं बाजूला सारतं आणि माणसाचा संबंध थेट आदिकारणाशी जोडू पाहतं तोपर्यंतच ते विज्ञान असतं आणि त्यात मानवी प्रज्ञेची प्रभा दिसते. तत्त्वज्ञान आणि अध्यात्मशास्त्र ही या विज्ञानाची प्रमुख शास्त्रं. हे विज्ञान हा प्रश्न नेमकेपणानं उभा करतं. 'मी कोण आहे? हे विश्व काय आहे? मी कां अस्तित्वात आहे?' अशा स्वरूपात हा प्रश्न या विज्ञानात मांडला जातो. आणि जेव्हापासून हे अमूर्त विज्ञान अस्तित्वात आहे, तेव्हापासून या प्रश्नांना ते एकच उत्तर देत आलं आहे. ही तत्त्वज्ञानी माणसं म्हणतात की माझ्यामध्ये आणि अखिल विश्वामध्ये एकचएक चैतन्य आहे. जे जे म्हणून कांही अस्तित्वात आहे, त्या साऱ्यामध्ये ते एकच चैतन्य आहे. या चैतन्याला ही तत्त्वज्ञानी माणसं वेगवेगळ्या नावांनी संबोधतात. ईश्वराची इच्छा, ईश्वराची कल्पना, ईश्वराची चेतना, मूलतत्त्व अशी अनेक नावं या चैतन्याला आहेत. पण 'ते' कां आहे याचं त्यांच्याकडे उत्तर नसतं. आणि जर ते अगदी काटेकोर तत्त्वज्ञानी असतील तर ते हे सांगण्याचा आवही आणणार नाहीत. मी विचारतो, 'हे चैतन्य कां अस्तित्वात आहे? ते आहे आणि पुढेही असणार आहे, यापासून काय निष्पन्न होणार आहे?' आणि तत्त्वज्ञान या प्रश्नाचं उत्तर देत नाही. उलट तत्त्वज्ञान नेमके हेच प्रश्न उपस्थित करतं. जर ते खरं तत्त्वज्ञान असेल तर त्याचा सर्व प्रयत्न हा प्रश्न नेमकेपणाने मांडण्याचा असतो. हा प्रयत्न

अगदी नेटकेपणाने केला तर पुढील प्रश्नोत्तरं निष्पन्न होतात :

'मी कोण आहे आणि हे विश्व काय आहे?'

'सर्वकाही आणि काहीही नाही.'

'कां?'

'मला माहीत नाही.'

अशा प्रकारे तत्त्वज्ञानाची ही उत्तरं मी कशाही प्रकारे बघितली तरी त्यातून उत्तरादाखल माझ्या हाती काहीच लागत नाही. असं नाही की ही उत्तरं प्रयोगशील विज्ञानाप्रमाणे माझ्या प्रश्नाशी संबंधितच नसतात. उलट अमूर्त विज्ञानाचा सारा प्रयत्न या प्रश्नाचंच उत्तर देण्याचा असतो. पण या प्रश्नाला उत्तरच नाहीये. त्यामुळे उत्तराऐवजी या अमूर्त विज्ञानाकडून हाच प्रश्न उलट विचारला जातो. फक्त जास्त गुंतागुंतीच्या स्वरुपात.

□

६

जीवनाचा प्रश्न मला छळत होता. रानात हरवलेल्या माणसासारखी माझी अवस्था झाली होती.

तो माणूस रानातील मोकळ्या जागेकडे जातो. झाडावर चढतो. त्याला क्षितिजापर्यंतचा प्रदेश दिसतो. पण त्याचं घर तिथं नसतं. तो परत गर्द रानाकडे वळतो. पण तिथंही त्याचं घर नसतं.

मी तसाच मानवी ज्ञानाचा मागोवा घेत हिंडलो. गणिती आणि प्रायोगिक विज्ञानं धुंडाळली. त्यांनी मला निरनिराळी क्षितिजं दाखवली. पण त्या दिशेला माझं घर नव्हतं. मी अमूर्त विज्ञानाच्या घनदाट गुंतावळ्यात शिरलो. जितका मी आत गेलो तितकं मला उदासीनतेने झाकोळून टाकलं. शेवटी माझी खात्री पटली की इथे बाहेर जायला वाट नाही.

मानवी ज्ञानाच्या लख्ख बाजूकडे लक्ष केंद्रित करून मी माझ्या प्रश्नांपासून दूर जात आहे हे माझ्या लक्षात आलं. माझ्या शोधात माझ्या नजरेसमोर मानवी ज्ञानविज्ञानाची अनेक क्षितिजं खुली झाली. या ज्ञानविज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये बुडून जाणं हे फार आकर्षक होतं. पण मला समजून चुकलं की हे सगळं जरी खरं असलं तरी मला जे हवं आहे ते यांच्यापासून मिळणार नाही. माझ्या प्रश्नांची उत्तरं यांच्याकडून मिळणं शक्य नाही.

मी स्वत:शी उद्‌गारलो, 'विज्ञान सातत्याने कशाचा शोध घेऊ पाहतं हे मला कळतं. पण त्या मार्गावर 'माझ्या आयुष्याचा अर्थ काय?' या प्रश्नाचं उत्तर नाहीये.' अमूर्त विज्ञानाचा हेतूच मुळी माझ्या प्रश्नांची उत्तरं देण्याचा असतो. पण नेमकं त्याचमुळे ते या प्रश्नांची उत्तरं देऊ शकत नाही. अमूर्त विज्ञानाने माझ्या प्रश्नांना दिलेली उत्तरं ही मी दिलेल्या उत्तरांसारखीच आहेत.

म्हणजे:

'माझ्या जीवनाचा अर्थ काय?'

'काहीही नाही.'

किंवा,

'माझ्या जीवनाचं फलित काय?'

'काहीही नाही.'

किंवा,

'जे अस्तित्वात आहे ते का अस्तित्वात आहे? मी का अस्तित्वात आहे?

'कारण ते अस्तित्वात आहे.'

प्रयोगशील विज्ञानाकडून मी ज्याबद्दल विचारलं नव्हतं त्याबद्दल मात्र मला भरपूर माहिती मिळाली. ती चांगली काटेकोर आणि अचूक होती. उदा. ताऱ्यांचे रासायनिक घटक, हरक्युलिस या तारकासमूहाभोवती सूर्याचं भ्रमण, माणसाचं आणि इतर जीवजातींचं मूळ, इथरच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणांचे आकार अशी अनेक प्रकारची माहिती मला मिळाली. पण याबद्दल मी विचारलंच नव्हतं आणि माझ्या प्रश्नाला त्यांच्याकडे काही उत्तर नव्हतं.

'माझ्या आयुष्याचा अर्थ काय?' या प्रश्नावर या विज्ञानाचं उत्तर होतं, 'तू ज्याला जीवन म्हणतोस ते तू आहेत. तू कणांचं एक क्षणभंगुर आणि हेतूहीन असं मीलन आहेस. या कणांचे एकमेकांवर जे परिणाम होतात आणि कणांमध्ये जे बदल होतात त्यातून तू, ज्याला आपलं स्वत:चं जीवन म्हणतोस ते निर्माण होतं. कणांचं हे मीलन काही काळ राहील, नंतर या कणांची परस्परक्रिया थांबेल आणि त्याबरोबर तू ज्याला जीवन म्हणतोस तेही संपून जाईल. अपघाताने एकत्र आलेल्या कोणत्यातरी कणांचा असा तू एक गोळा आहेस. त्या गोळ्यामध्ये रासायनिक प्रक्रिया होतात. त्या प्रक्रियेला तो गोळा जीवन म्हणतो. त्या गोळ्याचं विघटन होईल. त्या प्रक्रिया थांबतील. त्याबरोबर सर्व प्रश्नही थांबतील'. असं उत्तर हे विज्ञान देतं आणि जर ते आपली तत्त्वं काटेकोरपणे पाळत असेल तर याहून वेगळं उत्तर ते देऊ शकणार नाही.

हे उत्तर माझ्या प्रश्नाचं खरं उत्तर नाहीये. मला माझ्या आयुष्याचा काय

अर्थ आहे हे हवंय आणि विज्ञान उत्तर देतंय की माझं आयुष्य हा अनंताचा एक भाग आहे. या उत्तरामुळे आयुष्याला काही अर्थ येत नाही. उलट अर्थाची शक्यताही असं उत्तर नष्ट करतं. प्रयोगशील विज्ञान अमूर्त विज्ञानाशी हातमिळवणी करून म्हणतं की आयुष्याचा अर्थ विकासामध्ये सामावलाय आणि विकासाला अनुरूप जगणं हाच आयुष्याचा अर्थ आहे. आता हे उत्तर इतकं संदिग्ध आणि फसवं आहे की त्याला उत्तरच म्हणता येणार नाही.

अमूर्त विज्ञानाने या थेट प्रश्नाला प्राचीन काळापासून एकच उत्तर देऊन ठेवलं आहे. आपल्या तत्त्वाला काटेकोरपणे अनुसरून ते हेच एक उत्तर देऊ शकतं. 'हे विश्व अनंत आहे. अज्ञेय आहे. मानवी आयुष्य हे त्या 'पूर्ण' अज्ञेयाचा एक छोटा अज्ञेय भाग आहे.' इथं मी परत एकदा प्रयोग विज्ञान आणि अमूर्त विज्ञान यांची हातमिळवणी होऊन न्यायशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहासशास्त्र अशी जी उपशास्त्रं निर्माण झाली आहेत त्यांचा परामर्श टाळतो. या उपशाखांमध्ये विकास आणि प्रगती यांची संकल्पना चुकीची मांडली आहे. फरक एवढाच आहे की अमूर्त विज्ञानात 'साऱ्याचाच विकास होत आहे' असं मानलं जातं तर या उपशास्त्रांमध्ये साऱ्यांच्या ऐवजी फक्त मनुष्यजातीचा विकास होतोय असं मानलं जातं. मात्र तेथे जो दोष आहे तोच इथे आहे. तो म्हणजे अनंतामध्ये विकास आणि प्रगती याला काही दिशा नाही की ध्येय नाही. परत माझ्या प्रश्नाला या उपशास्त्रांमध्येही काही उत्तर नाही.

शोपेनहॉवर ज्याला प्राध्यापकीय तत्त्वज्ञान म्हणतो आणि ज्या तत्त्वज्ञानाचा उपयोग अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींना फक्त नव्या तत्त्वज्ञानीय वर्गीकरणात बसवणं आणि त्यांना नवीन नावं देणं एवढाच असतो ते तत्त्वज्ञान मला इथे अभिप्रेत नाही. खरेखुरे अमूर्त विज्ञान म्हणजे शुद्ध तत्त्वज्ञान मला इथे अभिप्रेत आहे. हा तत्त्वज्ञानी खऱ्या प्रश्नावरून आपलं लक्ष विचलित करत नाही. पण त्याला मिळणारं उत्तर एकचएक असतं आणि हेच उत्तर सॉक्रेटिस, शोपेनहॉवर, सॉलोमन आणि बुद्ध यांनी दिलेलं आहे.

आयुष्याची निरवानिरव करताना सॉक्रेटिस म्हणला, 'जीवनापासून आपण जितके दूर जातो तितके आपण सत्याच्या जवळ येतो. आपण सत्यप्रेमी आहोत, तर आपण आयुष्यात धडपड कशासाठी करत असतो? तर देहापासून आणि देहमय जीवनामुळे निर्माण झालेल्या पापापासून मुक्ती मिळवण्यासाठी. जर असं असेल तर जेव्हा मरण येतं तेव्हा आनंदाशिवाय दुसरी कोणती भावना मनात येईल? शहाणा माणूस सर्व आयुष्यभर मरणाचीच इच्छा करतो.

म्हणून मरण हे त्याच्यासाठी भीतीदायक नसतं.'

आणि शोपेनहॉवर म्हणतो, 'विश्वाचा आंतरिक स्वभाव 'इच्छा' हा आहे. जगाचं कार्य म्हणजे 'इच्छा'चा आविष्कार. आपणाला समजू न येणाऱ्या निसर्गाच्या गूढ चलनवलनांपासून ते माणसाच्या उघडपणे दिशू शकणाऱ्या हालचालींपर्यंत सर्वत्र या इच्छेने कार्य चालू असतं. आणि यावरून असा उघड निष्कर्ष निघतो की आपण जर स्वखुशीने या इच्छेचं विसर्जन केलं तर इच्छेचा हा पसारा आपोआपच मिटला जाईल. इच्छेच्या पसाऱ्याने जग भरून गेलं आहे. जर इच्छाच नाहीशी झाली तर सर्वकाळ अविश्रांतपणे चालणारे सर्व तऱ्हेचे प्रयत्न विलोप पावतील. निरंतरपणे दुसऱ्या आकाराला जन्म देणारे आकार लोप पावतील. सर्वात शेवटी सर्व वैश्विक आकार म्हणजे अवकाश व काळ आणि सर्वात मूलभूत आकार म्हणजे कार्य व कारण लोप पावतील. जिथे इच्छा नाही तिथे कुठलाच आविष्कार नाही. कुठले जग नाही. आपल्यासमोर निश्चितपणे फक्त शून्यपणा तेवढा उरतो. पण जगण्याची इच्छा ही आपणाला त्या शून्यपणाकडे जाण्यास प्रतिरोध करते. ही जगण्याची इच्छा म्हणजेच आपण आहोत, हे जग आहे. आपण पूर्ण नष्ट होऊन जाणं ही गोष्ट आपणाला भयानक वाटते, नकोशी वाटते. जगावं ही इच्छा आपल्या मनात तीव्रतेने असते. ती इच्छा म्हणजेच जगणं. अथक परिश्रम करून आपण जगत असतो. या जगण्याच्या इच्छेपलीकडे आपण काही जाणत नाही. म्हणून या इच्छेचा पूर्ण लोप झाल्यानंतर काय होतं हे आपण जाणू शकत नाही. आपण सर्व, इच्छेने पूर्णपणे भरून गेलेलो आहोत. पण उलट पाहता ज्यांच्यामध्ये इच्छेचा पूर्ण लोप झाला त्यांच्यासाठी हे जग, हा सूर्य, ही आकाशगंगा म्हणजे केवळ शून्य आहे.'

सॉलोमन म्हणतो, 'सारं सारं केवळ पोकळपणा आहे. दंभ आहे. भ्रम आहे. या जगात मरेमरेस्तोवर राबून माणसाला काय मिळतं? एक पिढी निघून जाते, दुसरी येते. पण पृथ्वी चिरकाल तशीच राहते. एक गोष्ट जशी आता आहे तशीच पुढे राहील आणि जे केलं आहे तसंच पुढे केलं जाईल. या पृथ्वीवर नवीन अशी कुठलीही गोष्ट नाही. एखाद्या गोष्टीकडे बोट दाखवून असं कधीतरी म्हणता येईल का की 'पाहा... ही नवीन गोष्ट आहे.' ती गोष्ट जुन्या काळाचीच असते. पूर्वी होऊन गेलेली असते. मागच्या काळातल्या गोष्टींची आठवणसुद्धा शिल्लक राहत नाही आणि यापुढे ज्या गोष्टी घडतील त्यांचीही काहीही आठवण त्यांच्या पुढच्या पिढ्यांना राहणार नाही. मी हा उपदेशक इस्रायलमधील जेरूसलेमचा राजा होतो. मी माझं सर्वस्व पणाला

लावून पृथ्वीतलावर जे जे काही आहे त्याचा शहाणपणानं शोध घेण्याचा प्रयत्न केला. या वेदना आणि कष्ट जे देवाने माणसाला दिले आहेत, त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. या पृथ्वीतलावर जे जे काही निर्मिले गेले आहे ते ते मी पाहिलं आहे आणि मी सांगतो ते लक्षपूर्वक ऐका, सर्व काही पोकळ आहे. अर्थशून्य आहे. आत्म्याची गांजवणूक करणारं आहे. मी माझ्या हृदयाशी संवाद साधला आणि म्हटलं, अरे, मला मोठी वतनवाडी मिळालेली आहे. जेरूसलेमध्ये जे लोक होऊन गेले त्यांच्यापेक्षा मला जास्त शहाणपणा मिळालेला आहे. खरंच, माझ्याकडे सुज्ञपणाचा आणि ज्ञानाचा मोठा अनुभव आहे. ज्ञान आणि शहाणपणा शोधण्याचा मी प्रयत्न केला. मूर्खपणा आणि प्रमादशीलता शोधण्याचा मी प्रयत्न केला. यासाठी मी जिवाचं रान केलं. पण मला लक्षात आलं की हीसुद्धा आत्म्याची गांजवणूक आहे. कारण शहाणपणा जेवढा वाढतो तेवढं दु:खही वाढतं आणि माणूस जेवढा ज्ञानी बनतो तेवढा दु:खी बनत जातो.

मी स्वत:शी म्हटलं, चला, आता मौजमजा करून पाहूया. पण ही मौजमजा हाही पोकळपणा आहे हे ध्यानी घ्या. मी हास्याबद्दल सांगितलं की ते वेडेपणाचं आहे. आणि मौजमजा-काय आहे ती? दारू पिऊन शरीराला कसं सुखवावं याचा मी माझ्या हृदयात शोध घेतला. पण माझ्या हृदयाने मूर्खपणावर विजय मिळवण्यासाठी सुज्ञपणाचा मार्ग सांगितला. शेवटी या जगातले आपले दिवस सुखासमाधानाने घालवण्यासाठी माणसाने कसं वागावं याचं मार्गदर्शन मला हृदयाकडून मिळालं. मी माझ्यासाठी खूप मोठी कामं केली. मी घरंराजवाडे बांधले. द्राक्षांचे मळे तयार केले. बागा आणि राया तयार केल्या. या रायांमध्ये तऱ्हेतऱ्हेची फळं देणारी झाडं लावली. मी तलाव बांधले. रानात झाडं लावली आणि तलावांमधून त्यांना पाणी पुरवलं. मी अनेक नोकरचाकर आणि कुमारिका यांना माझ्या तैनातीला ठेवलं. त्यांना माझ्या घरी मुलंबाळं झाली. जेरूसलेममध्ये कधीच कुणाच्या पदरी नव्हते एवढे अनेक प्रकारच्या पशुंचे कळप माझ्याकडे होते. माझ्या खजिन्यासाठी मी खूप सोनंचांदी अनेक राजांकडून आणि माझ्या मांडलिकांकडून गोळा केली. माझ्या दरबारात गायक-गायिका होत्या. माणसाला प्रमुदित करणारी अनेक वाद्यं माझ्याजवळ होती. संगीताचे सर्व आनंद मी मिळवले. अशा प्रकारे मी श्रेष्ठ होतो. जेरूसलेममध्ये कोणी कधी मिळवलं नव्हतं एवढं मी मिळवलं. कुठल्याही तऱ्हेच्या आनंदापासून मी स्वत:ला वंचित ठेवलं नाही... नंतर मी जी कामं केली त्यावर मी नजर फिरवली. मी जे जे श्रम केले होते

त्याची मी उजळणी केली आणि जनहो, लक्षपूर्वक ऐका, सर्व काही पोकळपणा आणि दंभ होता. सर्व काही आत्म्याची गांजवणूक होती. त्यांच्यापासून काहीही फायदा नाही. मी माझ्या अंतरंगाकडे लक्ष वळवलं. शहाणपणा, मूर्खपणा, प्रमादशीलता पारखली... पण माझ्या लक्षात आलं की सर्वांना सारखेच भोग भोगावे लागतात. मग मी स्वत:शी उद्गारलो. 'जे मूर्खाला भोगावं लागतं तेच मला भोगावं लागतं. मग मी जास्त शहाणा कसा?' मग माझं मन म्हणालं, हाही पोकळपणाच आहे. कारण मूर्खाची काही आठवण राहत नाही तशीच शहाण्या माणसाचीही काही आठवण राहत नाही. चिरकाल आठवण कुणाचीच राहत नाही. जे आता अस्तित्वात आहे ते कालांतराने विसरले जाईल. आणि जसा मूर्ख माणूस मरण पावतो तसाच शहाणाही मरण पावतो. म्हणून मला जीवनाचा तिरस्कार वाटू लागला. या पृथ्वीतलावर जे काम केलं जातं ते मला दु:खदायक वाटू लागलं. कारण सर्व काही पोकळपणा आणि दंभ आहे. आत्म्याची गांजवणूक आहे. खरोखरीच मी या पृथ्वीतलावर जे काम केलं त्याचा मला तिरस्कार वाटू लागला. कारण ते काम माझ्यानंतर जो कोणी येईल त्याच्याकडे मला सोपवावं लागणार...

माणसाला उन्हातान्हात राबून, आपल्या आत्म्याची गांजवणूक करून, आपल्या हृदयाची छळवणूक करून मिळतं काय? त्याचे सर्व दिवस दु:खाने भरलेले असतात. त्याचा जीवनप्रवास कष्टांनी, वेदनांनी भरलेला असतो. रात्रीसुद्धा त्याचं हृदय दु:खाने कण्हत असतं. हासुद्धा पोकळपणा आहे. जो माणूस कष्ट करील तो आनंदाने खाईलपिईल आणि सुखासमाधानाने राहील, अशी कोणतीच निश्चिती नाही. ही निश्चिती लाभण्याइतका माणूस भाग्यवान नाही... सर्व गोष्टी सर्वांना समानच असतात. दुष्ट माणसाला जे भोगावं लागतं तेच सद्वर्तनी माणसाला भोगावं लागतं. चांगल्या आणि वाईट माणसाला सारखेच भोग भोगावे लागतात. उपभोग आणि भोग साऱ्यांना सारखेच. मग तो माणूस स्वच्छ असो की मलीन असो; त्याग करणारा असो की त्याग न करणारा असो, शपथ देणारा - पाळणारा असो की शपथ घ्यायला घाबरणारा असो. सर्वांना सारखेच भोग आणि उपभोग. हे अतिशय वाईट आहे. या पृथ्वीतलावरच्या सर्व माणसांची हृदयं दुष्ट विचारांनी भरलेली असतात. माणसं मूर्खपणाने जगत असतात आणि नंतर ती मरून जातात. जो जगत असतो त्याला आशा आहे. कारण जिवंत असणारा कुत्रा मेलेल्या सिंहापेक्षा चांगला. कारण जिवंत असणारा जाणतो की तो मरणार आहे. मेलेला काहीच जाणत नाही. त्याला कसलंही फळ मिळत नाही. त्याच्याबद्दलची आठवणही पुसून

जाते. मेलेल्या माणसांचं प्रेम, द्वेष, हेवा... सारं काही नष्ट झालेलं आहे. पृथ्वीवर जे काही चाललेलं असतं, त्यात मेलेल्यांचा काहीएक वाटा असत नाही.'

असं सॉलोमन म्हणाला किंवा ज्या कोणी हे शब्द लिहून ठेवले तो असं म्हणाला.

आणि भारतीय शहाणपणा असं सांगतो :

शाक्य मुनी हा एक तरुण, आनंदी राजपुत्र होता. त्याच्यापासून आजारपण, म्हातारपण आणि मृत्यू लपवून ठेवण्यात आलं होतं. एकदा तो रथातून फिरायला बाहेर पडला. तेव्हा त्याने एक अतिशय जखखड म्हातारा पाहिला. म्हाताऱ्याचं पार बोळकं झालं होतं. तो अत्यंत कष्टाने लटपटत चालला होता. राजपुत्राला तोपर्यंत म्हातारपण म्हणजे काय हे माहीत नव्हतं. तो व्यथित झाला. त्याने आपल्या सारथ्याला विचारलं, 'हे काय आहे? हा माणूस अशा भयानक आणि ओंगळ स्थितीला कसा आला?' जेव्हा त्याला कळलं की हे म्हातारपण आहे, सर्व माणसांच्या नशिबी अशीच दशा होणं लिहिलेलं असतं आणि आपलीही काही काळाने अशीच दशा होणार तेव्हा राजपुत्राला धक्का बसला. त्याने सारथ्याला रथ मागे फिरवण्यास सांगितला. तो घरी आला. त्याने एका खोलीत स्वत:ला कोंडून घेतलं. खूप विचार केला. कदाचित स्वत:साठी काही सांत्वन शोधून काढलं. कारण नंतर तो फिरण्यासाठी पुन्हा बाहेर पडला. त्याला आता आनंदी आणि प्रसन्न वाटत होतं. पण या वेळी त्याने एक आज़ारी माणूस पाहिला. काळानिळा पडलेला, थरथरणारा, नजर विझलेला असा तो हाडाचा सापळा त्याने पाहिला. आजपर्यंत राजपुत्रापासून आजारपण लपवून ठेवण्यात आलं होतं. त्या माणसाला पाहून राजपुत्र थांबला. 'हे काय आहे?' त्याने विचारलं तेव्हा त्याला कळलं की हे आजारपण आहे, कोणीही माणूस आजारी पडू शकतो आणि जरी तो आज आनंदी आणि प्रसन्न असला तरी उद्या तो स्वत:ही आजारी पडू शकतो. तेव्हा तो उदास झाला. त्याला आता मौजमजा करावीशी वाटेना. त्याने सारथ्याला परत फिरण्यास सांगितलं. तो घरी आला. त्याने एकांतात जाऊन विचार केला. कदाचित त्याने परत काहीतरी स्वत:चं सांत्वन शोधून काढलं. कारण परत तिसऱ्या वेळी तो मौजमजा करण्यासाठी बाहेर पडला. या वेळी त्यानं आणखी वेगळं दृश्य पाहिलं. त्याने काही माणसं काहीतरी खांद्यावरून नेताना पाहिली.

'हे काय आहे?' त्याने विचारलं.

'हा मेलेला माणूस आहे.'

'मेलेला म्हणजे काय?' राजपुत्र विचारलं.

'मरण म्हणजे हा माणूस जसा झाला आहे तसं होणं.' त्याला उत्तर मिळालं.

राजा त्या प्रेताजवळ गेला. त्या प्रेतावरची चादर त्याने बाजूला केली आणि त्या प्रेताकडे पाहिलं.

'आता याचं काय होईल?' त्याने विचारलं.

'आता हा जमिनीखाली पुरला जाईल.'

'कां?'

'कारण आता याच्यामध्ये जिवंतपणा येणार नाही. आता या प्रेतामधून दुर्गंधी सुटेल आणि त्याच्यात किडे वळवळतील.'

'आणि सर्वच माणसांच्या नशिबी असंच असतं का? माझंसुद्धा असंच होईल का? मलासुद्धा ते पुरतील का? माझ्यासुद्धा शरीरातून दुर्गंधी सुटेल का? मीसुद्धा किड्यांपासून खाल्ला जाईन का?'

'होय.'

'घरी... घरी चल. मी आता कधीही मौजमजेसाठी बाहेर पडणार नाही.'

आणि त्या शाक्यमुनीला जीवनात काही अर्थ वाटेना. आयुष्य ही सर्वात दुष्ट गोष्ट आहे असं त्याला वाटू लागलं. त्याने आपलं सर्वस्व पणाला लावून स्वत:ला आणि इतरांना जीवनापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. आणि मृत्यूनंतर परत जीवनाचं पुनर्निर्माण होऊ नये आणि जीवन पूर्णपणे नष्ट होऊन जावं यासाठी त्याने स्वत:ला वाहून घेतलं.

भारतीय शहाणपणा हे सांगतो.

तर, आयुष्याच्या प्रश्नांना मानवी शहाणपणाने दिलेली ही थेट उत्तरं आहेत.

सॉक्रेटिस म्हणतो, 'शरीराचं जगणं हा दुष्टपणा आहे. खोटेपणा आहे. शरीर नष्ट होऊन जाणं ही शुभघटना आहे. आपण त्याचीच आस ठेवली पाहिजे.'

शोपेनहॉवर म्हणतो, ‘आयुष्य म्हणज़े जे नको ते. आयुष्य म्हणजे केवळ दुष्टपणा. आयुष्यातली एकमेव चांगली गोष्ट म्हणजे ते शून्यात विलीन होतं.’

सॉलोमन म्हणतो, ‘जगात जे जे म्हणून काही आहे. - मूर्खपणा आणि सुज्ञपणा, ऐश्वर्य आणि दारिद्र्य, मौजमजा आणि दु:ख - ते ते सारं अर्थशून्य आणि पोकळ आहे. माणूस मरतो आणि त्याचे काहीएक राहत नाही. आणि तो मूर्खपणा आहे.’

बुद्ध म्हणतो, ‘दु:खाची, गलितगात्र होण्याची, म्हातारपणाची आणि मरणाच्या अपरिहार्यतेची जाणीव ठेवून जगणं अशक्य आहे - आपण जीवनापासून मुक्तता करून घेतली पाहिजे. जीवनाच्या सर्व शक्यतांपासून मुक्तता करून घेतली पाहिजे.’

या थोर माणसांनी जे सांगितलं त्याचा अनुभव माणसं पिढ्यान्‌पिढ्या घेत आली आहेत. तसेच विचार त्यांच्या मनात आले, तसेच उद्‌गार त्यांच्या तोंडून निघाले. मलासुद्धा तसाच अनुभव आला. तसाच विचार मीही केला.

अशा प्रकारे अनेक शास्त्रांचा मी धांडोळा घेतला. पण माझी बेचैनी दूर झाली नाही. उलट माझी बेचैनी, माझी निराशा आणखी दृढच झाली. ज्ञानाची एक शाखा जीवनाच्या प्रश्नांना उत्तरं देत नाही. दुसरी शाखा जी उत्तरं देतं त्यामुळे माझी अस्वस्थता आणखीनच वाढली. मात्र एक झालं. ज्या निष्कर्षाप्रत मी पोचलो होतो तो निष्कर्ष मी चुकीने काढला नव्हता की माझ्या रोगट मनोवृत्तीमुळे तो निघाला नव्हता, तर मी अत्यंत योग्य विचार केला होता आणि माझे विचार मानवी इतिहासातील थोर प्रतिभावंतांच्या निष्कर्षांशी मिळतेजुळते होते हे मला कळून चुकलं.

स्वत:ला फसवणं बरं नाही. सर्व काही पोकळपणा आहे. जो जन्मलाच नाही तो सर्वात सुखी. जिवंत राहण्यापेक्षा मरण चांगलं. प्रत्येकाने आयुष्यापासून स्वत:ची सुटका करून घेतली पाहिजे.

❑❑❑

७

विज्ञानामध्ये मला काही स्पष्टीकरण सापडलं नाही. मग मी ते स्पष्टीकरण प्रत्यक्ष जीवनात सापडतं का याचा शोध घेऊ लागलो. माझ्या आजूबाजूच्या लोकांच्या आयुष्याची मी पाहाणी करू लागलो. माझ्या आजूबाजूची माणसं म्हणजे माझ्यासारखी माणसं कशी जगतात आणि त्यांचा या प्रश्नाविषयी काय दृष्टिकोन आहे, याचा मी शोध घेतला. आणि मी निराश झालो.

माझ्याएवढ्या शिकल्यासवरलेल्या आणि माझ्यासारख्या रीतीभाती पाळणाऱ्या माझ्या वर्गातील माणसांचं मी सजगपणे निरीक्षण करू लागलो. या भयानक परिस्थितीला ते चार प्रकारे सामोरे जात होते.

पहिला प्रकार होता अज्ञानाचा. आयुष्य हे दुष्ट आहे, हास्यास्पद आहे हे या प्रकारातील माणसांना माहीतच नव्हतं. ते काही जाणतच नव्हते. या जातीच्या माणसांना-विशेषत: बायका, अगदी कोवळे तरुण आणि मठ्ठ माणसं यांना शोपेनहॉवर, सॉलोमन आणि बुद्ध यांना जो आयुष्याचा प्रश्न पडलेला होता तो पडलेलाच नसतो. त्यांच्यासाठी उंदीर आयुष्याची दोरी कुरतडत नसतात की काळसर्प खाली वाट पाहत बसलेला नसतो. ही माणसं मजेत मध चाटत बसलेली असतात-पण फक्त काही काळच. मग काहीतरी घडतं आणि त्यांचं लक्ष कुरतडणाऱ्या उंदरांकडे आणि वाट पाहत बसलेल्या काळसर्पाकडे जातं. या माणसांपासून मला काहीच शिकण्यासारखं नव्हतं. एखाद्याला जे उमजलेलं असतं ते तो, मला हे उमजलेलंच नाही, असं करू शकत नाही. एकदा पडलेली उमज पुसून टाकता येत नाही.

दुसरा प्रकार होता भोगवादी माणसांचा. त्यांना जीवनाची अर्थशून्यता कळलेली असते. पण तो काळसर्प आणि ते उंदीर यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष

करून ही माणसं जास्तीत जास्त मध चाटण्याचा प्रयत्न करत असतात. सॉलोमन या प्रकाराबद्दल म्हणतो, 'मग मी मौजमजेची प्रशस्ती केली. कारण खावं, प्यावं आणि मजेत असावं यापेक्षा दुसरी उत्तम गोष्ट या जगात नाही. जे आयुष्य देवाने माणसाला दिलं आहे त्या आयुष्यात कष्टाला उतारा म्हणून मौजमजा करणं हे योग्य आहे. म्हणून तुझी भाकरी तू सुखासमाधानाने खा. तुझी दारू तू मजेत पी. तुझ्या पोकळ आयुष्यात ज्या लाडक्या पत्नीवर तू प्रेम करतोस तिच्याबरोबर तू आनंदाने राहा. तुझं आयुष्य पोकळ आहे. तुझ्या आयुष्याचं आणि तुझ्या कष्टांचं हे एक फळ आहे. तुझ्या हातांना जे काही करण्यासारखं सापडेल ते तू तुझ्या शक्तीनिशी कर. कारण तू जिथे जाणार आहेस त्या थडग्यात ना काम आहे ना कामाचं साधन आहे. ना ज्ञान आहे, ना शहाणपण आहे.'

आणि अशा प्रकारे आमच्या वर्गातील बहुसंख्य माणसं आपलं जीवन सुसह्य करतात. त्यांच्या सांपत्तिक स्थितीमुळे त्यांना खडतर परिस्थितीशी सामना करावा लागत नाही. सर्व सुखसोयी त्यांना उपलब्ध असतात. त्यांच्या नैतिक अधूपणामुळे ते विसरू शकतात की केवळ अपघाताने त्यांना समाजातील हे स्थान आणि या सुखसोयी मिळालेल्या आहेत. सॉलोमनप्रमाणे प्रत्येकाला हजार बायका मिळतात तेव्हा हजारजण बायकोशिवाय राहतात आणि एक राजवाडा बांधण्यासाठी हजारो माणसांनी घाम गाळलेला असतो. तसंच ज्या अपघाताने आज मी सॉलोमन बनलो आहे त्याच अपघाताने उद्या सॉलोमनचा गुलाम बनू शकेन. या माणसांची कल्पनाही लुळीपांगळी असते. त्यामुळे बुद्धाला ज्या गोष्टी प्रतीत झाल्या आणि ज्यामुळे त्याची मन:शांती हरवली त्या - म्हणजे आजारपण, म्हातारपण आणि मृत्यू - यांची अपरिहार्यता त्यांना अस्वस्थ करू शकत नाही. या गोष्टी आज ना उद्या त्यांच्याही आयुष्यात येणार आणि त्यांची सर्व मौजमजा नष्ट करून टाकणार ही गोष्ट ते कधी ध्यानात घेत नाहीत.

आमच्या वर्गातील आजच्या काळातील बहुसंख्य माणसं असा विचार करतात आणि असं जीवन जगतात. काही माणसं त्यांच्या विचारशक्तीच्या आणि कल्पनाशक्तीच्या मठ्ठपणाला तत्त्वज्ञान समाजतात आणि त्या तत्त्वज्ञानाला सकारात्मक तत्त्वज्ञान म्हणतात. पण माझ्या मते अशा वागण्यामागे तत्त्वज्ञान वगैरे काही नसून केवळ मूळ प्रश्नाला बगल देणं आणि मध चाटत बसणं एवढंच आहे. मला या माणसांचं अनुकरण करणं शक्य नाही. कारण त्यांच्याएवढी माझी कल्पनाशक्ती मंद नाही आणि कृत्रिमरित्या मी ती मंद

करू शकत नाही. मी माझं लक्ष तो काळसर्प आणि उंदीर यांच्यापासून दूर वळवू शकत नाही. एकदा त्यांना पाहिल्यानंतर कोणीही जिवंत माणूस तसं करू शकणार नाही.

तिसरा प्रकार होता तो स्वत:ची सुटका करून घेण्याचा. पण त्याच्यासाठी सामर्थ्य हवं. आंतरिक बळ हवं. जेव्हा माणसाला कळून चुकतं की आयुष्य म्हणजे दुष्टपणा आहे, विसंगती आहे, तेव्हा ते संपवून टाकायचं अशी ती वाट आहे. अगदी मोजकी माणसं - ज्यांचं मन:सामर्थ्य अपवादात्मक दृष्ट्या श्रेष्ठ असतं आणि ज्यांच्या विचारात आणि वागण्यात एकरूपता असते, अशी माणसं ही वाट चोखाळतात. आपल्यावर एक अत्यंत मूर्ख असा विनोद करण्यात आला आहे हे जेव्हा त्यांना कळून येतं, जिवंत राहण्यापेक्षा मरणं जास्त चांगलं हे जेव्हा त्यांच्या लक्षात येतं, जेव्हा हे अस्तित्व पुसून टाकणं हेच योग्य अशी त्यांची खात्री पटते तेव्हा ते ताबडतोब हा मूर्ख विनोद थांबवून टाकतात. त्याची साधनं जवळपास असतातच. गळ्याभोवती दोरी गुंडाळून, पाण्यात उडी मारून, छातीत चाकू खुपसून घेऊन, आगगाडीखाली उडी घेऊन ते आपलं अस्तित्व मिटवून टाकतात. आमच्या वर्गात अशा माणसांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. बहुतेक वेळा अशी माणसं जेव्हा आयुष्याचा उत्तम भाग जगत असतात, जेव्हा त्यांच्या मानसिक शक्ती अगदी पूर्ण फुलारून आलेल्या असतात आणि जेव्हा मानसिक खच्चीकरण करणाऱ्या सवयी त्यांना लागलेल्या नसतात तेव्हाच ती आपल्या आयुष्याचा अंत करून घेतात.

अशा प्रकारे सुटका करून घेणं ही सर्वात योग्य गोष्ट आहे हे मला पटलं आणि या मार्गाचा अवलंब करावा, अशी प्रबळ इच्छासुद्धा मला झाली.

लोकांचा चौथा प्रकार हा दुबळेपणाचा होता. या लोकांना परिस्थितीचे सत्यस्वरूप दिसून येतं. त्यांना पक्कं माहीत असतं की आयुष्याला काहीही अर्थ नाहीये. तरी ते आयुष्याला घट्ट धरून राहतात. या प्रकारच्या माणसांना समजतं की मरून जाणं हे जिवंत राहण्यापेक्षा जास्त चांगलं आहे, पण आपल्या विचारांशी प्रामाणिक राहून त्याप्रमाणे वागणं हे त्यांना परवडत नाही. स्वत:ला संपवून टाकून ही फसवणूक लवकरात लवकर संपवून टाकावी, हा त्यांचा विचार असतो. पण या विचाराप्रमाणे वागण्याचं धैर्य त्यांच्याकडे नसतं. त्याऐवजी ते कशाचीतरी वाट पाहत राहतात. ही दुबळेपणाची पळवाट आहे. कारण जर मला हे समजतं की सर्वात योग्य गोष्ट कोणती आणि

ती गोष्ट करणं हे माझ्या हातात आहे, तर मग ती गोष्ट मी का करत नाहीये? मला आढळलं की मी स्वत: या प्रकारात मोडतो.

माझ्या वर्गातील माणसं जीवनाच्या या भयानक विसंगतीला अशा प्रकारे प्रतिसाद देतात. मी खूप निरीक्षण केलं तरी या चार प्रकारांव्यतिरिक्त आणखी कोणता प्रकार मला आढळला नाही. एक प्रकार म्हणजे आयुष्य हे निरर्थक आहे, पापी आहे, दुष्ट आहे, पोकळ आहे आणि जगण्यापेक्षा मरणं जास्त योग्य आहे हे लक्षातच घ्यायचं नाही. पण माझ्या ते लक्षात आलं होतं आणि आता परत पाटी पुसून कोरी करणं हे शक्य नव्हतं. दुसरा मार्ग म्हणजे भविष्याचा जराही विचार न करता आयुष्य जगत राहणं. हेही मला शक्य नव्हतं. तो शाक्य मुनी ज्याप्रमाणे म्हातारपण, आजारपण आणि मरण हे प्रत्येक माणसाला आहे हे लक्षात आल्यावर शिकारीसाठी परत बाहेर पडू शकला नाही, त्याप्रमाणे मीही या गोष्टी लक्षात आल्यानंतर मौजमजा करू शकत नव्हतो. माझी विचारशक्ती आणि कल्पनाशक्ती चांगली कार्यरत होती. माझ्या झोळीत आनंदाचे, मौजमजेचे काही क्षणिक कण पडत, पण त्यांचा उपभोग घेणं आणि आनंदित होणं हे मला शक्य नव्हतं. तिसरा मार्ग असा होता की आयुष्य हे अर्थशून्य, मूर्ख, दुष्ट आहे हे समजून आल्यानंतर त्याचा अंत करणं. मला हा पर्याय समजत होता. पण का कोण जाणे मी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला नाही. चवथा मार्ग हा सॉलोमन आणि शोपेनहॉवरचा होता. आयुष्य म्हणजे आपल्यावर कुणीतरी केलेला अत्यंत मूर्ख विनोद आहे हे नीट समजूनउमजून आल्यावरही जगत राहणं, स्नान करणं, कपडे घालणं, जेवण घेणं, बोलणं इतकंच काय पुस्तक लिहिणं. खरं तर हा मार्ग अगदी तिरस्करणीय आणि मनाला टोचणी लावणारा होता. पण मी मात्र त्याच अवस्थेत राहिलो.

आता मी मागे वळून पाहतो तेव्हा माझ्या हे लक्षात येतं की मी आत्महत्या केली नाही याचं कारण असं होतं की कुठेतरी माझ्या मनात माझ्या विचारांच्या खरेपणाबद्दल संशय होता. माझे विचार अयोग्य आहेत अशी अंधुकशी जाणीव मला होती. माझ्या अगोदरच्या त्या सुज्ञ माणसांचे आणि माझे त्यावेळचे विचार जरी अगदी खात्रीलायकरित्या, अगदी वादातीतपणे मला तर्कशुद्ध आणि खरे वाटत होते आणि त्यामुळे आयुष्याच्या निरर्थकपणाची मला खात्री पटली होती, तरी कुठेतरी अंधुकपणे मला माझ्या निष्कर्षाच्या खरेपणाबद्दल शंका होतीच.

त्याबद्दल असं सांगता येईल. मी म्हणजे माझ्या विचारशक्तीने ओळखलं की आयुष्य निरर्थक आहे. जर विचारशक्ती ही सर्वोच्च आहे, विचारशक्तीपेक्षा आणखी मोठं कुणीच नाही (आणि ती सर्वोच्च आहेच, त्याहून अधिक उच्च काहीतरी आहे असं सिद्ध करता येणार नाही) तर विचारशक्तीनेच माझ्यामध्ये जीवन उत्पन्न केलं आहे. जर विचारशक्ती अस्तित्वात नसती तर माझ्यासाठी जीवनच नसतं. तर मग विचारशक्ती जीवन कसं नाकारील? तीच तर जीवनाचे निर्माण करणारी आहे! किंवा हे उलटं असंही मांडता येईल - जर जीवन नसतं तर माझा विचारही नसता. म्हणून विचार हा जीवनाचा पुत्र आहे. जीवन म्हणजे सर्व काही. विचार हा जीवनाचेच फळ आहे. मग विचार जीवन कसं नाकारू शकतो? माझ्या लक्षात आलं की इथे काहीतरी गफलत आहे.

आयुष्य म्हणजे निरर्थक दुष्टपणा आहे हे निश्चितच, मी स्वत:शी विचार केला. पण तरीसुद्धा मी जगलो आहे आणि आतासुद्धा जगत आहे. आणि सर्व मानवजात जगली आहे आणि जगत आहे. हे कसं? न जगणं, आयुष्याचा अंत करणं हे आपल्या हातात असतं. तरीसुद्धा माणसं जगत कां राहतात? असं तर नाही ना की फक्त मी आणि शोपेनहॉवर हेच दोघे इतके शहाणे की त्यांनाच फक्त आयुष्याचा निरर्थकपणा आणि दुष्टपणा जाणवला?

आयुष्याचा पोकळपणा दाखवणारा तर्क आणि विचार हा फारसा कठीण नाही. अगदी साध्या माणसालासुद्धा तो फार पूर्वीपासून माहीत आहे. पण तरीसुद्धा माणसं आयुष्य जगत राहिली आणि जगत आहेत. आयुष्याच्या अर्थपूर्णतेचा संशय न घेता माणसं जगत राहतात. हे त्यांना कसं शक्य होतं?

माझ्या ज्ञानाला पवित्र विभूतींच्या आणि संतांच्या वचनांचा आधार मिळाला होता. माझ्या ज्ञानाने मला दाखवून दिलं होतं की या पृथ्वीवरच्या प्रत्येक सेंद्रिय आणि असेंद्रिय गोष्टीची रचना अत्यंत कौशल्याने झालेली आहे, फक्त माझी अवस्था पार मूर्खपणाची आहे. उलट ही सर्व माणसं-ही बिनडोक माणसं-त्यांना सेंद्रिय किंवा असेंद्रिय पदार्थांची रचना वगैरेंची काहीएक माहिती नाही. पण ती जगतात. त्यांना वाटतं की त्यांचं आयुष्य हे मौल्यवान आहे आणि त्यांना त्यांच्या जगण्यामध्ये एक सुव्यवस्था दिसते.

आणि मला एकदम वाटलं, 'पण जर आपणाला अजूनही न समजलेली अशी एखादी गोष्ट असेल तर? अज्ञानी माणूस अगदी असाच वागतो. जसा मी बोलतोय तसाच अज्ञानी माणूस बोलत असतो. जेव्हा त्याला एखादी

गोष्ट माहीत नसते तेव्हा तो म्हणतो की त्याला अज्ञात असलेली ती गोष्ट मूर्ख आहे. खरं तर असं दिसतंय की सर्व माणसं आपलं आयुष्य अशा प्रकारे जगली आहेत आणि जगत आहेत की त्यांना आयुष्याचा अर्थ कळलेला होता. कारण त्याशिवाय ती आयुष्य जगूच शकली नसती. पण मी एकटा म्हणतोय की आयुष्य हे अर्थशून्य आहे आणि ते मी जगू शकत नाही.'

'आयुष्याला नकार देऊन आत्महत्या करण्याला आम्हाला कोणी प्रतिबंध करत नाहीये. असं आहे तर मग संपवून टाक स्वत:ला आणि मग तुझा सगळा वादविवादच संपून जाईल. जर आयुष्य तुला बेचव, बेकार वाटत असेल तर मारून टाक ना स्वत:ला. तू जगत आहेस आणि तुला आयुष्याचा अर्थ कळत नाहीये - मग कर अंत आयुष्याचा. आणि आयुष्याच्या अर्थाबद्दल वगैरे घोळ घालत बसू नकोस. कुणाला सांगत किंवा लिहीत बसू नकोस की तुला आयुष्य कळत नाहीये. तुला चांगली संगतसोबत लाभली आहे. तुझ्या आजूबाजूचे लोक समाधानी आहेत आणि त्यांना आपण काय करतोय हे नीट माहीत आहे. तुला जर ते सर्व नीरस आणि तिरस्करणीय वाटत असेल तर ते सोडून दे. अगदी कायमचं सोडून दे.'

पण खरंच आम्ही लोक, ज्यांना आत्महत्येची आवश्यकता पटलेली आहे, पण जे ती करत नाहीत, ते सर्व सर्वात दुबळे, सर्वात चंचल आणि सरळसरळ सांगायचं तर सर्वात मूर्ख माणसं आहोत. आणि एखादा बथ्थड माणूस रंगरंगोटी केलेल्या वेश्येशी करतो त्या बोलाचालीसारखा आमचा हा मूर्खपणाचा घोळ चाललेला आहे. आमचा शहाणपणा मारे वादातील आहे पण त्या शहाणपणाने आयुष्याचा अर्थ कोणता हे आम्हाला सांगितलेलं नाही. पण सर्व मानवजात, ते कोटीकोटी लोक - ते सारेजण जीवन चालू ठेवतात आणि त्यांना आयुष्याच्या अर्थपूर्णतेबद्दल शंकासुद्धा येत नाही.

खरंच... ज्याबद्दल मला जरासुद्धा माहिती नाही अशा त्या अत्यंत प्राचीन काळापासून, म्हणजे जेव्हा जीवन या पृथ्वीतलावर सुरू झालं तेव्हापासून, माणसं जगत आली आहेत. ज्या पोकळपणामुळे मला आयुष्य निरर्थक वाटतंय तो जीवनाचा पोकळपणा त्यांनाही जाणवला होता... तरी ती जगत राहिली. त्यांना आयुष्यात काहीतरी अर्थ गवसला आणि ती जगत राहिली.

या पृथ्वीतलावर माणसांचं आयुष्य सुरू झालं अगदी तेव्हापासून त्या माणसांना आयुष्याचा अर्थ सापडला आणि ती माणसं आपलं जीवन जगली. ते जीवन आज माझ्यापर्यंत आलंय. माझ्यामध्ये जे जे आहे, माझ्या सभोवताली

जे जे आहे ते ते सर्व, दैहिक आणि विदेही सर्व काही त्यांच्या जीवनविषयक ज्ञानाचं फळ आहे. ज्या विचारांची मदत घेऊन मी आयुष्याचा विचार करतो आणि त्याला दोष देतो त्या विचारांच्या साधनांचा शोध मी नाही, तर त्यांनी लावला. मी स्वत: जन्मलो, शिकलो, मोठा झालो याचं श्रेय त्यांना आहे. त्यांनी लोखंड शोधून काढलं, जंगलं कापली, गायीगुरं आणि घोडे माणसाळवले, आम्हाला शेती शिकवली, एकत्र राहायला शिकवलं, आम्हाला व्यवस्था दिली, आम्हाला बोलायला शिकवलं, विचार करायला शिकवलं. आणि मी, त्यांचाच वंशज, त्यांच्याकडून खाणंपिणं मिळालेला, त्यांच्याकडून शिक्षण मिळालेला, त्यांचे विचार आणि शब्द वापरणारा, असा मी आज त्यांनाच मूर्ख ठरवतोय. मी स्वत:शी म्हटलं 'यात काहीतरी भयानक गफलत आहे. मी कुठंतरी मोठी चूक केलेली आहे.' पण ती चूक कुठं आहे हे शोधायला मला बराच काळ घालवावा लागला.

□

८

या सर्व शंका आज मी व्यवस्थितपणे मांडतोय, पण त्यावेळी त्या नीटपणे व्यक्त करणं मला शक्य नव्हतं. मला त्या वेळी कुठंतरी असं वाटायचं की आयुष्य हे पोकळ आहे, अर्थशून्य आहे, असं जरी तर्कशुद्धरित्या, अपरिहार्यपणे दाखवता आलं आणि जरी थोर विचारवंतांनीही तसंच म्हटलेलं असलं तरी ते तितकंसं खरं नाही. माझी तर्कप्रणाली चूक होती की माझा प्रश्न मी नीटपणे मांडलेला नव्हता हे मला माहीत नाही. पण मला एवढं जाणवत होतं की ज्या निष्कर्षाप्रत मी येऊन पोचलो होतो तो निष्कर्ष जरी तर्कदृष्ट्या अचूक असला तरी तो निष्कर्ष अर्धवट आहे. काहीतरी कुठंतरी गोम आहे. माझा विचार टोकापर्यंत नेऊन खरं तर मी आत्महत्या केली पाहिजे होती. पण माझे निष्कर्ष मला तिथपर्यंत घेऊन जाऊ शकले नाहीत. तितकी माझी खात्री ते पटवू शकले नाहीत. मी आत्महत्या केली नाही याचाच अर्थ मी पूर्णपणे निष्कर्षापर्यंत पोचलो नाही. माझ्या विचारशक्तीने, तर्कबुद्धीने आपलं काम केलं, पण त्याचवेळी आणखी एक प्रेरणा माझ्या मनात होती. तिला मी जीवनाची जाणीव म्हणेन. ही प्रेरणा मला, 'इकडे लक्ष दे, तिकडे लक्ष देऊ नको,' असं बजावत होती. या प्रेरणेमुळेच मी माझ्या भयानक परिस्थितीतून सावरलो आणि माझं लक्ष पूर्णपणे वेगळ्या दिशेकडे वळलं. या प्रेरणेने मला दाखवून दिलं की मी आणि माझ्यासारखे शेशंभर लोक म्हणजे अख्खी मानवजात नव्हे आणि मानवजातीचं आयुष्य हे मला अजून उमजलेलं नाही.

माझ्यासारख्या लोकांच्या छोट्याशा वर्गाचंच मी जेव्हा निरीक्षण करत होतो तेव्हा मला चार प्रकारची माणसं दिसली होती. त्यातील काहींना हा प्रश्नच पडला नव्हता, दुसऱ्या काहींना हा प्रश्न पडला होता पण त्यांनी

तो जीवनाच्या नशेमध्ये बुडवून टाकला होता, तिसऱ्या काहींनी या प्रश्नाचं उत्तर आत्महत्या करून देऊन टाकलं होतं तर चौथ्या काहींना हा प्रश्न समजला होता, पण त्यांच्या दुबळेपणामुळे ते त्यांच्या भयानक आयुष्याला चिकटून बसले होते. एवढीच माणसं मला दिसली होती. मला तेव्हा वाटलं होतं की माझ्यासारखी श्रीमंत, विद्वान आणि सुखवस्तूपणे जगणारी माणसं म्हणजेच जणू काही सारी मानवजात. बाकीची कोट्यवधी माणसं—जी या पृथ्वीतलावर आपलं आयुष्य जगून निघून गेली आहेत किंवा जी आताही जगत आहेत ती जणू काही कुठल्यातरी प्रकारची गुरंढोरं आहेत-खरी माणसंच नाहीयेत.

आता ते मला सारं विचित्र वाटतंय, अविश्वसनीय वाटतंय, समजण्याच्या पलीकडचं वाटतंय-पण ज्या वेळी मी आयुष्याबद्दल विचार करत होतो त्या वेळी माझ्या आजूबाजूला असलेली ही कोट्यवधी माणसं मी विचारातच घेतली नव्हती. माझी भयानक चूक ही होती की माझं किंवा सॉलोमनचं किंवा शोपेनहॉवरचं आयुष्य हेच खरं, योग्य आयुष्य असं मला वाटत होतं. बाकी कोट्यवधी लोक जगतात ते आयुष्य काही विचारात घेण्याजोगी गोष्ट नाही असं मी समजत होतो. खरंच किती विचित्र गोष्ट आहे ही. पण मी तेव्हा असंच समजत होतो. बुद्धिमत्तेचा मला गर्व होता आणि त्या गर्वाच्या भ्रमात मला असं वाटत होतं की मी आणि सॉलोमन आणि शोपेनहॉवर यांनी आयुष्याचा प्रश्न इतक्या खरेपणाने आणि नेटकेपणाने मांडला आहे आणि तो इतका वादातीत आहे की त्याला दुसरी काही बाजू असणंच शक्य नाही. ही जी कोट्यवधी माणसं आहेत त्यांना या प्रश्नाचं गांभीर्य काय उमजणार? मला तेव्हा एकदाही शंका आली नाही की ही कोट्यवधी माणसं आहेत, जी जगताहेत किंवा जीवन जगून गेली आहेत त्यांनी आयुष्यात काय अर्थ शोधला? त्यांचं आयुष्य त्यांनी कोणत्या प्रकारे अर्थपूर्ण केलं?

या वेडेपणाच्या अवस्थेत मी बराच काळ होतो. आमच्यासारख्या फार उदारमतवादी आणि फार विद्वान माणसांचं अशी वेडेपणाची अवस्था हे एक वैशिष्ट्यच असतं. पण माझ्यामध्ये, जी माणसं खरोखर श्रम करतात, खरोखर उन्हातान्हात राबतात त्यांच्याविषयी अंगभूतच प्रेम आहे. या प्रेमामुळे त्यांचं जीवन बघावं, समजून घ्यावं, असं मला वाटू लागलं. आम्ही त्यांना जेवढे मूर्ख समजतो तेवढे काही ते मूर्ख नाहीत हे मला समजलं. दुसरी गोष्ट मला माझ्या अंत:प्रेरणेतून कळली—ती म्हणजे माझ्या विचारांची तर्कशुद्ध परिणती म्हणजे स्वत:ला फास लावून घेणं. त्यामुळे जर मला जगायचं असेल आणि आयुष्याचा अर्थ शोधून काढायचा असेल, तर ज्यांनी तो अर्थ गमावलेला

आहे किंवा जे आत्महत्येच्या मार्गावर आहेत अशा लोकांच्या जीवनात तो अर्थ शोधणं व्यर्थ आहे. हे कोट्यवधी लोक मानवजातीचं जीवन चालू ठेवतात आणि हेच लोक स्वत:च्या, इतकंच नव्हे तर आमच्यासारख्यांच्या आयुष्याचं ओझं वाहत असतात. आणि मी या कोट्यवधी अडाणी, गरीब आणि साध्यासुध्या माणसांच्या आयुष्याचा विचार सुरू केला. आता मला एक वेगळंच दृश्य दिसलं. काही अपवाद वगळता ही कोट्यवधी माणसं माझ्या वर्गवारीत मोडत नव्हती. त्यांना आयुष्याचा प्रश्न समजला नव्हता असं अजिबात नाही. कारण हे लोक स्वत:च तो प्रश्न मांडत असतात आणि त्याचं उत्तर अत्यंत स्पष्टपणे देत असतात. त्यांना भोगवादी म्हणणं तर शक्यच नाही. कारण त्या बिचाऱ्यांचं अख्खं आयुष्य गरिबीत आणि हे आहे तर ते नाही, ते आहे तर हे नाही असं चाललेलं असतं. दु:ख सदाचं आणि आनंद कधीमधीच असा त्यांच्या आयुष्याचा जमाखर्च असतो. पण आपलं अर्थशून्य आयुष्य ते अतार्किकपणे ढकलीत असतात असंही मी म्हणून शकणार नाही. कारण आपल्या आयुष्यातील प्रत्येक घटनाप्रसंगाचं इतकंच काय पण मृत्यूचंही स्पष्टीकरण ते देतात. आत्महत्या करणं ही सर्वात वाईट गोष्ट ते मानतात. माझ्या लक्षात आलं की सर्व मानवजातीला (जिच्याकडे मी तुच्छतेने पाहत होतो आणि जिला विचारातही घेत नव्हतो.) आयुष्याचा अर्थ काय आहे हे माहीत होतं आणि आहे. तार्किक ज्ञान आयुष्याचा अर्थ काय हे सांगत नाही. तार्किक ज्ञान आयुष्य वगळूनच टाकतं. कोट्यवधी लोक, अख्खी मानवजात, आयुष्यात जो अर्थ शोधते तो अर्थ कुठल्यातरी अतार्किक ज्ञानावर-ज्याकडे तुच्छतेने बघितलं जातं अशा ज्ञानावर-आधारित आहे.

शहाण्या आणि विद्वान माणसांनी पुरस्कारलेलं तार्किक ज्ञान आयुष्याला काही अर्थ आहे हे नाकारतं. पण सर्व मानवजात आयुष्याचा अर्थ अतार्किक ज्ञानाच्या आधारावर शोधते. हे अतार्किक ज्ञान म्हणजे श्रद्धा. तीच ती श्रद्धा जिला मी सपशेल नकार देतो. ती श्रद्धा म्हणजे ईश्वर, पवित्र त्रिमूर्तीमध्ये एक, सहा दिवसात विश्वाचं निर्माण, देवदूत आणि सैतान आणि बाकीचं सगळं-या सर्वांना स्वीकारणं. जोपर्यंत विवेकशक्तीवर माझा विश्वास आहे तोपर्यंत असलं काही स्वीकारणं मला शक्य नाही.

माझी स्थिती भयंकर होती. मला समजत होतं की तार्किक ज्ञानाच्या मार्गाने मी गेलो तर मला आयुष्याला नकार देणं याशिवाय दुसरंतिसरं काही मिळणार नाही. आणि दुसरीकडे श्रद्धेमध्ये बुद्धीला, विवेकाला, तर्काला सोडचिठ्ठी होती. अशी सोडचिठ्ठी देणं आयुष्याला नकार देण्यापेक्षाही

माझ्यासाठी जास्त अशक्य होतं. तर्कसुसंगत विचार केला तर आयुष्य हे केवळ अर्थशून्य, दुष्ट आहे असं दिसून येत होतं. आणि सर्व लोकांना हे माहीत असतं. जगावं किंवा न जगावं हे त्यांच्या मनावर अवलंबून असतं. तरी ते जगतात. मीसुद्धा जगत आहे. मलाही केव्हापासून माहीत आहे की आयुष्य अर्थहीन आणि दुष्ट आहे. श्रद्धाळू दृष्टीने जर आयुष्याकडे बघितलं तर असं वाटतं की आयुष्याचा अर्थ समजण्यासाठी मी माझी बुद्धी, विचारशक्ती, तर्क, सारासार विवेक या साऱ्यांना सोडून दिलं पाहिजे. पण त्या सोडून देण्यालासुद्धा काही अर्थ पाहिजे.

□

९

एक चमत्कारिक पेच उभा राहिला-ज्यामध्ये दोन शक्यता होत्या. एक म्हणजे ज्याला मी तर्कशुद्ध समजत होतो ते तेवढंसं तर्कशुद्ध नव्हतं किंवा जे मला तर्काशी फटकून वागणारं वाटत होतं ते तेवढंसं अतार्किक नव्हतं. मग मी माझ्या पूर्वीच्या मला तर्कशुद्ध वाटणाऱ्या विचारसरणीची पुन्हा तपासणी करू लागलो.

जेव्हा मी अशी तपासणी करू लागलो तेव्हा मला आढळलं की ही विचारसरणी अगदी अचूक आहे. आयुष्य हे व्यर्थ आहे हाच निष्कर्ष ही विचारसरणी काढू शकते. पण मला एक चूक आढळली. माझा तर्क हा माझा प्रश्नाशी सुसंगत नव्हता. माझा प्रश्न असा होता 'मी कां जगावं?' म्हणजेच 'माझ्या या क्षणिक, भ्रामक जगण्यातून काय खरं, काय शाश्वत असं निष्पन्न होणार आहे? माझ्या अस्तित्वाला अंत आहे आणि हे विश्व अनंत आहे. मग अनंत विश्वामध्ये माझ्या अस्तित्वाला काय अर्थ आहे?' या प्रश्नाचं उत्तर मिळवण्यासाठी मी आयुष्याचा शोध घेतला होता.

आयुष्याच्या प्रश्नाबाबतची कोणतीच उत्तरं माझं साहजिकच समाधान करू शकली नाहीत. कारण माझा प्रश्न जरी वरवर साधा वाटला तरी तो जे स्पष्टीकरण मागत होता ते अनंताचं सांताच्या संदर्भात आणि सांताचं अनंताच्या संदर्भात असं होतं.

मी विचारत होतो, 'काळ, कारण आणि अवकाश यांचा संदर्भ सोडून दिला तर माझ्या आयुष्याला काय अर्थ आहे?' आणि मी उत्तर देत होतो, 'काळ, कारण आणि अवकाश यांच्या संदर्भात माझ्या आयुष्याला काय अर्थ आहे?' या प्रश्नाला. त्यामुळे बराच विचार करून मी उत्तर शोधून काढलं,

'कोणताही अर्थ नाही.'

माझ्या विचारप्रक्रियेमध्ये मी सतत अनंताची अनंताशी आणि सांताची सांताशी तुलना केली. (आणि अर्थात मी दुसरं काही करूच शकत नव्हतो.) पण त्यामुळे मी एका अपरिहार्य निष्कर्षाप्रत पोचलो-तो म्हणजे वस्तुमान वस्तुमान आहे. जोर जोर आहे, इच्छा इच्छा आहे. अनंत अनंत आहे. शून्य शून्य आहे. आणि हेच निष्कर्ष येणं क्रमप्राप्त होतं.

गणितामध्ये केव्हाकेव्हा होतं तसं हे झालं. आपण एखादं समीकरण सोडवायला जातो. आणि शेवटी आपणाला समजतं की आपण समरूपापर्यंत येऊन पोचलेलो आहोत. आपण विचार बरोबर केलेला असतो, पण उत्तर आलेलं असतं क्ष बरोबर क्ष, अ बरोबर अ, किंवा शून्य बरोबर शून्य. आयुष्याच्या अर्थाचं समीकरण शोधताना मीपण अशाच प्रकारच्या निष्कर्षाला येऊन पोचलो होतो. विज्ञानाने माझ्या प्रश्नाला दिलेलं उत्तर असंच समरूप होतं.

आणि खरोखरीच काटेकोर वैज्ञानिक ज्ञान, जे ज्ञान देकार्तेच्या 'सर्व गोष्टींबद्दल पूर्ण शंका आणि काहीच गृहीत न धरणं' या सांगण्यापासून सुरू होतं, ते ज्ञान श्रद्धेला स्वीकारून मिळालेलं कोणतंही ज्ञान नाकारतं. वैज्ञानिक ज्ञान बुद्धी आणि अनुभव याचाच फक्त आधार घेतं. त्यामुळे आयुष्याच्या प्रश्नाला त्याच्याकडे समाधानकारक उत्तर नसतं. मला खरं तर पहिल्यांदा वाटलं होतं की ज्ञानाने आयुष्याच्या प्रश्नाला सकारात्मक उत्तर दिलेलं आहे. ते म्हणजे शोपेनहॉवरचं उत्तर. म्हणजे 'आयुष्याला काही अर्थ नाही. आयुष्य ही दुष्ट, वाईट, सैतानी गोष्ट आहे.' मला प्रथम हे उत्तर वाटलं. पण नंतर जेव्हा मी अधिक खोलात जाऊन विचार केला तेव्हा मला समजलं की हे काही सकारात्मक उत्तर नाहीये तर माझ्या मनात जे काही चाललंय त्याचंच हे प्रतिरूप आहे आणि मला ते उत्तर वाटतंय. अगदी काटेकोरपणे सांगायचं तर ब्राह्मणाने किंवा सॉलोमनने किंवा शोपेनहॉवरने दिलेलं उत्तर हे संदिग्ध आणि प्रश्नाचं केवळ प्रतिरूप आहे. ते उत्तर म्हणजे शून्य बरोबर शून्य आणि आयुष्य म्हणजे एक भलं मोठं शून्य असं आहे. अशा प्रकारे तत्त्वज्ञान काही नाकारत नाही. पण हा आयुष्याचा प्रश्न सोडवता येत नाही एवढंच सांगतं. प्रश्नाची सोडवणूक तत्त्वज्ञानी ज्ञानासाठी संदिग्धच राहते.

मला हे समजल्यावर हेही समजलं की तार्किक ज्ञानामध्ये माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळणार नाही. मी माझा प्रश्न जर वेगळ्या तऱ्हेने मांडला आणि सांताची

आणि अनंताची सांगड घातली तरच हे उत्तर मिळू शकेल. तसंच हेही माझ्या लक्षात आलं की श्रद्धेवर आधारलेलं उत्तर कितीही अतार्किक आणि विसंगतीने भरलेलं असलं तरी त्याच्यामध्ये सांताची आणि अनंताची सांगड घातलेली असते. आणि त्यामुळे ते जास्त योग्य उत्तर आहे.

कुठल्याही प्रकारे मी प्रश्न मांडला तरी या उत्तरामध्ये ही सांताची आणि अनंताची सांगड येतेच.

'मी कसे जगावे?'

'देवाच्या कायद्यानुसार.'

'माझ्या आयुष्यापासून खरोखरीचं असं काय निष्पन्न होईल?'

'शाश्वत दु:ख किंवा शाश्वत सुख.'

'आयुष्याचा असा कोणता अर्थ आहे जो मृत्यू नष्ट करू शकत नाही?'

'परमात्म्याशी मीलन आणि स्वर्गप्राप्ती.'

तर्क आणि विवेक यांवर आधारित असलेलं ज्ञान हेच खरं ज्ञान असं मला वाटत होतं. पण आता मला समजलं की सर्व मानवजातीकडे अतार्किक ज्ञान म्हणजेच श्रद्धा याचं बळ असतं आणि या श्रद्धेच्या जोरावर त्यांना जगणं शक्य होतं. श्रद्धा ही तर्काशी, विवेकाशी फटकून वागणारी आहे, हे माझं मत कायमच राहिलं. पण केवळ श्रद्धाच आयुष्याच्या प्रश्नाला उत्तर देते आणि त्यामुळे जगणं शक्य करते हे मला मान्य करावं लागलं. तार्किक ज्ञानाने मला पटवून दिलं होतं की आयुष्य निरर्थक आहे. माझं आयुष्य ठप्प झालं होतं. या आयुष्याचा अंत करावा असं मला वाटू लागलं होतं. आजूबाजूला पाहिलं तेव्हा मला दिसलं की माणसं जगत आहेत आणि सांगत आहेत की आयुष्याचा अर्थ त्यांना समजला आहे. मी जेव्हा माझं आयुष्य पुन्हा तपासलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की जोपर्यंत मला आयुष्यात अर्थ वाटत होता तोपर्यंत मी जगत होतो. श्रद्धेने जगत होतो. श्रद्धेने ज्याप्रमाणे इतरांना जगायला बळ दिलं होतं त्याचप्रमाणे मलाही जगायला बळ दिलं होतं.

मी सर्वत्र पाहिलं. देशोदेशीची माणसं, माझे समकालीन, माझे पूर्वज साऱ्यासाऱ्यांना जगायला आधार श्रद्धेनेच दिला होता. जिथेजिथे जीवन आहे, अगदी माणूस या पृथ्वीतलावर अवतीर्ण झाला तेव्हापासून, श्रद्धेनेच त्याचं

जीवन सुसह्य केलं आहे. आणि या श्रद्धेची बाह्यरेखा सर्वत्र सारखीच आहे.

श्रद्धा कोणतीही असो, कोणतीही उत्तरं ती देवो, कोणालाही उद्देशून ती उत्तरं असोत, ती सर्व उत्तरं माणसांच्या मर्यादित अस्तित्वाला अमर्याद अर्थ प्राप्त करून देतात. असा अर्थ की जो दु:ख, दैन्य, वेदना, वंचना किंवा मृत्यू नष्ट करू शकत नाही. म्हणजे फक्त श्रद्धेमुळेच आम्ही आयुष्याला अर्थ आहे असं मानू शकतो. त्यामुळे आयुष्य शक्य होतं. आणि ही श्रद्धा म्हणजे तरी काय? श्रद्धा म्हणजे केवळ 'अद्‌भुताचा पुरावा' वगैरे नाही आणि ही श्रद्धा म्हणजे केवळ साक्षात्कार नाही. (ते श्रद्धेचं एक लक्षण आहे.) श्रद्धा म्हणजे माणसाचा देवाशी असलेला संबंध केवळ नाही. (कुणालाही प्रथम श्रद्धेची व्याख्या करावी लागेल आणि नंतर देवाची. म्हणजे देवाच्या संकल्पनेमधून श्रद्धेची व्याख्या करणं योग्य नाही) किंवा जे लहानपणापासून सांगण्यात आलं आहे त्यावरचा विश्वास म्हणजे केवळ श्रद्धा नव्हे. (पण बहुतेक वेळा लहानपणी सांगितलेल्या गोष्टींवरचा विश्वास म्हणजे श्रद्धा असं मानण्यात येतं.) तर श्रद्धा म्हणजे आयुष्याच्या अर्थाचं ज्ञान-ज्यामुळे माणूस आयुष्याचा अंत करीत नाही - तर जगतो. श्रद्धा आयुष्याचं बळ आहे. माणूस जगतो तेव्हा तो कशावर तरी विश्वास ठेवतो. कशासाठी तरी जगलं पाहिजे यावर माणसाचा विश्वास नसेल तर तो जगणं संपवून टाकतो. जर आपल्या मर्यादित अस्तित्वाचा भ्रामकपणा त्याला समजलाउमजला नाही तर तो त्या मर्यादित अस्तित्वालाच खरं मानत राहतो. जर आपल्या मर्यादित अस्तित्वाचा भ्रामकपण त्याला उमगला तर त्याला अमर्यादामध्ये, अनंतामध्ये विश्वास ठेवला पाहिजे. कशावर तरी श्रद्धा ठेवल्याशिवाय त्याला जगता येणार नाही.

आणि मी माझी सारी मानसिक उलघाल डोळ्यांसमोर आणली आणि भयचकित झालो. आता हे मला स्पष्ट झालं की जर माणसाला जगायचं असेल तर त्याने अनंत, अमर्याद पाहता कामा नये किंवा त्याच्याजवळ आयुष्याच्या अर्थाचं असं काही स्पष्टीकरण हवं की जे अनंताची सांताशी, अमर्यादिततेची मर्यादिततेशी सांगड घालू शकेल. असं स्पष्टीकरण एके काळी माझ्याजवळ होतं. पण जोपर्यंत माझा माझ्या मर्यादिततेवर, स्वत:वर विश्वास होता तोपर्यंत मला त्या स्पष्टीकरणाची गरज नव्हती. आता ते स्पष्टीकरण मी बुद्धीच्या निकषावर घासून पाहिलं, पण बुद्धीचा कस लावताच साऱ्या स्पष्टीकरणाचा पार भुगा होऊन गेला. आता असा काळ आला की माझा मर्यादिततेवरचा विश्वास उडून गेला. तेव्हा मी बुद्धीच्या, तर्काच्या, विवेकाच्या पायावर आयुष्याचा, जगण्याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या

हाती काहीच लागलं नाही. मी मानवी इतिहासात होऊन गेलेल्या प्रतिभावंतांची मदत घेतली. पण माझ्या हाती एवढंच आलं की शून्य बरोबर शून्य. आणि मला समजलं की हा रस्ता येथेच जाणार आणि येथेच संपणार.

मी जेव्हा प्रयोगविज्ञानामध्ये माझ्या प्रश्नाचं उत्तर शोधत होतो तेव्हा मी काय करतो होतो? मी का जगतोय याचं उत्तर मला हवं होतं. म्हणून मी माझ्या बाहेरचं सर्व काही शोधलं. अर्थात मी बरंच काही शिकलो, पण मला जे मिळवायचं ते काही मिळालं नाही.

मी जेव्हा तत्त्वज्ञानामध्ये माझ्या प्रश्नाचं उत्तर शोधत होतो तेव्हा मी काय करत होतो? मी ज्या मनस्थितीमध्ये आहे त्याच मनस्थितीमध्ये जे होते त्यांचे विचार अभ्यासत होतो. त्यांनाही 'मी का जगत आहे' या प्रश्नाचं उत्तर सापडलं नव्हतं. अर्थातच मला स्वत:ला जे माहीत होतं त्या व्यतिरिक्त त्यांच्यापासून मला काहीच शिकता आलं नाही. आणि मला स्वत:ला काय माहीत होतं-तर काहीही जाणता येत नाही, कशाचाही अर्थ लावता येत नाही, हे.

मी कोण आहे-तर अनंताचा एक अंश. या एवढ्याशा शब्दात सर्व प्रश्न सामावलेला आहे.

असं शक्य आहे का की मानवजातीने हा प्रश्न केवळ कालच स्वत:समोर उभा केलेला आहे? आणि माझ्याव्यतिरिक्त कुणीच हा प्रश्न स्वत:ला विचारलेला नव्हता? एवढा सोपा प्रश्न जो प्रत्येक शहाण्या मुलाच्या तोंडी असतो...

माणूसजात जेव्हा निर्माण झाली तेव्हापासून हा प्रश्न नक्कीच विचारला जातोय. आणि त्याचं उत्तर शोधलं जातंय. सांताची सांताशी आणि अनंताची अनंताशी सांगड घालून या प्रश्नाचं उत्तर कधीही मिळणारं नाही, हेही माणसाच्या लक्षात आलं. जेव्हा सांताची सांगड अनंताशी घातली गेली तेव्हाच या प्रश्नाचं उत्तर हाती आलं.

ईश्वर, ईश्वरेच्छा, चांगुलपणा या सर्व संकल्पना सांताचा संबंध अनंताशी जोडणाऱ्या आहेत. त्यांच्यामुळे आयुष्याला अर्थ प्राप्त होतो. पण या संकल्पनांना जर तर्कबुद्धीच्या कसोटीवर घासून पाहिलं तर त्या खोट्या ठरतात.

लहान मूल अभिमानानं आणि स्वत:वर खूश होऊन घड्याळ हाती घेतं. त्याचे तुकडेतुकडे करतं. त्याची स्प्रिंग हातात घेऊन त्या स्प्रिंगचं खेळणं

बनवतं. मग ते मूल आश्चर्यचकित होतं की आता घड्याळ कसं चालत नाही. आम्ही असंच करत असतो. आमचं करणं भयानक असतं आणि फार फार हास्यास्पदही असतं.

सांत आणि अनंत यांच्यामधली दरी भरून काढणं आणि 'माझ्या जीवनाचं प्रयोजन काय आहे?' या प्रश्नाला उत्तर देऊन आयुष्य जगणं शक्य करणं या गोष्टी अतिशय मौलिक आणि आवश्यक आहेत. या गोष्टी श्रद्धा करते. ही श्रद्धा आपण सर्वत्र पाहतो. सर्व प्रकारच्या लोकांमध्ये ही श्रद्धा वसत असते. अगदी प्रागैतिहासिक काळापासून मानवाने श्रद्धा ठेवली आहे. हा श्रद्धेचा शोध अतिशय कठीण आणि मौल्यवान आहे. त्याच्याशी कशाचीही तुलना होऊ शकत नाही. आम्ही मजेत श्रद्धेच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडवून टाकतो आणि परत तो प्रश्न उभा करतो. असा प्रश्न की जो नैसर्गिकपणेच प्रत्येकजण विचारत असतो आणि ज्याला आमच्याकडे काही उत्तर नाही.

अनंत, अमर्याद असा ईश्वर, आत्मा आणि परमात्मा यांचा संबंध, मानवी आयुष्याचा ईश्वराशी असलेला संबंध, आत्म्याचे एकत्व आणि अस्तित्व, नैतिक दृष्ट्या चांगुलपणा आणि वाईटपणा या सर्व संकल्पना इतिहासपूर्व काळापासून चालत आलेल्या आहेत. या संकल्पनांशिवाय आयुष्य ढकलणं शक्य नाही. इतकंच काय माझं अस्तित्वही शक्य नाही. असं असतानासुद्धा सर्व मानवजातीचे कष्ट अव्हेरून, सर्व डोलारा स्वत:हून माझ्या स्वत:च्या मनासारखा उभा करण्याचे माझे मनसुबे होते.

मी तेव्हा अगदी काटेकोरपणे असाच विचार केला होता असं नव्हे. पण या विचारांची बीजं तेव्हा माझ्या मनात होतीच. तेव्हा माझ्या लक्षात आलं की जरी शोपेनहॉवर आणि सॉलोमन आणि अस्मादिक यांचा शहाणपणा मान्य केला तरी आमची भूमिका मूर्खपणाची होती. 'आयुष्य दुष्ट आहे हे स्वच्छपणे दिसत असताना जगत राहणं' ही भूमिका सरळसरळ मूर्खपणाची आहे. कारण जर आयुष्य हे अर्थहीन आहे हे मला दिसतंय आणि जर मला तर्कशुद्धतेचा, अर्थपूर्णतेचा एवढा ध्यास आहे तर आयुष्याचा अंत केलाच पाहिजे. मग माझ्या तर्कबुद्धीला आव्हान देणारं कुणी राहणार नाही. दुसरं मला समजतं ते असं की आपले तर्कशुद्ध विचार, आस तुटलेलं चाक जसं नुसतं गरगर फिरत राहतं, तसे एकाच दुष्टचक्रात फिरत राहतात. आपण जरी कितीही तर्कशुद्ध विचार केला तरी या प्रश्नाचं उत्तर आपल्या हाती येऊ शकत नाही. उत्तर येतं ते एवढंच की शून्य बरोबर शून्य. त्यामुळे

तर्कबुद्धीचा हा मार्ग कदाचित चूक असू शकेल. तिसरं म्हणजे हे माझ्या लक्षात आलं की श्रद्धेनं दिलेल्या उत्तरांमध्ये माणसाचा खोल असा शहाणपणा साठवलेला आहे. मला तर्कबुद्धीचा आधार घेऊन त्याला नाकारण्याचा हक्क नाही. कारण आयुष्याच्या प्रश्नाला केवळ श्रद्धाच उत्तर देऊ शकते.

□

१०

मला हे सगळं समजलं, पण त्यामुळे माझी अस्वस्थता काही कमी झाली नाही. आता मी कोणतीही श्रद्धा स्वीकारण्यास तयार झालो. पण मला तर्क, बुद्धी किंवा विवेक यांचा सरळसरळ अधिक्षेप करणारी श्रद्धा नको होती. कारण तो मग थेट खोटेपणाच झाला असता. मग मी बुद्धधर्माचा आणि इस्लामधर्माचा पुस्तकं वाचून अभ्यास सुरू केला. पण मी जास्त अभ्यास केला तो ख्रिश्चनधर्माचा. मी ख्रिश्चनधर्मावरची पुस्तकं वाचली आणि आजूबाजूच्या माणसांनाही मी ख्रिश्चनधर्माबद्दल विचारू लागलो.

अर्थातच प्रथम मी माझ्या वर्गातील ऑर्थोडॉक्स पंथाच्या लोकांकडे वळलो. चर्चचे प्रवक्ते, साधू, नवीन विचारसरणीचे धर्मवेत्ते, रिडिमशनवर श्रद्धा ठेवल्यामुळे मुक्ती मिळेल असं मानणारे इव्हँनजेलिकल्स या साऱ्या विद्वान मंडळींना मी भेटलो. त्यांना प्रश्न विचारले. त्यांच्या श्रद्धा जाणून घेतल्या. आयुष्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी काय विचार केला आहे हे समजून घेतलं.

पण जरी मी अगदी संशयी किंवा काटेकोर राहिलो नाही, अगदी उदारबुद्धीने त्यांच्याकडे पाहिलं, त्यांच्याशी वादविवाद टाळला तरी या माणसांच्या श्रद्धा मी स्वीकारू शकलो नाही. माझ्या लक्षात आलं की ही माणसं ज्याला श्रद्धा म्हणतात ती श्रंद्धा जीवनाचा अर्थ स्पष्ट तर करत नाही उलट तो झाकोळून टाकते. आणि हे धर्माचे ठेकेदार अशी श्रद्धा टिकवून धरतात ती काही जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी नाही, तर त्यांच्या मनात जे काही वेगळेच हेतू असतात त्यांच्या परिपूर्तीसाठी.

या लोकांशी मी चर्चा करू लागलो की मला भीती वाटायची. वाटायचं की आता आपली पूर्वीसारखी निराश आणि उदास अवस्था होणार. आशेने

मी चर्चा सुरू करायचो आणि दरवेळी माझ्या पदरी निराशा यायची.

त्यांची तत्त्वं आणि सिद्धान्त ते जेवढ्या नीटपणे मला स्पष्ट करू लागायचे तेवढ्या जास्त स्पष्टपणे मला त्यांच्या चुका दिसायच्या. मला कळून चुकायचं की यांच्या श्रद्धेमध्ये आपणाला आयुष्याच्या अर्थाचं स्पष्टीकरण मिळेल असा विश्वास बाळगणं सपशेल चूक आहे.

या लोकांनी आपल्या धर्मसिद्धान्तांत ख्रिश्चन सत्यांबरोबरच अनेक अतार्किक, भाकड, अनावश्यक गोष्टींची सरमिसळ केलेली होती. ही ख्रिश्चन सत्यं माझ्या लेखी हृदयांतरीची ठेव होती. तरीसुद्धा ही सरमिसळही मी नजरेआड केली. पण ज्या गोष्टीचा मला खरा तिटकारा आला ती म्हणजे या लोकांचं जीवन माझ्यासारखंच होतं-फरक फक्त एवढाच होता की हे लोक जी तत्त्वं त्यांच्या बोलण्यातून किंवा प्रवचनातून सांगत असत त्यांचा त्यांच्या जीवनाशी काहीच मेळ नव्हता. मला स्पष्टपणे दिसून आलं की ते स्वतःची फसगत करून घेत आहेत. माझ्यासारखाच त्यांनाही आयुष्याचा अर्थ कळलेला नाहीये. फक्त मरेपर्यंत जगत राहायचं आणि तोपर्यंत दोन्ही हातांनी जे जे काही मिळेल ते ते स्वाहा करत राहायचं, हा त्यांचा स्वभावधर्म आहे. जर त्यांना आयुष्याचा अर्थ खरंच समजला असता तर त्यांना काही गमावण्याची, दुःखाची किंवा मृत्यूची भीती वाटली नसती. पण तसं काही दिसत नव्हतं. आमच्या वर्गातील ही माणसं माझ्यासारखीच उथळपणे जगत होती. त्यांना पोटापाण्याचा कसलाच प्रश्न नव्हता, तरी आपला पैसाअडका, जमीनजुमला कसा वाढेल याचीच त्यांना चिंता होती. त्यांना दुःखाची, वेदनांची आणि मृत्यूची माझ्यासारखीच भीती होती. मी आणि माझ्यासारखी अश्रद्ध माणसं जशी आपल्या इच्छा आणि वासना पुरवण्यासाठी जगत असतात तसंच हीही माणसं जगत होती. एकूण आमच्यासारखीच किंवा कदाचित आमच्यापेक्षाही वाईट असं त्यांचं जीवन होतं.

त्यांचे कसलेही वादविवाद मला त्यांची श्रद्धा सत्य आहे असं पटवू शकले नाहीत. गरिबी, आजारपण आणि मृत्यू या गोष्टी मला भयंकर वाटतात. या गोष्टींशी सामना करताना जर ते भीतीमुक्त आहे असं दिसलं असतं तर त्यांची श्रद्धा खरी आहे, असं मी मानलं असतं. पण आमच्या वर्गातील कोणीही असा भीतीमुक्त वागताना मला दिसला नाही. उलट आमच्या वर्गातील जे कोणी पूर्ण अश्रद्ध होते ते असे वागताना दिसत होते. पण हे श्रद्धाळू नाही, कधीही नाही.

आणि मला कळून चुकलं की या लोकांचा देवधर्मावरील विश्वास म्हणजे मी शोधतोय ती श्रद्धा नाही. ही खरी श्रद्धा नव्हेच-हा तर भोगवादावरचा उतारा आहे.

या प्रकारची कमअस्सल श्रद्धा कदाचित एखाद्या पश्चात्तापदग्ध सॉलोमनला त्याच्या मृत्यूशय्येवर जरी सांत्वना देऊ शकली नाही तरी निदान थोडाफार विरंगुळा देऊ शकते, पण अशी श्रद्धा बहुसंख्य मानवजातीला काहीएक उपयोगाची नाही. कारण हा जनसामान्य वर्ग दुसऱ्याच्या कष्टावर जगणारा ऐतखाऊ वर्ग नाहीये. तो तर स्वत: कष्ट करून स्वत:चं आयुष्य घडवणारा-फुलवणारा वर्ग आहे.

लाखोकरोडो लोकांना जगण्यासाठी आणि आयुष्य अर्थपूर्ण करण्यासाठी खऱ्याखुऱ्या श्रद्धेची गरज असते. मी किंवा शोपेनहॉवरने आत्महत्या केली नाही, यामुळे काही मला श्रद्धेचं अस्तित्व पटलं असं नाही, तर सारी मानवजात आपलं आयुष्य जगली, जगत आली आहे या वास्तवामुळे मला श्रद्धेचं अस्तित्व पटलं. आणि याच साध्यासुध्या माणसांनी मी किंवा सॉलोमनसारख्या माणसांना जगवत ठेवलं आहे.

मग मी साध्या, गरीब, अडाणी पण श्रद्धाळू माणसांकडे ओढला गेलो. ही माणसं होती यात्रेकरू, साधू, अवलिये, फकीर आणि शेतकरी. आमच्या वर्गातील माणसांची जशी ख्रिश्चनश्रद्धा होती तशी ख्रिश्चनश्रद्धा या माणसांचीसुद्धा होती. त्यांच्या श्रद्धेमध्येसुद्धा ख्रिश्चन सत्यांबरोबर अंधविश्वासाची सरमिसळ झालेली होती. पण दोघांमध्ये एक फरक होता. आमच्या वर्गातील लोकांच्या अंधविश्वासाच्या गोष्टी त्यांच्या जगण्यासाठी पूर्णपणे अनावश्यक होत्या. पूर्णपणे विसंगत होत्या. त्यांच्या भोगवादी आयुष्याचाच तो आणखी एक भाग होता. पण या कष्टकरी जनतेचा अंधविश्वास त्यांच्या आयुष्यात इतका मिळूनमिसळून गेला होता की त्या अंधविश्वासाशिवाय त्यांच्या आयुष्याची कल्पना करणंही कठीण होतं. त्या अंधविश्वासाच्या गोष्टी ही त्यांच्या आयुष्याची एक अटच बनली होती. आमच्या वर्गातील माणसांचं अवघं जीवन हे त्यांनी मानलेल्या श्रद्धेच्या पूर्णपणे विरोधी होतं तर कष्टकरी जनतेचं अवघं जीवन हे त्यांच्या श्रद्धेतून त्यांना आयुष्याच्या अर्थाचं जे भान आलं होतं त्याच्याशी सुसंगत होतं. मी जेव्हा अतिशय बारकाईने या कष्टकरी जनतेच्या आयुष्याकडे आणि त्यांच्या श्रद्धांकडे पाहू लागलो, त्याबद्दल विचार करू लागलो तेव्हा मला समजत गेलं की या माणसांची श्रद्धा खरीखुरी आहे.

त्यांना ती श्रद्धा आवश्यक आहे. कारण त्या श्रद्धेमुळेच त्यांच्या आयुष्याला अर्थ आलाय आणि ती श्रद्धाच केवळ त्यांना आयुष्य जगायला बळ देतेय. याउलट आमच्या वर्गात श्रद्धेशिवाय जगणं शक्य होतं आणि हजारातला एखादा स्वत:ला श्रद्धाळू समजायचा. या साध्यासुध्या माणसांमध्ये हजारातला एखादा अश्रद्धा असायचा. आमच्या वर्गातील माणसं आपलं अख्खं आयुष्य आळसात, करमणुकीत, मौजमजेत आणि तरीही एकसारख्या तक्रारी करत घालवतात. या साध्यासुध्या माणसांचं अख्खं आयुष्य मरेमरेस्तोवर राबण्यात जातं आणि तरीही ते समाधानी असतात. आमच्या वर्गातली माणसं मनाविरुद्ध काही घडलं किंवा दुखलंखुपलं की नशिबाला दोष देतात. उलट ही साधीसुधी माणसं दु:खं आणि मृत्यू शांतपणे आणि बहुतेक वेळा आनंदाने सहन करतात. आमच्यासारख्या माणसांच्या वर्गामध्ये शांतपणे मृत्यू ही गोष्ट अपवादात्मक असते. मृत्यूमुळे आमच्यामध्ये भीती आणि सर्व काही संपल्याची भावना निर्माण होते. उलट या साध्यासुध्या माणसांमध्ये दु:खदायक, खूप प्रतिकार केलेला आणि सर्व आनंदावर विरजण घालणारा असा मृत्यू अत्यंत अपवादात्मक असतो. सॉलोमनला किंवा आमच्यासारख्या लोकांना आयुष्यात जे खरंखुरं चांगलं वाटतं ते या लोकांजवळ अजिबात नसतं. पण ते अत्यंत आनंदात जगत असतात. आणि ते अपवादात्मक, एकटेदुकटे नाहीत. तर लाखो, करोडो माणसं अशीच जगत असतात. मी आणखी मान उंच करून पाहिलं. भूतकाळाकडे नजर फिरवली. वर्तमानकाळ निरखला. तर मला अशी लाखो, करोडो माणसं दिसली की ज्यांना आयुष्याचा अर्थ उमजलाय. ती जगू शकतात आणि मरू शकतात. त्यांच्यामध्ये हजारो फरक आहेत. त्यांच्या चालीरीती वेगवेगळ्या आहेत. त्यांचे स्वभाव वेगवेगळे आहेत. त्यांचं शिक्षण वेगवेगळं आहे. त्यांची आर्थिक-सामाजिक स्थिती वेगवेगळी आहे. पण त्यांच्यामध्ये एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे त्या साऱ्यांना आयुष्याचा आणि मृत्यूचा अर्थ कळलेला आहे. ते शांतपणे श्रम करतात. आपत्ती आणि संकटं सहन करतात. जगतात आणि मरतात. या साऱ्यांमध्ये त्यांना ईश्वरी योजना दिसते. जे होतं ते भल्यासाठी होतं असा त्यांचा विश्वास आहे. या साऱ्या जीवनचक्रामधून मला जसा पोकळपणा प्रतीत झाला तसा पोकळपणा त्यांना कधीच प्रतीत होत नाही.

आणि मी या लोकांवर प्रेम करू लागलो. त्यांचं जीवन मी जेवढं जास्त ओळखू लागलो तितकं मी त्यांच्यावर जास्त जास्त प्रेम करू लागलो. जे जगताहेत ते, जे मरून गेले आहेत ते, ज्यांच्याबद्दल मी वाचलं होतं ते,

ज्यांच्याबद्दल मी ऐकलं होतं ते- अशा साऱ्यांबद्दल मला प्रेम वाटू लागलं. जितकं मी जास्त प्रेम करू लागलो, तितकं माझं आयुष्य जगणं मला जास्त सोपं झालं. अशी दोन वर्षं गेलं. आता माझ्यामध्ये एक बदल घडून आला. या बदलाची बीजं माझ्यामध्ये अगोदरपासूनच होती. हा बदल हळूहळू घडून आला. हा बदल म्हणजे माझ्या वर्गातील माणसांच्या म्हणजे माझ्यासारख्या श्रीमंत आणि शिकलेल्या माणसांच्या आयुष्याबद्दल मला केवळ तिटकारा वाटू लागला. या माणसांचं आयुष्य मला पूर्णपणे निरर्थक वाटू लागलं. आमच्या सर्व कृती, वादविवाद, चर्चा, विज्ञान आणि कला नवीन प्रकाशात दिसू लागल्या. मला समजून आलं की हे सर्व केवळ स्वत:च्या मनोरंजनासाठी आहे. त्यात काही अर्थ शोधणं अशक्य आहे. आता सर्व कष्टकऱ्यांच्या आयुष्याचं म्हणजेच जवळजवळ सर्व मानवजातीच्या आयुष्याचं, जे सर्व जीवन घडवतं, त्या साऱ्यांच्या आयुष्याचं मूल्य आणि महत्त्व मला कळलं. मला पटलं की तेच आयुष्य खरं आहे आणि त्या आयुष्याला जो अर्थ आहे तोच खरा आहे. मी तो अर्थ स्वीकारला.

□

११

माझ्या वर्गातील लोकांच्या ज्या श्रद्धा होत्या त्याच या कष्टकऱ्यांच्यासुद्धा होत्या. पण माझ्या वर्गातील लोकांच्या श्रद्धांचा त्यांच्या आयुष्याशी काहीच मेळ नव्हता. त्यामुळे त्यावेळी त्या श्रद्धा मला अर्थशून्य वाटल्या होत्या. आता या कष्टकऱ्यांच्या त्याच श्रद्धा मला त्यांच्याकडे ओढू लागल्या. आता त्याच श्रद्धा मला योग्य वाटू लागल्या. कारण ही कष्टकरी जनता त्या श्रद्धांचा आधार घेऊन जगत होती. आमच्या वर्गातील लोकांच्या श्रद्धा मला पोकळ, अर्थशून्य वाटल्या आणि आता कष्टकऱ्यांच्या त्याच श्रद्धा मला अर्थपूर्ण वाटू लागल्या आणि त्या मी स्वीकारल्या. मी काय चूक केली होती ते मला आता समजलं. मी जी चूक केली होती ती मी चुकीचा विचार करत होतो त्यामुळे फारशी केली नव्हती. त्या चुकीचं खरं कारण हे होतं की मी चुकीचा जगत होतो. माझ्या विचारांमुळे मी सत्य काय ते बघू शकलो नाही असं नाही. मी मौजमजेचं, भोगवादी आयुष्य जगत होतो. मूठभरच लोक असं अपवादात्मक आयुष्य जगू शकतात. त्या आयुष्यामुळे मला सत्य समजत नव्हतं. माझ्या लक्षात आलं की 'माझं आयुष्य म्हणजे काय आहे?' या प्रश्नाला 'ते दुष्ट आहे' हे मी शोधून काढलेलं उत्तर अगदी बरोबर होतं. चूक ही होती की ते उत्तर माझ्या आयुष्याच्या बाबतीत होतं, पण मी ते सर्व माणसांच्या आयुष्याबाबत खरं धरलं होतं. मी स्वत:ला विचारलं होतं की माझं आयुष्य काय आहे आणि त्याचं उत्तर मिळालं होतं की ते दुष्ट आणि अविवेकी आहे. आणि खरोखरच माझं आयुष्य अर्थशून्य आणि वाईट होतं. इच्छावासनांची आणि भोगांची पूर्ती हेच माझं आयुष्य होतं. त्यामुळे माझं उत्तर माझ्या आयुष्याच्या बाबतीत खरं होतं. नंतर मी गॉस्पेल वाचलं. तेव्हा मला सत्य काय ते कळलं. गॉस्पेलमध्ये लिहिलं होतं, 'माणसांना

प्रकाशापेक्षा अंधार आवडायचा. कारण त्यांची कामं दुष्टपणाची होती. जो वाईट काम करत असतो असा प्रत्येकजण प्रकाशाचा द्वेष करतो. तो प्रकाशाकडे येत नाही. त्याला वाटतं की प्रकाशामध्ये त्याच्या कामांची निंदा केली जाईल.' मला हे समजलं की आयुष्याचा अर्थ समजण्यासाठी प्रथम हे आवश्यक आहे की आयुष्य हे अर्थहीन, दुष्ट, वाईट असं असता कामा नये आणि मग त्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी विचार आवश्यक आहे. हे इतकं उघड सत्य समजण्यासाठी मला एवढी भटकंती करावी लागली. जर एखाद्याला सर्व मनुष्यजातीच्या आयुष्याबद्दल बोलायचं असेल तर त्याने मनुष्यजातीच्या आयुष्याबद्दल विचार केला पाहिजे. एखाद्या ऐतखाऊ माणसाच्या आयुष्याबद्दल नव्हे. ही गोष्ट दोन अधिक दोन बरोबर चार एवढी उघड आहे. पण मी ती लक्षात घेतली नव्हती. कारण ती लक्षात घेण्यासाठी मी वाईट आहे हे मला मान्य करावं लागलं असतं. स्वत:बद्दलची चांगली प्रतिमा असणं हे माझ्यासाठी जास्त महत्त्वाचं आणि जास्त आवश्यक होतं - मग मला दोन अधिक दोन बरोबर चार या उघड सत्याचीसुद्धा पर्वा नव्हती. पण आता सर्व पालटलं. सत्शील माणसांबद्दल मला प्रेम वाटू लागलं. स्वत:चा मी तिरस्कार करू लागलो. खरं काय याचा मी कबुलीजबाब दिला. आता सर्व गोष्टी माझ्यासाठी स्पष्ट झाल्या.

समजा, ज्यानं आपलं अख्खं आयुष्य माणसांचा छळ करण्यात आणि त्यांची डोकी उडवण्यात घालवलं आहे अशा एखाद्या क्रूरकर्म्याला विचारलं की आयुष्य काय आहे किंवा समजा, एखादा ठार वेडा माणूस आहे. त्याने आपलं अख्खं आयुष्य एखाद्या बंद, अंधाऱ्या खोलीत काढलंय. ती खोलीही त्याने घाणीनं भरून टाकलीये. तरीही ती खोली सोडली तर आपण मरून जाऊ, असं त्या वेड्याला वाटतंय. आणि त्या वेड्याला जर विचारलं की आयुष्य काय आहे, तर एकच उत्तर मिळेल - आयुष्य ही सर्वात वाईट गोष्ट आहे आणि त्या वेड्याचं म्हणणं शंभर टक्के खरं आहे - फक्त त्याच्या आयुष्यापुरता विचार केला तर! मीच जर त्या वेड्यासारखा असेन तर काय? आम्ही सर्व श्रीमंत आणि ख्यालीखुशालीत राहणारी माणसं त्या वेड्यासारखी असतील तर काय? आणि मला समजलं की आम्ही खरोखरच तसे आहोत. निदान मी तरी तसाच आहे.

पक्ष्याचा जन्मच मुळी आकाशात उडणं, अन्नकण गोळा करणं, घरटं बांधणं यासाठी असतो. आणि मी जेव्हा एखाद्या पक्ष्याला असं करताना बघतो तेव्हा त्या पक्ष्याचा जीवनोत्साह पाहून माझाही ऊर आनंदाने भरून येतो.

सर्व प्राणीपक्षी अशाप्रकारे निर्माण केले गेले आहेत की त्यांनी स्वत:चं पोट भरावं, पिल्लं जन्माला घालावीत आणि आपल्या कुटुंबाचं पोट भरावं. माझी खात्री आहे की हे करताना त्यांना आनंद होतो. त्यांचं आयुष्य अर्थपूर्ण आहे हेही मला पटतं. मग माणसानं काय केलं पाहिजे? तर त्यानंसुद्धा प्राण्यापक्ष्यांप्रमाणेच जगण्यासाठी कष्ट केले पाहिजेत. काहीतरी निर्माण केलं पाहिजे. पण एक फरक आहे. तो हे सगळं जर एकट्या स्वत:साठी करेल तर तो नष्ट होईल. म्हणून त्यानं साऱ्यांसाठी हे केलं पाहिजे. माझी खात्री आहे की जेव्हा तो असं करतो तेव्हा तो आनंदी आणि सुखीसमाधानी असतो. त्याचं आयुष्य अर्थपूर्ण असतं. पण गेल्या तीस वर्षांच्या माझ्या जाणत्या आयुष्यात मी काय केलं? मी कष्ट करून सगळ्यांसाठी काही उत्पन्न तर केलं नाहीच, पण स्वत:साठीही काही कष्ट केले नाहीत. मी एखाद्या अळीसारखं ऐतखाऊ जीवन जगलो आणि मी जेव्हा विचारलं, 'माझ्या आयुष्याचा उपयोग काय?' तेव्हा मला उत्तर मिळालं, 'काहीही नाही.'. मानवी आयुष्याचा अर्थच 'जगण्यासाठी कष्ट करून काहीतरी निर्माण करणं' हा आहे. पण गेली तीस वर्षं मी केलं काय - निर्माण तर काही केलं नाही, उलट माझ्यामधलं आणि इतरांमधलं जीवन नष्ट केलं. मग मला दुसरं उत्तर काय मिळणार? खरंच माझं आयुष्य अर्थहीन आणि दुष्ट होतं.

कोणाच्या तरी इच्छेने या जगाचं चलनवलन चाललेलं आहे. आमची आयुष्यं आणि या जगाचं आयुष्य या साऱ्यांमधून कोणी तरी आपल्या हेतूंची पूर्तता करून घेत आहे. जर एखाद्याला त्या इच्छेचा, त्या हेतूचा अर्थ जाणून घ्यायचा असेल तर त्याने 'त्या' कोणाच्या तरी इच्छेची पूर्तता केली पाहिजे. म्हणजे प्रथम त्याची कर्तव्यं पार पाडली पाहिजेत. पण माझ्याकडून जे अपेक्षित आहे ते जर मी पार पाडलं नाही तर माझ्याकडून काय अपेक्षित आहे हे मला कधीच कळणार नाही. मग आम्हा सर्व मानवांकडून, या साऱ्या जगाकडून काय अपेक्षित आहे हे कळणं तर पार अशक्यच.

कल्पना करा, एक नागडा, भुकेलेला भिकारी चौकात बसला आहे. त्याला उचलून एका सुंदर अशा बंगलीत आणण्यात येतं. त्याला चांगलं खाऊपिऊ घालण्यात येतं. नंतर त्याला एक हॅण्डल वरखाली करायला सांगण्यात येतं. अर्थात त्याला इकडे कशासाठी आणण्यात आलं आहे, ते हॅण्डल वरखाली कशाला करायचं किंवा या बंगलीची रचना कशी आहे याबद्दल त्याला काहीएक सांगण्यात येत नाही. आता त्या भिकाऱ्याने काय करावं? तर त्या भिकाऱ्याने सर्वप्रथम ते हॅण्डल फिरवलं पाहिजे. जर त्याने

हॅण्डल फिरवलं तर त्याला समजेल की त्यामुळे पंप सुरू होतो. तो पंप पाणी खेचतो. ते पाणी बागेत खेळवलेलं आहे. मग त्या माणसाला पंपिंग स्टेशनपासून दुसरीकडे नेलं जाईल. तो तिथं फळं गोळा करील आणि आपल्या मालकाच्या आनंदात तो सहभागी होईल. क्रमाक्रमाने त्याला वरच्या श्रेणीतील कामं सांगितली जातील. मग तो कधीही आपण इथं का आहोत हे विचारणार नाही आणि कधीही आपल्या मालकाला दूषणं देणार नाही.

अशा प्रकारे साधीसुधी, कष्टकरी, अडाणी माणसं त्या जगत्चालकाच्या इच्छेचं पालन करत असतात. ती कधीही आपल्या मालकाला दूषणं देत नाहीत. आणि आपण अशा माणसांची निर्बुद्ध समजून हेटाळणी करतो. आम्ही तथाकथित शहाणी माणसं त्या चालकाचं अन्न खातो पण त्याच्या इच्छेचं पालन करत नाही. आम्ही करतो काय तर गोलाकार बसून चर्चा करतो - 'ते हॅण्डल का म्हणून आम्ही फिरवावं? कायतरी मूर्खपणा...' आम्ही असा विचार करतो. आम्ही ठरवून टाकलं आहे की जो कोणी चालक-निर्माता-नियंता आहे तो मूर्ख आहे किंवा तो अस्तित्वातच नाहीये आणि आम्ही शहाणे आहोत. पण तरीही आम्हाला वाटत राहतं की आम्ही पूर्ण निरुपयोगी आहोत आणि कसंही करून आम्ही स्वत:पासून आपली सुटका करून घेतली पाहिजे.

❑❑❑

१२

तार्किक, बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीतली चूक मला कळून आली. त्यामुळे आळशीपणाने तर्क चिवडत बसण्याचा मोह बाजूला सारला गेला. प्रत्यक्ष जगण्यातूनच सत्याचं ज्ञान मिळू शकेल याची खात्री पटल्यामुळे माझ्या आयुष्याच्या सच्चेपणाचा ताळेबंद मी मांडू शकलो. मी माझ्या कोशातून बाहेर पडून साध्या, कष्टकरी लोकांचं खरंखुरं आयुष्य पाहू लागलो. मला समजलं की केवळ तेच खरं आयुष्य आहे. मला जर आयुष्य आणि त्याचा अर्थ जाणून घ्यायचा असेल तर मला हे ऐतखाऊ आयुष्य सोडून खरं आयुष्य जगलं पाहिजे. खऱ्याखुऱ्या माणुसकीने अशा आयुष्याला अर्थ दिलेला असतो. मी स्वत:ला अशा आयुष्यात झोकून दिलं पाहिजे. आणि नंतरच त्याची परीक्षा केली पाहिजे.

त्या काळात काय घडलं ते सांगतो. ते संपूर्ण वर्षभर जवळजवळ दर क्षणी मी स्वत:ला विचारत होतो की गळफास लावून घेऊन किंवा गोळी झाडून घेऊन हे सर्व संपवून टाकावं की काय आणि त्याचवेळी वर दिलेले विचारही माझ्या मनात घोळत होते. मी माणसांकडे अधिक सजगतेने पाहत होतो. आणि या सर्व काळात एका वेदनेने, एका ध्यासाने माझं हृदय जड झालं होतं. ती वेदना होती ईश्वर सापडत नाही याची. तो ध्यास होता ईश्वराच्या शोधाचा.

मी तुम्हाला सांगतो की तो ईश्वराचा शोध हा बौद्धिक पातळीवरून घेतलेला नव्हता. ती एक भावना होती. एक संवेदना होती. माझ्या विचारप्रक्रियेतून आलेली ती गोष्ट नव्हती. उलट मी म्हणेन की विचारप्रक्रियेला विरोधी अशी तो गोष्ट होती. माझ्या हृदयातून उमटलेला तो ध्यास होता.

ती भावना म्हणजे भीती, अनाथपण, एका परक्या भूमीवरचा एकटेपणा आणि कुणाकडून तरी मदत मिळेल ही आशा अशा अनेक भावनांचा लोलक होता.

ईश्वराचं अस्तित्व सिद्ध करणं अशक्य आहे हे मला पूर्णपणे पटलेलं होतं. (अशी सिद्धता अशक्य आहे हे कांटने दाखवून दिलं होतं. आणि मला ते पटलं होतं.) तरीही मी ईश्वराचा शोध घेत होतो. तो सापडेलच अशी मला आशा होती. जुन्या सवयीने मी त्याची प्रार्थना करत होतो. मी त्याचा अखंड शोध घेत होतो. पण तो मला सापडत नव्हता. ईश्वराचं अस्तित्व सिद्ध करणं अशक्य आहे याबाबत कांट आणि शोपेनहॉवरने केलेली तत्त्वचर्चा आणि मांडलेले सिद्धान्त यांची मी मनात उजळणी करत होतो. त्यांच्या साधकबाधकतेबाबत विचार करत होतो. त्यांचा खरेपणा तपासत होतो. काळ आणि अवकाश हे विचारांचे वर्ग किंवा प्रकार आहेत. 'कारण' हा विचाराचा वर्ग किंवा प्रकार नव्हे. मी अस्तित्वात आहे याला काही कारण आहे. त्या कारणाला काही कारण आहे. सर्व कारणांचं अंतिम कारण म्हणजे आदिकारण. त्या आदिकारणाला माणसं ईश्वर म्हणतात. मी या विचारापाशी थांबलो आणि माझी सर्व शक्ती एकवटून त्या कारणाचं अस्तित्व ओळखायचा प्रयत्न केला. ज्या क्षणी मी हे मान्य केलं की एक शक्ती आहे आणि तिच्या अंमलाखाली मी आहे तत्क्षणी मला जाणवलं की मी जगू शकतो. पण मी स्वत:ला विचारलं, 'ते आदिकारण कोणतं? ती शक्ती कोणती? मी त्याबद्दल कसा विचार करावा? मी ज्याला ईश्वर म्हणतो त्याच्याशी माझे काय संबंध आहेत?' आणि परिचित उत्तरं माझ्या मनात उमटली, 'तो निर्माता आहे. तो रक्षणकर्ता आहे.' पण ही उत्तरं माझं समाधान करू शकली नाहीत. आणि मला वाटू लागलं की आयुष्यासाठी आवश्यक असलेलं असं काहीतरी माझ्यातून निसटून जातंय. मला भीती वाटू लागली. ज्या ईश्वराचा मी शोध घेत होतो त्याचा मी धावा सुरू केला. त्याने मला मदत करावी म्हणून मी त्याची आळवणी करू लागलो. पण मी जेवढी जास्त प्रार्थना केली तेवढं मला जास्त स्पष्ट होत गेलं तो माझं ऐकत नाहीये आणि माझं ऐकून घेण्यासाठी तिथं कोणी नाहीच आहे. माझ्या मनात निराशा दाटली. मला वाटू लागलं की ईश्वर नावाची काही गोष्टच नाहीये. मी म्हणालो, 'देवा... माझ्यावर दया कर. मला वाचव. दयाघना... मला कसं जगावं ते शिकव.' पण माझी कोणाला दया आली नाही. माझं आयुष्य ठप्प होतंय असं मला वाटू लागलं.

पण परतपरत अनेक बाजूंनी मी एकाच निष्कर्षाप्रत येऊन पोहोचत होतो की मी या जगात आलो त्यामध्ये काही कारण आहे, काही अर्थ आहे.

नुकतीच कोवळी लव फुटलेलं पाखराचं पिल्लू घरट्यातून खाली पडलं तर त्याला जसं वाटेल तसं मला वाटत होतं. पण आता मला समजलं की तसं नाहीये किंवा अगदी त्या पाखराच्या परिस्थितीमध्ये मी आहे असं मानलं, अगदी मी उताणा पडलोय, उंच गवतामध्ये पडून मी रडतोय, असं मानलं तरी मी रडतोय तो का? तर मला माहितेय की मातेनं मला उदरात सांभाळलंय, मला जन्म दिलाय, मला ऊब दिलीय, मला भरवलंय, मला प्रेम दिलंय. आता ती माझी माता कुठेय? जर मला टाकून दिलंय तर मला कुणी टाकून दिलंय? कुणीतरी मला प्रेमाने उदरात सांभाळलंय, हे मी विसरू शकत नाही. तो कुणीतरी कोण आहे? परत 'ईश्वर'? त्याला माझा शोध, माझा ध्यास, माझी उद्विग्नता, माझी निराशा, माझा संघर्ष सारं काही दिसतंय. तो सारं काही जाणतोय.

मी स्वत:शी म्हणालो, 'तो अस्तित्वात आहे.' आणि फक्त एक क्षणभर मी मान्य करण्याचा अवकाश की परत एकदा जीवनरसाने मी तरारून गेलो. जगण्याची शक्यता आणि जगण्याचा आनंद माझ्यामध्ये फुलून आला. पण ईश्वराचं अस्तित्व मान्य केल्यावर पुन्हा एकदा त्याच्याशी माझा काय संबंध आहे याचा शोध घ्यायला मी सुरूवात केली. मी परत एकदा 'त्या' ईश्वराची कल्पना केली - पवित्र त्रिमूर्तीमधला आमचा निर्माता, ज्याने आपल्या मुलाला आमच्याकडं पाठवलं आणि जो आमचा रक्षणकर्ता आहे. आणि पुन्हा 'तो' ईश्वर, माझ्यापासून आणि जगापासून अलग केलेला तो ईश्वर, बर्फ डोळ्यांदेखत वितळून जावा तसा हळूहळू विरळ होत गेला. परत काहीसुद्धा उरलं नाही. माझ्यातला जीवनरस आटून गेला. मी निराश, उदास झालो. परत एकदा मला वाटलं की आता मला आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यापेक्षाही वाईट गोष्ट म्हणजे आपण आत्महत्यापण करणार नाहीहोत हेही मला कळून चुकलं होतं.

एक-दोनदा नाही तर अक्षरश: शेकडो वेळा असंच घडत गेलं. प्रथम मी अत्यंत आनंदी आणि उत्साही झालो. आणि नंतर निराश, उदास, उद्विग्न झालो. जगणं अक्षरश: नकोसं झालेला असा.

मला आठवतं हिवाळ्याची ती नुकतीच सुरूवात होती. जंगलात मी एकटाच गेलो होतो. जंगलाचे आवाज ऐकत होतो. पण माझ्या डोक्यात हेच नेहमीचे विचार होते. गेली तीन वर्षं हेच विचार माझ्या डोक्यात घोळत होते. ईश्वराचा शोध चालूच होता.

मी स्वत:शी म्हटलं, ‘ठीक आहे. ईश्वर नाहीये. माझ्या कल्पनाशक्तीने उभा केलेला असा नाही तर माझ्या आयुष्याइतका खराखुरा असा ईश्वर वगैरे कोणी नाहीये. तो अस्तित्वात नाहीये आणि कोणताही चमत्कार त्याचं अस्तित्व सिद्ध करू शकत नाही. कारण चमत्कार कदाचित माझ्या कल्पनेची भरारी असू शकेल. शिवाय चमत्कार हे अतार्किकच असतात.’

मी पुन्हा विचार करू लागलो, ‘पण ज्या ईश्वराला मी शोधतोय त्या ईश्वराबद्दलची जाणीव... ही जाणीव कुठून येते?’ आणि या विचारासरशी माझ्या शरीरातून आनंदलहरी वाहू लागल्या. माझ्या आजूबाजूला जे काही होतं ते एकदम चैतन्यमय झालं. त्यांना अर्थ प्राप्त झाला. पण माझा आनंद फार काळ टिकला नाही. माझं विचारचक्र सुरूच राहिलं.

‘ईश्वराबद्दलची कल्पना म्हणजे ईश्वर नव्हे. ही कल्पना माझ्यामध्ये जन्म घेते. ही कल्पना किंवा विचार माझ्या मनामध्ये मी आणू शकतो किंवा आणण्यापासून थांबवू शकतो. अशा गोष्टीचा शोध मी घेत नाहीये. जो नसेल तर आयुष्य शक्य नाही अशाचा मी शोधत घेत आहे.’ आणि पुन्हा एकदा माझ्या सभोवतालचं सारं निर्जीव झालं आणि पुन्हा एकदा स्वत:चा अंत करावा असं मला वाटू लागलं.

पण नंतर मी माझी नजर स्वत:वर वळवली. अंतर्मुख होऊन मी विचार करू लागलो. माझ्या अंतरात्म्यात जी खळबळ चालली होती ती मी लक्षात घेतली. शेकडो वेळा माझ्या अंत:करणात निराशेचे ढग दाटून आले होते आणि नंतर आनंदाच्या सरींनी मी चिंब भिजून गेलो होतो हे मला आठवलं. मला लक्षात आलं की जेव्हा जेव्हा मी ईश्वरावर विश्वास ठेवला तेव्हाच मी खराखुरा जगलो. तेव्हा जसं होत होतं तेच आता होत होतं. परमेश्वराचं अस्तित्व मान्य केल्याबरोबर जगण्याची उर्मी येत होती. ईश्वराला विसरलो किंवा त्याचं अस्तित्व अमान्य केलं की मरणाला कवटाळावंसं वाटत होतं.

हा सर्व आनंद आणि मरण काय आहे? मी जेव्हा ईश्वराच्या अस्तित्वाचा विश्वास गमावतो तेव्हा मी जगत नाही. माझ्यामध्ये ईश्वराला शोधण्याचा अंधुक आस तेव्हाही होतीच. म्हणूनच तर मी स्वत:चा अंत करून घेतला नाही. मी जगतो, खराखुरा जगतो जेव्हा मी त्याला अनुभवतो, जेव्हा मी त्याला शोधतो. माझा आतला आवाज म्हणाला, ‘तुला आणखी काय हवंय? हे सर्व म्हणजेच तो आहे. ज्याच्याशिवाय कोणी जगू शकत नाही तो ईश्वर. ईश्वराला जाणणं आणि जगणं ही एकच गोष्ट आहे. ईश्वर म्हणजे जीवन.’

'ईश्वराच्या शोधात जग आणि मग तू ईश्वराशिवाय जगणार नाहीस.' आणि पूर्वी कधीही नव्हता एवढा माझ्यामध्ये आणि सभोवताली प्रकाश उजळला. तो प्रकाश कधीही नाहीसा झाला नाही.

आणि मी आत्महत्येपासून वाचलो. कधी आणि कसा हा बदल घडून आला हे मी सांगू शकत नाही. क्रमाक्रमाने, लक्षातसुद्धा न येता माझी जीवनशक्ती ओसरत गेली होती आणि मी आत्महत्येच्या टोकापर्यंत येऊन पोचलो होतो. माझ्यातील सर्व जीवन आटून गेलं होतं. जगणं मला अशक्य झालं होतं. आता तसंच क्रमाक्रमाने आणि लक्षातसुद्धा न येता जीवनाची शक्ती माझ्यात परत आली. आणि एक विलक्षण गोष्ट म्हणजे ही जी जीवनशक्ती होती ती नवीन नव्हती. माझ्या आयुष्याच्या पूर्वकाळातील दिवसांमध्ये ज्या जीवनशक्तीने मला साथ दिली होती तीच जीवनशक्ती आता मला अनुभवास येत होती.

अगदी लहानपणी आणि तरुणपणी मला जसं वाटायचं अगदी तसंच आता मला वाटू लागलं. जगत्चालकाच्या इच्छेने सर्व काही चाललं आहे हा विश्वास मला वाटू लागला. त्या इच्छेने मला जन्माला घातलं आणि ती इच्छा माझ्याकडून काहीतरी अपेक्षा करतेय ही श्रद्धा माझ्यात जागृत झाली. लहानपणी माझ्या आयुष्यातील एकमेव ध्येय म्हणजे मी जास्तजास्त चांगुलपणाने, माणुसकीने वागलं पाहिजे, म्हणजेच त्या जगत्चालकाच्या इच्छेनुसार वागलं पाहिजे, हे होतं. या माझ्या लहानपणाच्या श्रद्धेकडे मी आता पुन्हा परतलो. मानवजातीने आपल्या मार्गदर्शनासाठी काही गोष्टी निर्माण केल्या आहेत. त्या म्हणजे देवावर विश्वास, नैतिक परिपूर्णता आणि आयुष्याला अर्थ देणारी परंपरा. लहानपणी या गोष्टी माझ्यापासून लपवून ठेवण्यात आल्या होत्या. लहानपणी ईश्वराच्या इच्छेवर माझी अजाणता श्रद्धा होती. आता मात्र अशा श्रद्धेशिवाय मी जगूच शकणार नाही, अशी माझी खात्री पटलेली होती.

हे सर्व घडून आलं ते काहीसं या गोष्टीसारखं - केव्हा तरी मला एका बोटीत बसवण्यात आलं. माझ्या कोवळ्या हातात वल्ही देण्यात आली. बोटीत मी एकटाच होतो. एका अज्ञात किनाऱ्यावरून ती बोट समोरच्या किनाऱ्याच्या दिशेने ढकलण्यात आली. मी अगदी कसून वल्ही मारत होतो. प्रवाहाच्या मध्यभागाकडं जाण्याचा प्रयत्न करत होतो. पण तिथला प्रवाह जबरदस्त जोराचा होता. त्या प्रवाहाने मी दुसरीकडे ओढला जाऊ लागलो. मला माझ्यासारखेच प्रवाहाने खेचले जाणारे अधिकाधिक लोक भेटू लागले. काही

जण असे होते की जे जिवाच्या आकांताने वल्ही मारत होते. तर काही जणांनी वल्ही टाकून दिली होती. तिथं मोठमोठ्या बोटी होत्या, लहानसहान होडकी होती. खूप माणसं त्यात भरली होती. काही जण प्रवाहाच्या विरुद्ध झगडत होते. काही जणांनी झगडणं सोडून देऊन धारेला लागणं पसंत केलं होतं. मी पुढे गेलो तसतसं मला दुसऱ्या किनाऱ्यावर जायचंय हे हळूहळू विसरून गेलो. कारण मला माझ्यासारखे प्रवाहाला शरण गेलेले खूप लोक दिसत होते. प्रवाहाच्या बरोबर मध्यभागी प्रवाहाबरोबर वाहून जाणाऱ्या खूप बोटी आणि होडकी होती. आता मी माझी दिशा पूर्णपणे विसरलो. वल्ही टाकून दिली. माझ्या आजूबाजूला लोक अगदी मजेत होते. आनंदाने बेहोष झाले होते. त्यांच्या बोटी प्रवाहाबरोबर वाहून जात होत्या. ते मला आणि एकमेकांना पटवून देत होते की असं वाहून जाणं हेच अपरिहार्य आहे. दुसरी कुठलीही दिशा शक्य नाही. मी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांच्याबरोबर जाऊ लागलो. झालं... मीही धारेला लागलो. मी इतका पुढं गेलो की भोवऱ्यांची घुसळण मला ऐकू येऊ लागली. त्या भोवऱ्यांमध्ये गरगर फिरून बोटींच्या ठिकऱ्याठिकऱ्या होत होत्या. माझ्याही तशाच ठिकऱ्या होणार याची मला खात्री पटली. आता मी विचार करू लागलो. खूप काळ मला काय झालं होतं हेच माझ्या ध्यानात येईना. माझ्यासमोर पूर्ण विनाशाशिवाय दुसरं काही दिसत नव्हतं. आणि त्या विनाशाकडेच मी वेगाने चाललो होतो. माझ्या मनात भीती दाटून आली. कुठेही सुरक्षितता दिसत नव्हती. काय करावं ते मला सुचत नव्हतं. पण जेव्हा मी मागं वळून पाहिलं तेव्हा मला असंख्य बोटी कष्टाने पण अविश्रांतपणे प्रवाहाला ओलांडून जाताना दिसल्या. आता मला किनाऱ्याची आठवण झाली. वल्ह्यांची आठवण झाली. मला तिकडेच जायचं आहे याची आठवण झाली. आणि मी प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने वल्ही मारून किनाऱ्याकडे जायला लागलो.

तो किनारा म्हणजे ईश्वर होता. ती दिशा म्हणजे परंपरा होती. ती वल्ही म्हणजे किनाऱ्याकडे जाऊन ईश्वराशी एकरूप होण्याकरता मला दिलेलं स्वातंत्र्य होतं. अशाप्रकारे माझ्या जीवनशक्तीला नव्याने पालवी फुटली आणि मी पुन्हा जगू लागलो.

□

१३

आमच्या वर्गातील लोकांच्या जीवनापासून मी पूर्णपणे बाजूला झालो. मला समजलं की हे जीवन खरं जीवन नाही. ही तर जीवनाची खोटीखोटी नक्कल आहे. आम्ही उथळपणे जगतो. त्यामुळे आयुष्य समजून घेण्याची शक्यताच नाहीशी होते. मला जर आयुष्य समजून घ्यायचं असेल तर मला आमच्यासारख्यांचं हे ऐतखाऊ आयुष्य बघून चालणार नाही. आमच्यासारख्यांचं आयुष्य हे अपवादात्मक आहे. मला साध्यासुध्या कष्टकरी माणसांचं आयुष्य बघितलं पाहिजे. ती साधीसुधी माणसं आयुष्य घडवतात. तेव्हा ती माणसं आयुष्याला काय अर्थ देतात हे पाहिलं पाहिजे. माझ्या भोवतालचे लोक म्हणजे रशियन माणसं. तेव्हा मी त्यांच्याकडे वळलो. ते आयुष्य कसं जगतात हे पाहू लागलो. आपल्या आयुष्याचा ते जो अर्थ लावतात तो असा मांडता येईल. प्रत्येक माणूस या जगात ईश्वराच्या इच्छेने आला आहे. आणि ईश्वराने प्रत्येक माणसाला असा बनवला आहे की तो माणूस स्वत:चा आत्मा नष्ट करू शकतो किंवा वाचवू शकतो. प्रत्येक माणसाचं आयुष्यातील कर्तव्य हे आहे की त्याने आपला आत्मा वाचवावा. त्यासाठी त्याने देवासारखं वागलं पाहिजे. देवासारखं वागणं म्हणजे आयुष्यातील सुखोपभोगांचा त्याग करणं, कष्ट करणं, नम्र होणं, दु:खवेदना सहन करणं, दयाळू असणं वगैरे. आता हे सर्व ते कसं शिकतात? तर त्यांचे धर्मगुरू त्यांना जी श्रद्धा शिकवतात त्या श्रद्धेचा प्रत्यक्ष आयुष्यात ते असा अर्थ लावतात. तसंच ज्या लोकपरंपरा असतात त्याही हेच शिकवत असतात. हा अर्थ मला स्पष्ट झाला. तो माझ्या हृदयाला भावलाही. पण ही जी श्रद्धा आम्हा नॉन-सेक्टेरियन पंथीय लोकांमध्ये होती त्या श्रद्धेचा हा एक अर्थ होता. पण त्याबरोबरच जोडलेला दुसरा जो अर्थ होता तो मात्र माझ्या बुद्धीला, माझ्या विवेकाला न पटणारा आणि

अगदी तिटकारा आणणारा होता. तो म्हणजे चर्चचे संस्कार. म्हणजे सॅक्रॅमेंट्स, चर्चची सर्व्हिस, उपवास, रेलिक आणि आयकॉन यासारख्या प्रतिकांची पूजाअर्चा वगैरे कर्मकांड. लोक एक दुसऱ्यापासून वेगळं करू शकत नाहीत. मीही करू शकलो नाही. आणि या लोकांच्या श्रद्धेमध्ये अशा गोष्टींची सरमिसळ कशी झाली कोण जाणे? विचित्र गोष्ट होती ती. तरीही मी सर्व गोष्टींचा स्वीकार केला. मी चर्चच्या सर्व्हिसांना उपस्थित राहिलो, गुडघे टेकून सकाळ-संध्याकाळ प्रार्थना केली. युखॅरिस्ट स्वीकारायची तयारी केली. पहिल्यांदा माझ्या बुद्धीने कशालाही विरोध केला नाही. ज्या गोष्टी पूर्वी मला करणं अशक्य वाटायचं त्या गोष्टींनी आता माझ्यामध्ये कुठलीही विरोधाची भावना उत्पन्न व्हायची नाही.

श्रद्धेशी माझा संबंध पूर्वी वेगळा होता आणि आता वेगळा होता. पूर्वी मला आयुष्य अर्थपूर्ण वाटायचं आणि श्रद्धा ही अनावश्यक, तर्कविसंगत आणि जीवनाशी संबंध नसलेल्या सिद्धान्तांचा लहरी आविष्कार वाटायची. त्या वेळी मी स्वत:ला विचारायचो की या सिद्धान्तांचा अर्थ काय आणि जेव्हा माझी खात्री पटली की हे सिद्धान्त अर्थशून्य आहेत तेव्हा मी ते सिद्धान्त टाकून दिले. उलट आता मला पूर्णपणे समजलं होतं की श्रद्धेशिवाय माझ्या आयुष्याला काही अर्थ नाही. आता श्रद्धेचा असा आविष्कार मला अनावश्यक वाटत नव्हता. उलट आता मला अनुभवाने पूर्णपणे पटलं होतं की श्रद्धेचे हे सिद्धान्त आयुष्याला अर्थ देतात. पूर्वी मला या प्रार्थना, या पूजाअर्चा म्हणजे केवळ मूर्खपणाची अनावश्यक वटवट वाटायची. पण आता जरी या प्रार्थना वगैरे मला समजत नसल्या तरी त्यांना काही अर्थ आहे, असं मला वाटू लागलं. मी स्वत:शी म्हणू लागलो की मी त्या समजून घेण्यास शिकलं पाहिजे.

मी स्वत:शी वादविवाद केला. माझा मुद्दा असा होता - सर्व मानवजात आपल्या बुद्धीसह ज्या रहस्यमय स्रोतापासून निर्माण झाली आहे त्याच रहस्यमय स्रोतापासून श्रद्धेचा जन्म झाला आहे. तो स्रोत म्हणजे ईश्वर. ईश्वरापासून मानवी देह आणि मानवी बुद्धी यांचा जन्म झाला आहे. माझं शरीर मला जसं ईश्वराने दिलेलं आहे तशीच माझी बुद्धी आणि माझं आयुष्याचं आकलन हेही ईश्वरानेच मला दिलेलं आहे. म्हणून आयुष्याच्या आकलनाच्या विकासाच्या या वेगवेगळ्या अवस्था खोट्या असू शकत नाहीत. माणसं प्रामाणिकपणे ज्याच्यावर विश्वास ठेवतात ती गोष्ट खरीच असली पाहिजे. ती वेगळ्या प्रकारे मांडली गेली असेल, पण ती खोटी असू शकत नाही.

जर मला ती खोटी वाटत असेल तर त्याचा अर्थ असा आहे की ती मला समजलेली नाही. दुसरं म्हणजे, कोणत्याही श्रद्धेचं सारतत्त्व हे असतं की मृत्यू ज्याला नष्ट करू शकणार नाही असा अर्थ आयुष्याला देणं. 'मी कां जगतो आणि माझ्या आयुष्यापासून काय निष्पन्न होणार आहे?' हा चिरंतन प्रश्न प्रत्येक माणसासमोर असतो. श्रद्धा या प्रश्नाचं उत्तर देते. एखादा राजा गाद्यागिरद्यांवर लोळत मरतो. एखादा गुलाम अतिश्रमाने मरतो. एखादं मूल समज येण्याआधी मरतं. एखादा शहाणा म्हातारा मरतो. एखादी भ्रमिष्ट म्हतारी मरते. एखादी तरुण, आनंदी पत्नी मरते. एखादा वासनेनं भरलेला तरुण मरतो. ही वेगवेगळ्या परिस्थितीतील, वेगवेगळ्या वयाची माणसं—या सर्वांच्या मरणाचा अर्थ काय? या प्रश्नाचं उत्तर श्रद्धा देते. अर्थातच या उत्तराचा गाभा जरी एक असला तरी त्याचं बाह्यरूप अनंत तऱ्हांनी वेगवेगळं असणार. आणि जितकं ते उत्तर मूलत: एकच एक असणार, जितकं ते गाभ्यामध्ये सखोल आणि सत्य असणार तितकं त्याचं बाह्यरूप जास्तच विचित्र, जास्तच चमत्कारिक असणार. कारण ज्यांचं शिक्षण वेगवेगळं आहे, ज्यांची जडणघडण वेगवेगळी आहे, ज्यांचं आयुष्य वेगवेगळ्या स्थितीतलं आहे, अशा असंख्य माणसांना ते पटावं लागतं.

अशा प्रकारच्या प्रतिपादनाने मी धर्माच्या बऱ्याचशा विचित्र कर्मकांडांचं स्पष्टीकरण करून घेतलं. पण तरीही अशा काही गोष्टी होत्याच की ज्या मला पटत नव्हत्या. माझी अशी मनापासून इच्छा होती की लोकांमध्ये मिसळावं आणि त्यांच्या धार्मिक रीतीरिवाजांमध्ये भाग घ्यावा. पण मी तसं करू शकलो नाही. जर मी तसं केलं तर ती स्वत:शी केलेली प्रतारणा ठरेल, ज्याला मी पवित्र मानतो त्याच्याशी केलेला द्रोह ठरेल असं मला वाटलं. अशा वेळी आपले नवे रशियन धर्मवेत्ते माझ्या मदतीला धावले.

या धर्मवेत्त्यांचं स्पष्टीकरण असं होतं: 'आपल्या श्रद्धेचं मूलतत्त्व चर्चचं सर्वोच्च स्थान हे आहे. त्यामुळे चर्च जे काही प्रतिपादन करतं ते सर्व सत्य आहे. चर्च म्हणजे खऱ्या श्रद्धाळू लोकांचं प्रेमानं बांधलेलं संघटन आहे आणि त्यामुळे खरं ज्ञान चर्चजवळ आहे हे सर्व त्या श्रद्धेबरोबर येतं.' मी विचार केला, 'स्वर्गीय सत्य हे एकेकट्या माणसाला सापडू शकत नाही. जेव्हा सर्व माणसं प्रेमाने एकत्र येतात तेव्हाच त्यांना त्या स्वर्गीय सत्याचा साक्षात्कार होतो. सत्याचा साक्षात्कार होण्यासाठी एकटं राहणं योग्य नाही. एकटं न पडण्यासाठी माणसाने प्रेम केलं पाहिजे आणि आपल्याला ज्या गोष्टी पटत नाहीत त्याही सहन केल्या पाहिजेत.'

'सत्य हे फक्त प्रेम केल्यामुळेच प्रकट होतं. चर्चची क्रियाकर्म केली नाहीत तर तुम्ही प्रेमाविरुद्ध वर्तन करता. प्रेमाविरुद्ध वर्तन केल्यामुळे तुम्ही सत्य समजण्यापासून पारखे होता.' या प्रतिपादनात असलेली तर्कदुष्टता तेव्हा माझ्या ध्यानात आली नाही. मला तेव्हा हे समजलं नाही की माणसांशी प्रेमानं जोडलं गेलं की सर्वश्रेष्ठ प्रेम मला समजेल, पण नायसीन क्रीडच्या ठाम शब्दांमध्ये जे व्यक्त झालं आहे ते स्वर्गीय सत्य त्यामुळे सापडणार नाही. मला हेही समजलं नाही की प्रेम हे 'सत्याचा विशिष्ट आविष्कार' ही एकत्र येण्याची अट म्हणून घालू शकत नाही. मी तेव्हा धर्मवेत्त्यांच्या त्या प्रतिपादनातील तर्कदुष्टता पाहू शकलो नाही. पण एका अर्थी तेच बरं झालं. त्यामुळेच मी ऑर्थोडॉक्स चर्चचं सर्व कर्मकांड स्वीकारू शकलो आणि पार पाडू शकलो. अर्थात त्यातल्या बहुतेक गोष्टी अनाकलनीय होत्या. पण मी त्या सर्व श्रद्धाळूपणे केल्या. त्यावेळी अगदी मनापासून मी सर्व वादविवाद टाळले. सर्व विसंगती दिसत असूनही नजरेआड केल्या. चर्चचं सगळं सांगणं मी जास्तीत जास्त समजून घेण्याचा प्रयत्न केला.

चर्चचं कर्मकांड करताना मी बुद्धी, तर्क, विवेक वगैरे गुंडाळून ठेवला आणि सर्व माणसांनी अंगीकारलेल्या परंपरेला शरण गेलो. मी माझ्या पूर्वजांशी एकरूप झालो. ज्यांच्यावर मी प्रेम करत होतो ते माझे आजीआजोबा, आईवडील यांच्याशी मी एकरूप झालो. ज्यांच्याबद्दल मला आदर वाटत होता, अशा साध्याभोळ्या लाखो लोकांशी मी प्रेमरज्जूने बांधला गेलो. शिवाय त्या क्रिया मुळात वाईट नव्हत्या. (मी स्वत:च्या वासना पूर्ण करणं याला वाईट समजतो.) चर्चमध्ये जाण्यासाठी, तिथल्या सर्व्हिससाठी मी जेव्हा पहाटे उठायचो तेव्हा माझी भावना 'मी काहीतरी चांगलं करतोय,' अशी असायची. कारण मी माझा मानसिक अहंकार नाहीसा करण्यासाठी माझ्या शारीरिक सुखावर पाणी सोडत होतो. कारण मी माझ्या पूर्वजांशी आणि आता जे जगत आहेत त्यांच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करत होतो. कारण मी आयुष्याचा अर्थ शोधत होतो. 'आपण चांगले काम करत आहोत,' हीच भावना कम्युनिअन स्वीकारण्यासाठी मी जेव्हा तयारी करत होतो तेव्हा माझ्या मनात होती. हीच भावना रोज गुडघे टेकून प्रार्थना करत असताना माझी होती. हीच भावना सर्व उपवास करत असताना माझ्या मनात होती. मी उपवास केले. कम्युनिअनसाठी तयारी केली. घरी आणि चर्चमध्ये ठराविक वेळा जाऊन प्रार्थना केली. चर्चच्या सर्व्हिसच्या वेळी मी प्रत्येक शब्द लक्षपूर्वक ऐकला. त्याचा अर्थ समजून घेतला. मासच्या वेळी 'धर्माला अनुसरून आपण

एकमेकांवर प्रेम करूया.' हे शब्द मला महत्त्वाचे वाटले. पण पुढचे शब्द 'आम्ही ऐक्यावर, पित्यावर, पुत्रावर आणि पवित्र भुतावर (होली घोस्टवर) श्रद्धा ठेवतो.' हे शब्द मी दुर्लक्षित केले. कारण ते मला समजले नाहीत.

□

१४

त्या काळात जगण्यासाठी श्रद्धा ठेवणं मला एवढं आवश्यक होतं की मी स्वत:च्याही नकळत धार्मिक रीतीरिवाजांमधील विसंगती आणि संदिग्ध जागा माझ्यापासून दडवून ठेवल्या. पण प्रत्येक कर्मकांडातून काहीतरी चांगला अर्थ शोधून काढायचा यालाही मर्यादा होतीच. काही प्रार्थनांबद्दल मी स्वत:ची कशीबशी समजूत घातली. सम्राट झार आणि त्याच्या नातेवाईकांबद्दल खूपशा प्रार्थना होत्या. त्यांचं मी स्वत:पाशी असं स्पष्टीकरण केलं की झार हा सम्राट आहे. त्यामुळे तो मोहाला बळी पडण्याचा जास्त संभव आहे. त्यामुळे त्याला प्रार्थनांची जास्त गरज आहे. 'आमचे शत्रू आणि दुष्टजन यांना नामोहरम करण्याच्या' प्रार्थनांचं स्पष्टीकरण मी असं केलं की की या प्रार्थनेत जो शत्रू आहे तो पाप हा आहे. पण हे स्पष्टीकरण काही खरं नाही हे मला आतून कळत होतं. चेरुविक प्रार्थना किंवा ऑब्लेशनचं (म्हणजे देवाला भेटी देण्याचं) सर्व सॅक्रॅमेंट (धर्मविधी) किंवा 'निवडक योद्धे' या प्रार्थना यांचं मी असंच काहीतरी स्पष्टीकरण करून घेतलं. पण हे काही बरोबर नाही, हा खोटेपणा आहे हे मला कळत होतं. अशा प्रकारे चर्चमधल्या जवळजवळ दोन तृतीयांश प्रार्थना मला एकतर अगम्य राहिल्या किंवा त्यांच्यात मी जेव्हा स्पष्टीकरण शोधायचा प्रयत्न केला तेव्हा मला कळत होतं की मी खोटं वागतोय आणि असं खोटं वागल्यामुळे माझा देवाशी जो संबंध आहे तो मी नष्ट करतोय. अगदी माझ्या श्रद्धेवरच घाव घालतोय.

प्रमुख सण साजरे करण्याबाबतसुद्धा मला असंच वाटलं. सब्बाथची आठवण ठेवणं म्हणजे एक दिवस देवाला अर्पण करणं हे मी समजू शकलो. पण प्रमुख सुट्टी ही रिसरेक्शनच्या (येशूच्या पुनरुत्थानाच्या) स्मरणार्थ होती. पण पुनरुत्थानाची वास्तवता मी डोळ्यासमोर आणू शकत नव्हतो की समजू

शकत नव्हतो. आणि ते रिसरेक्शन हे नाव साप्ताहिक सुट्टीलासुद्धा दिलेलं होतं. (रशियामध्ये संडे म्हणजे रविवार हा रिसरेक्शन दिवस म्हटला जातो.) रिसरेक्शनच्या दिवशी वाईन आणि पाव ख्रिस्ताचं रक्त आणि मांस म्हणून दिला जायचा. ते तर माझ्या आकलनाच्या पारच पलीकडचं होतं. उरलेल्या बारा महत्त्वाच्या सुट्ट्या (ख्रिसमसचा अपवाद वगळता) चमत्कारांच्या स्मरणार्थ दिलेल्या होत्या. या चमत्कारांबद्दल मी विचार करू लागलो तर मला ते सर्व नाकारावं लागेल म्हणून मी त्यांच्याबद्दल विचार करणंच सोडून दिलं. असेनशन, पेंटीकॉस्ट, एपिफॅनी, पवित्र मातेची मेजवानी या सुट्ट्या जेव्हा साजऱ्या होत तेव्हा नेमक्या अशा गोष्टींना महत्त्व दिलं जाई ज्या केवळ बिनमहत्त्वाच्याच नव्हेत तर सरळसरळ वाईट होत्या. त्यामुळे डोकं शांत राहील असं काही तरी स्पष्टीकरण मी शोधून काढी किंवा त्यांच्यावर टीका करण्याचा मला मोह होऊ नये म्हणून मी सरळसरळ डोळेझाक करी.

हे सर्व विचार माझ्या मनात सॅक्रॅमेंट घेताना येत असत. बाप्टिझम आणि कम्युनिअन ही प्रमुख सॅक्रॅमेंट. ती घेताना सर्व काही स्पष्ट होतं. त्यामुळे माझ्या मनात द्वंद्व उभं राहिलं, खोटं वागावं की या साऱ्याला नकार द्यावा.

कितीतरी वर्षांनी मी पुन्हा एकदा युखॅरिस्ट घेत होतो तेव्हा माझ्या मनात जो विषाद दाटला तो मी कधीच विसरणार नाही. ती सर्व्हिस, तो कबुलीजबाब, त्या प्रार्थना - सर्व काही स्पष्ट आणि समजण्याजोगं होतं. माझ्या मनात आनंदलहरी उमटत होत्या. कारण आयुष्याच्या अर्थाचा साक्षात्कार मला होत होता. प्रत्यक्ष कम्युनिअन म्हणजे येशू ख्रिस्ताचं संस्मरण आहे, पापापासून मुक्ती मिळवून देणारं आहे, येशूच्या सर्व शिकवणुकीचा पूर्ण स्वीकार हा त्याचा अर्थ आहे, असं मी स्वत:ला सांगत होतो. हे स्पष्टीकरण कदाचित कृत्रिम असेल, पण ती कृत्रिमता तेव्हा मला जाणवली नाही. स्वत:ला नम्र करणं, स्वत:ला लहान करणं, स्वत:च्या अहंकाराचा पूर्ण विलोप करणं, स्वत:ला दूषणं देऊन त्या धर्मगुरूसमोर उभं राहणं खरंच फार आनंददायी होतं. आणि तो धर्मगुरु कोण होता—साधासुधा लाजराबुजरा असा गावचा पाद्रीबुवा. मी माझ्या आत्म्यावरचं सगळं मळभ झटकून टाकत होतो. सर्व पापांचा कबुलीजबाब देत होतो. मी आनंदाने विभोर झालो होतो. वाटत होतं, चर्चच्या प्रार्थना लिहिणारे फादर किती सरळ अंत:करणाचे आणि अहंकारमुक्त होते. जे पूर्वी होऊन गेले आणि जे आज आहेत अशा श्रद्धाळू अंत:करणाच्या माणसांशी मी एकरूप होतोय या भावनेनं माझ्या मनात आनंदतरंग उमटत होते. पण जेव्हा मी वेदीपाशी प्रवेश केला आणि जेव्हा त्या पाद्र्यानं म्हणायला

लावलं की मी जे गिळणार आहे ते खरंच मांस आणि रक्त आहे तेव्हा माझ्या हृदयात विषादाची आणि वेदनेची सणक उठली. तो नुसताच खोटेपणा नव्हता तर ज्या कोणाला श्रद्धा म्हणजे काय याची जराही ओळख नाही त्याने केलेली ही क्रूर मागणी होती.

मी आता म्हणू शकतो की ती क्रूर मागणी होती. पण त्यावेळी माझ्या मनात तो विचार आला नव्हता. त्यावेळी मला फक्त वाईट वाटलं. मला तरुणपणी वाटायचं की आयुष्य हे सरळस्वच्छ आहे. पण आता ते तारुण्य आणि ती स्थिती निघून गेली होती. आता मी श्रद्धेकडे परतलो होतो. कारण श्रद्धेशिवाय या जगात विनाश सोडून काही नाहीये, अगदी काहीही नाहीये याची खात्री मला पटली होती. म्हणून काही झालं तरी श्रद्धा मला सोडायची नव्हती. म्हणून मी सगळ्याला होकार देत होतो. आणि माझ्या मनात एक भावना उमटली. तिने मला हे सगळं सहन करायचं बळ दिलं. ही भावना होती स्वत:ला सान करून घेण्याची आणि विनम्रतेची. मी स्वत:ला अगदी लहान केलं आणि जास्त अश्रद्ध भावना मनात न आणता ते रक्त आणि मांस गिळून टाकलं. मनात इच्छा केली की साऱ्यावर मी विश्वास ठेवावा. परंतु घाव तर बसलाच होता. आणि त्या गोष्टीची पुनरावृत्ती नको म्हणून परत कधी मी तिकडे गेलो नाही.

चर्चची सर्व क्रियाकर्मं मी करत होतो. मला अजूनही वाटत होतं की मी चर्चचे जे धर्मविधी पाळतोय ते मला सत्याकडे घेऊन जाताहेत. पण त्या काळात एक गोष्ट घडली. आता ते सगळं मला समजतंय पण तेव्हा मात्र ती गोष्ट मला विचित्र वाटली होती.

मी यात्रेला निघालेल्या एका अशिक्षित शेतकऱ्याचं बोलणं ऐकत होतो. देव, श्रद्धा, आयुष्य अशा विषयांवर तो बोलत होता. तेव्हा मला श्रद्धा म्हणजे काय याचा खराखुरा साक्षात्कार झाला. आता मी साध्याभोळ्या माणसांकडे जाऊ लागलो. त्यांच्याशी आयुष्याबद्दल, श्रद्धेबद्दल बोलू लागलो आणि मला सत्य अधिकाधिक समजू लागलं. मी जेव्हा 'Lives of Holy Men' (पवित्र माणसांचं जीवन) ही पुस्तकं वाचली तेव्हाही मला हाच अनुभव आला. ती पुस्तकं माझी आवडती पुस्तकं बनली. त्यातले चमत्कार बाजूला ठेवले आणि त्या चमत्काराच्या गोष्टी म्हणजे विचार समजण्यासाठी तयार केलेल्या परीकथा आहेत असं मानलं तर ती पुस्तकं खरंच उद्बोधक होती. त्यांनी मला आयुष्याचा अर्थ उलगडून दाखवला. त्या पुस्तकांमध्ये ग्रेट मॅकारियसची

जीवनकहाणी होती, गौतम बुद्धाची गोष्ट होती, सेंट जॉन ख्रिसोस्टोमचा उपदेश होता. त्या पुस्तकांमध्ये नाना कहाण्या होत्या. विहिरीत प्रवास करणाऱ्याची कहाणी होती. एका यात्रेकरूला सोनं सापडली अशी कहाणी होती. पब्लिकन पीटरची कहाणी होती. त्या पुस्तकांमध्ये हुतात्म्यांच्या कहाण्या होत्या. मरणाला जीवन थांबवता येत नाही हाच संदेश त्या कथा देत होत्या. त्या पुस्तकांमध्ये अडाणी, मूर्ख माणसांच्याही कथा होत्या. त्या माणसांना चर्चची शिकवणूक जराही माहिती नव्हती, तरी त्यांना मुक्ती लाभली होती.

पण जेव्हा मी श्रद्धाळूंमध्ये जे विद्वान होते त्यांना भेटायचो, त्यांची पुस्तकं वाचायचो तेव्हा मला स्वत:विषयी शंका यायला सुरुवात व्हायची. माझा स्वत:शी जोरजोरात वादविवाद सुरू व्हायचा. मला समजलं की या लोकांच्या सांगण्याचा मी जितक्या जास्त गंभीरपणे विचार करू लागतो तितका मी सत्यापासून जास्त दूर जातो आणि खोल दरीत कोसळतो.

□

१५

मला या शेतकऱ्यांचा, त्यांच्या अशिक्षितपणाचा, त्यांच्या अडाणीपणाचा किती वेळा हेवा वाटला म्हणून सांगू! धर्मग्रंथातील अनेक वचनं मला उघडउघड विसंगतीने भरलेली आणि हास्यास्पद वाटत. पण त्यांच्या दृष्टीने ती खरीखुरी असत. ही साधीभोळी माणसं ती सर्व विधानं जशीच्या तशी मान्य करत आणि त्यातून प्रतीत होणाऱ्या सत्यावर विश्वास ठेवत-ज्या सत्यावर मीही विश्वास ठेवीत होतो. पण त्यांचा निरागस आनंद मला शक्य नव्हता. कारण मला स्पष्ट दिसत होतं की इथं खोटेपणा खरेपणात मिसळून गेला आहे आणि या स्वरूपात मी तो स्वीकारू शकत नाही.

अशा अवस्थेत मी तीन वर्षं होतो. बाप्तिस्मा घेण्यापूर्वी ख्रिस्ती धर्माची तत्त्वं शिकणाऱ्या माणसाप्रमाणे पहिल्यापहिल्यांदा जेव्हा मी सत्याचं अंधुक दर्शन घेत होतो, मला जे सुस्पष्ट आहे असं वाटत होतं ते दुरून पाहत होतो तेव्हा ही विसंगती मला फारशी टोचत नव्हती. जेव्हा एखादी गोष्ट मला कळायची नाही तेव्हा मी म्हणायचो, 'ही माझी चूक आहे. मी पापी आहे.' पण जेव्हा मी सत्याच्या अधिकाधिक जवळ जाऊ लागलो, सत्य हाच जसजसा माझ्या जीवनाचा पाया होऊ लागला तसतशा या विसंगती मला जास्त जास्त टोचू लागल्या. त्या सहन करणं मला जास्तजास्त कठीण होऊ लागलं. जे मला खरंच कळत नाही ते आणि जे कळून घेण्यासाठी स्वत:शी खोटेपणा करावा लागतो ते यांच्यामधली रेषा आता जास्त जास्त स्पष्ट होऊ लागली.

माझ्या मनात येणाऱ्या शंका आणि माझ्या मनाला होणाऱ्या वेदना या साऱ्या सहन करून मी ऑर्थोडॉक्स चर्चला चिकटून राहिलो. पण आयुष्याबद्दल

जे प्रश्न उभे राहिले होते त्यांचा सोक्षमोक्ष लावणं आवश्यक होतं. या प्रश्नांबाबत ऑर्थोडॉक्स चर्चची भूमिका मला मान्य नव्हती. ज्या श्रद्धेनुसार मी माझं जीवन व्यतीत करत होतो त्याच्याविरूद्ध चर्चची शिकवण होती. शेवटी मला ऑर्थोडॉक्सीबरोबरचं कम्युनिअन नाकारावं लागलं. हे प्रश्न असे होते : एक म्हणजे ऑर्थोडॉक्स इस्टर्न चर्चचे बाकीच्या चर्चेसबरोबर तसंच कॅथॉलिकांशी आणि तथाकथित सेक्टोरियनांशी असणारे संबंध. त्यावेळी मला धर्माबद्दल गोडी वाटत असल्यामुळे माझा कॅथॉलिक, प्रोटेस्टंट, ओल्ड बिलिव्हर, मोलोकन (हा सॅक्रॅमेंट आणि धार्मिक कर्मकांड न मानणारा पंथ आहे) अशा विविध पंथांच्या लोकांशी संबंध आला होता. आणि त्यांच्यामध्येही उच्च नैतिक मूल्यांचं पालन करणारे खरेखुरे श्रद्धाळू मला भेटले होते. मला त्यांच्याशी बंधुभाव स्थापन करायचा होता. आणि काय घडलं? जी शिकवण सर्व माणसांना एका श्रद्धेने आणि प्रेमाने एकत्र येण्यास शिकवते त्याच शिकवणुकीचे मोठेमोठे प्रवक्ते मला सांगत होते की ही सर्व माणसं खोटं जीवन जगताहेत, सैतानाच्या मोहाने त्यांना आयुष्याची शक्ती दिलेली आहे आणि फक्त आम्हीच सत्य जाणतो. मला दिसलं की ऑर्थोडॉक्स चर्च बाकीच्या पंथाच्या लोकांना पाखंडी मानत होतं. उलट कॅथॉलिक आणि इतर पंथ ऑर्थोडॉक्सवाल्यांना पाखंडी मानत होते. ऑर्थोडॉक्स पंथीयांच्या मनात, जरी ते उघडपणे दाखवत नसले तरी, त्यांच्या ऑर्थोडॉक्स आचारविधींचं आणि पूजा-प्रार्थनांचं जे तंतोतंत पालन करत नाहीत त्यांच्याविषयी शत्रुत्वभावना होती. खरंतर ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. कारण तू खोटा आहेस आणि मी खरा आहे असं म्हणणं ही जगातली सर्वात क्रूर गोष्ट आहे. दुसरं म्हणजे प्रत्येक माणूस आपल्या मुलाबाळांवर आणि बांधवांवर प्रेम करत असतो. साहजिकच एखादा माणूस त्याच्या मुलाबाळांना आणि बांधवांना चुकीच्या पंथावर विश्वास ठेवायला लावून विकृत बनवत आहे असं त्याला दिसलं तर त्याच्याबद्दल त्याला शत्रुत्वभावनाच वाटणार. आपल्या धर्मपंथाचं तो जितकं ज्ञान प्राप्त करून घेईल तितका त्याचा दुसऱ्या धर्मपंथाच्या माणसांबद्दलचा दुस्वास वाढतच जाईल. प्रेमाने माणसं एकत्र येणं हीच गोष्ट सत्य आहे असं मी मानतो. त्यामुळे मला हे स्पष्ट झालं की धर्मशास्त्रं नेमकी उलटी गोष्ट करत आहेत. खरं तर धर्माने माणसं एकत्र आणली पाहिजेत. पण धर्मच उलट माणसांमाणसांमध्ये शत्रुभावना उत्पन्न करत आहे.

आपणच काय ते खरे आणि दुसरे सगळे खोटे असं समजण्याचा मोह आमच्यासारख्या सुशिक्षितांना खेड्यापाड्यांमध्ये उघड दिसून येतो. कारण तिथे

अनेक धर्मपंथांचे लोक राहतात. प्रत्येक धर्मपंथाचे लोक दुसऱ्याकडे तिरस्काराने, आढ्यतेने, दुस्वासाने पाहत असतात. कॅथॉलिक पंथीय ऑर्थोडॉक्स आणि प्रोटेस्टंटशी, प्रोटेस्टंट पंथीय कॅथॉलिक आणि ऑर्थोडॉक्सांशी, प्रोटेस्टंट तसंच कॅथॉलिक हे सारे ओल्ड-बिलिव्हर, पाइकोवाईट आणि शेकर पंथीयांशी आणि ते सारे ह्यांच्याशी केवळ शत्रुत्वभावनेनं वागत असतात. या साऱ्यांचं असं उघडउघड एकमेकांचा दुस्वास करणं मला काही केल्या समजायचं नाही. मला वाटायचं की दोन जण जर आपलंच म्हणणं सत्य आहे असं मानत असतील तर कोणा एकाकडे पूर्ण सत्य असणं शक्य नाही आणि आपल्याकडेच पूर्ण सत्य आहे अशी श्रद्धाही बाळगणं योग्य नाही. हे इतकं साधंसरळ आहे आणि तरीही ते लोकांना का कळत नाही? या गोष्टीचं दुसरं काही स्पष्टीकरण आहे का याचा मी शोध घेतला. या बाबतीत जेवढं काही मिळेल ते मी वाचलं. विचारणं शक्य होतं त्यांना विचारलं. पण कोणीही मला नीट स्पष्टीकरण दिलं नाही. त्यांचं म्हणणं काहीसं असं होतं की आम्हाला पक्कं ठाऊकाय की आमचा पंथच सर्वश्रेष्ठ आहे. म्हणजे हे इतकं सरळ आहे की ते सिद्ध करण्याची जरूरीच नाहीये. तशी मुळी आमची श्रद्धाच आहे. आणि त्यामुळे दुसरे जे आहेत ते अर्थातच चुकीच्या मार्गावरून चालत आहेत. आम्ही फारफार तर त्यांच्यासाठी देवाकडं प्रार्थना करू शकतो. मी आर्किमॅनड्राईट्सना विचारलं, बिशपना विचारलं, ओल्डर्सना विचारलं, मॉन्क्सना विचारलं पण कोणीही मला नीट स्पष्टीकरण दिलं नाही. पण एका माणसाने मला नीट समजावून सांगितलं. इतकं व्यवस्थित समजावलं की नंतर मी याबाबत कोणाला विचारलं नाही. मी त्याला विचारलं की जेव्हा एखादा श्रद्धा नसलेला माणूस श्रद्धेकडे वळतो (आणि आज आमचा सर्व तरूणवर्ग असा वळण्याच्या मनस्थितीत आहे.) तेव्हा त्याच्यासमोर जो प्रश्न सर्वप्रथम उभा राहतो तो असा की ल्युथेरियन किंवा कॅथॉलिक धर्मपंथांमध्ये सत्य का नाही? सत्य फक्त ऑर्थोडॉक्स पंथामध्येच आहे असं का? तो तरुण शिकलेला असतो. त्यामुळे त्याला माहीत असतं की प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक पंथीयसुद्धा ऑर्थोडॉक्स पंथीयांसारखेच 'सत्य केवळ आमच्या जवळच आहे' असं निक्षून सांगताहेत. ऐतिहासिक पुरावा प्रत्येक पंथीयाने आपल्या बाजूने वळवून घेतलेला असतो आणि तो अपुरा असतो. मी म्हणालो, आपण जर आपली शिकवण उच्च नैतिक मूल्यांवर आधारित ठेवली तर हे सर्व भेद नाहीसे होतील. खऱ्या श्रद्धाळू माणसाच्या बाबतीत हेच घडतं आणि त्याच्यासाठी कुठलाही भेद उरत नाहीत. आपण ओल्ड बिलिव्हर या

पंथीयाशी जसं वागतो तसंच आपण इतरांशी वागू शकणार नाही का? ओल्ड बिलिव्हर लोकांचा क्रॉस वेगळ्या आकाराचा असतो, त्यांची स्तुतिस्तोत्रं वेगळी असतात आणि पवित्र वेदीभोवती ते वेगळ्या तऱ्हेने प्रदक्षिण घालतात. आपण म्हणतो ठीक आहे. तुम्ही नायसीन क्रीड मानता. तुम्ही सात आज्ञा मानता. आम्हीसुद्धा नायसीन क्रीड मानतो. सात आज्ञा मानतो. आपण या गोष्टी जास्त महत्त्वाच्या मानू. बाकी गोष्टी तुम्ही तुमच्या मताप्रमाणे करा. श्रद्धेसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या किरकोळ, अनावश्यक गोष्टींपेक्षा वर ठेवल्यामुळे आपण एकोप्याने राहिलो आहोत. आपण असंच कॅथॉलिकांबरोबर वागू शकत नाही का? आपण त्यांना असं सांगू शकतो - तुमची या या गोष्टींवर श्रद्धा आहे. या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आणि फिलिऑक क्लॉज किंवा पोप यांच्याबद्दल तुम्हाला जे काही करायचं आहे ते तुम्ही आनंदाने करा. तसंच प्रोटेस्टंटांबद्दल. महत्त्वाच्या गोष्टींसाठी आपण एकत्र येऊया. बाकी तपशीलाच्या गोष्टी जो तो आपल्या पंथानुसार करील.

माझ्याशी बोलणाऱ्या त्या माणसाला माझे विचार पटले. तो म्हणाला की, पण जर अशा सवलती दिल्या तर आपल्या धर्मगुरूंना आपल्या पूर्वजांच्या श्रद्धा सोडून दिल्याचा दोष लागेल. शिवाय त्यामुळे धर्मामध्ये फूट पडेल. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेला ग्रीकोरशियन ऑर्थोडॉक्स धर्मपंथ त्याच्या अत्यंत शुद्ध स्वरूपात जपणं हे आपल्या धर्मगुरूंचं काम आहे.

आणि मला सगळं काही समजलं. मला श्रद्धा हवी होती. अशी श्रद्धा की जी आयुष्याला उभारी देते. तर ते धर्मगुरू आणि इतर सर्वजण, काहीजणांच्या नजरेत भरण्यासाठी विशिष्ट मानवी कर्तव्यं पार पाडत होते. ही मानवी कर्तव्यं ते मानवी मार्गाने पार पाडत होते. जरी ते त्यांच्या दृष्टीने चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या त्यांच्या बांधवांसाठी वरवर कोरडी सहानुभूती दाखवत असले, त्या दयाघनाकडे त्या आपल्या बांधवांसाठी मोठमोठ्याने प्रार्थना करत असले तरी त्यांचा असा विश्वास होता की मानवी हेतू साध्य करण्यासाठी हिंसा ही आवश्यक असते. मानवी हेतू साध्य करण्यासाठी अशी हिंसा पूर्वीही वापरली गेली आहे, आजही वापरली जात आहे आणि पुढेही वापरली जाईल. जर दोन धर्मांपैकी प्रत्येक जण स्वत:लाच खरा मानत असेल आणि दुसऱ्याला खोटा मानत असेल तर दुसऱ्या धर्मातील माणसांना आपल्या धर्मात आणण्यासाठी आपल्या धर्माचे गोडवे गाणार, आपल्या धर्माचं तत्त्वज्ञान घोषित करणार. जर चर्चच्या कोवळ्या मुलांना चुकीची शिकवण दिली तर ते चर्च ती कशी सहन करणार? कारण चर्च म्हणतं की आपल्याजवळच

सत्य आहे. मग चर्च त्या दुसऱ्या धर्माची किंवा पंथाची पुस्तकं जाळणार. आणि जो माणूस चर्चच्या लेकरांना श्रद्धेच्या बाबतीत चुकीच्या रस्त्यावर नेतोय त्याचं काय करायचं? त्याचं डोकं उडवायचं की त्याला तुरुंगात घालायचं? (ऑर्थोडॉक्स पंथीयांच्या मते तर त्या माणसाला त्याच्या चुकीच्या तत्त्वांच्या पुस्तकांच्या ढिगाला आग लावून त्यात जाळून ठार मारावा.) झार अलेक्सी मिख्यालोविचच्या काळात अशा माणसांना खुंट्याला बांधून जाळून मारत. ती त्यावेळची सर्वात कडक शिक्षा होती. आता आपल्या काळातही सर्वात कडक शिक्षा अशा लोकांना देतात. ती म्हणजे एकान्त कोठडीत डांबून ठेवणं.

धर्माच्या नावाखाली काय काय घडलंय, काय काय चालतंय याचा मी शोध घेतला आणि मी भयचकित झालो. मग मी जवळजवळ संपूर्णपणे शपथपूर्वक ऑर्थोडॉक्सीचा त्याग केला.

दुसरा मुद्दा होता तो म्हणजे युद्ध आणि नरसंहाराबाबत चर्चचा दृष्टिकोन. त्या वेळी रशिया युद्धात गुंतला होता. ख्रिश्चन प्रेमाच्या नावाखाली रशियन लोक त्यांच्याच बांधवांना ठार करत होते. कोणत्याही श्रद्धेनुसार दुसऱ्याला ठार करणं ही अत्यंत पापी गोष्ट आहे. श्रद्धेला हरताळ फासणारी ही घटना आहे. तरी आमच्या फौजांना विजय मिळावा म्हणून चर्चमधून प्रार्थना म्हणण्यात येत होत्या. श्रद्धेचे गुरू (म्हणजे चर्चचे धर्मगुरू) असं समजत होते की असं दुसऱ्यांना ठार करणं हे श्रद्धेनुसार कर्तव्य ठरतं. म्हणजे युद्धात जी सर्वात घृणास्पद अशी खुनाखुनी चालते ती धर्माचा, श्रद्धेचा परिपाक आहे, असं या श्रद्धेच्या ठेकेदारांचं म्हणणं होतं. आणि युद्धानंतर जे अशांततेचं वातावरण होतं त्यात असहाय, भरकटलेल्या तरुणांना ठार करण्यात आलं त्याला चर्चच्या सर्व प्रतिष्ठितांची, धर्मगुरूंची संमती होती. जी माणसं ख्रिश्चॅनिटीचा सकाळ-संध्याकाळ उद्घोष करत होती त्यांचं हे वर्तन पाहून मला शिसारी आली.

□

१६

आणि मी ज्या धर्मात प्रवेश केला होता त्यातील सर्वच गोष्टी काही सत्य नाहीत, याची मला पूर्ण खात्री पटली. पूर्वी मी असं म्हटलं असतं की की धर्मातील सर्वच गोष्टी असत्य आहेत. पण आता मी तसं म्हणू शकत नव्हतो. सर्व माणसांना सत्याचं काही एक विशिष्ट ज्ञान होतं. कारण त्याशिवाय ती जगूच शकली नसती. शिवाय ते ज्ञान मलाही मिळू शकणारं होतं. कारण ते मला जाणवलं होतं आणि त्यानुसार मी जगलो होतो. पण आता मला शंका उरली नव्हती की धर्मामध्ये खोटेपणासुद्धा आहे. पूर्वी ज्या गोष्टींचा मला तिरस्कार वाटायचा त्या गोष्टी मला नव्या प्रकाशात दिसायला लागल्या. मी पाहिलं की शेतकऱ्यांच्या जीवनात धर्मापासून आलेला खोटेपणा हा छोट्या प्रमाणात आहे आणि चर्चच्या प्रतिनिधींमध्ये हा खोटेपणा मोठ्या प्रमाणावर आहे हे खरं असलं तरी खोटेपणा हा खोटेपणाच. शेतकऱ्यांच्या जीवनातही खऱ्याबरोबर खोट्याचं मिश्रण झालेलं आहे.

पण हा खरेपणा आणि खोटेपणा आला कुठून? खरेपणा आणि खोटेपणा हे दोन्ही तथाकथित पवित्र परंपरेमध्ये आणि धर्मग्रंथांमध्येच आहे. चर्च नामक जी संस्था आहे त्यांनीच हा खरेपणा आणि खोटेपणा लोकांपर्यंत पोचवला आहे.

आणि मला आवडो न आवडो, मला हे धार्मिक लिखाण आणि परंपरा याचा अभ्यास करणं आणि शोध घेणं भाग पडलं. आतापर्यंत मी असा शोध घ्यायला घाबरत होतो, पण आता ते अपरिहार्य झालं.

आणि मी धर्मशास्त्राचा अभ्यास करू लागलो. एकेकाळी हाच धर्मशास्त्राचा अभ्यास 'पूर्णपणे निरुपयोगी' म्हणून मी तिरस्काराने बाजूला सारला होता.

त्या वेळी धर्मशास्त्र म्हणजे अनावश्यक विसंगतींची मालिका असं मला वाटायचं. तेव्हा मला सर्वत्र जीवनाचा उत्फुल्ल आविष्कार प्रतीत होत होता. तो आविष्कार मला स्पष्ट आणि अर्थपूर्ण वाटायचा. पण आता जी गोष्ट मला अर्थशून्य वाटेल ती मी फेकून देऊ इच्छित होतो, पण नक्की कुठं जावं, कुठला आधार घ्यावा हे मला कळत नव्हतं. ह्या धार्मिक शिकवणीवर धार्मिक तत्त्वं आधारित आहेत किंवा किमानपक्षी जीवनाचा जो अर्थ मला सापडला तो ह्या धार्मिक शिकवणीशी न तोडता येण्यासारखा निगडीत आहे. ही धार्मिक शिकवण माझ्या निग्रही आणि अनुभवी मनाला वेडीवाकडी वाटत असली तरी त्या शिकवणीतच मुक्तीची आशा आहे. ती शिकवण अतिशय काळजीपूर्वक, पूर्ण ध्यान देऊन अभ्यासली पाहिजे, समजून घेतली पाहिजे. विज्ञानाची तत्त्वं आपण समजून घेतो त्या अर्थाने नव्हे - छे... छे... मला त्या अर्थाने समजून घेणं नकोय. कारण हे समजून घेणं म्हणजे श्रद्धा समजून घेणं आहे. मी प्रत्येक गोष्टीचं स्पष्टीकरण मागणार नाही. प्रत्येक गोष्टीचं स्पष्टीकरण हे प्रत्येक गोष्टीचा आरंभ जसा अनंतात असतो तसं अनंतात आहे, याचं मला भान आहे. जे अपरिहार्यपणे अज्ञेय राहतं ते काय आहे हे जाणून घ्यायचा मार्ग मला हवा आहे. जे अज्ञेय आहे ते अज्ञेयच राहणार हे मी मान्य करतो. याचा अर्थ असा नव्हे की माझ्या बुद्धीच्या मागण्या चुकीच्या आहेत. (त्या बरोबरच आहेत. त्या नसतील तर मी काहीच जाणून घेऊ शकणार नाही.) पण माझ्या बुद्धीच्या मर्यादा मी जाणतो. जे जे म्हणून काही अज्ञेय आहे ते स्वभावतःच अज्ञेय आहे आणि काहीतरी कृत्रिम, लहरी बंधनामुळे मला तसे ते मानावे लागत नाहीये हे मला स्पष्ट झालं पाहिजे. मी ते तावूनसुलाखून घेईन.

या धार्मिक शिकवणीमध्ये सत्य आहे यात वादच नाही. पण त्याचबरोबर त्यात असत्य आहे हीही गोष्ट मान्य करावी लागेल. मला सत्य काय आणि असत्य काय हे शोधावं लागेल आणि असत्यापासून सत्य वेगळं करावं लागेल. हे काम आता मी सुरू करीन. या धार्मिक शिकवणीमध्ये काय खोटेपणा आहे, काय खरेपणा आहे आणि एकूण मी काय निष्कर्ष काढले हा भाग या कामाचा पुढचा भाग आहे. जर तो सांगण्याजोगा असेल आणि कोणाला ऐकावासा वाटला तर पुढे केव्हातरी छापला जाईल.

१८७९

हे लिखाण मी साधारण तीन वर्षांपूर्वी केलं आणि आता ते छापलं

जाईल. काही दिवसांपूर्वी जेव्हा मी ते वाचत होतो आणि त्याचं संस्करण करत होतो तेव्हा माझ्या मनात परत ते विचार घोळू लागले. त्या काळातल्या त्या भावना मी परत अनुभवू लागलो आणि मला एक स्वप्न पडलं. मी त्या काळात जो अनुभव घेतला आणि जो मी या लिखाणात मांडला आहे तो अवघा अनुभव अर्करूपात या स्वप्नात मी पाहिला. त्यामुळे ज्यांना माझ्याविषयी सहानुभूती आहे, जे मला समजू शकले आहेत अशांना मी जे काही लांबलचकपणे मांडलं आहे ते हे स्वप्न सांगितल्यामुळे जास्त सुस्पष्ट होईल. त्या मांडणीला केंद्र येईल. शिवाय त्याची ताजी पुनरावृत्ती होईल. म्हणून मी हे स्वप्न सांगत आहे. स्वप्न असं होतं :

मी एका पलंगावर झोपलो होतो. उताणा. फारसा आरामात नव्हतो की आखडलेला नव्हतो. आता माझ्या मनात विचार आला की मी कसा झोपलो आहे आणि कशावर झोपलो आहे. हा प्रश्न तोपर्यंत मला पडला नव्हता. मी पलंगाचं निरीक्षण केलं. तेव्हा मला समजलं की या पलंगाच्या बाजूंना वळलेले दोर बांधलेले आहे. माझे पाय एका आधारावर टेकले होते. पोटऱ्या दुसऱ्या आधारावर होत्या. एकाएकी माझे पाय दुखू लागले. माझ्या लक्षात होतं की ते आधार हलू शकतात. मी तळव्यानं एका आधाराला दूर ढकललं. मला वाटलं होतं की त्यामुळे मला जास्त आराम मिळेल. पण तो आधार जरा जास्तच लांब सरकला. आता मला वाटलं की तो जवळ आणावा. म्हणून मी पाय हलवले तर माझ्या पोटऱ्यांच्या खालचा आधार बाजूला झाला. आता माझे पाय हवेत लोंबकळत होते. मला वाटलं की आपण जर अख्खं हललो तर स्वतःला नीट स्थितीमध्ये आणू शकतो आणि हे तर अगदी सोपं आहे. म्हणून मी तसं केलं तर माझ्या पायाखालचे सर्व आधार सुटले आणि एकमेकांत गुंतले. आता मी माझ्या पाठीच्या वरच्या भागाकडच्या आधारावर होतो. माझे पाय तसेच हवेत लोंबकळत होते. मी चमत्कारिक स्थितीत सापडलो होतो. मी घाबराघुबरा झालो. स्वतःला विचारलं (इतका वेळ ते मला सुचलं नव्हतं) की मी कुठं आहे आणि कशावर झोपलो आहे. मी आजूबाजूला पाहायला सुरुवात केली. मी पडेन की काय अशी मला भीती वाटत होती म्हणून मी खाली पाहिलं. तेव्हा माझ्या लक्षात आलं की मी एवढ्या उंचीवर आहे की मोठमोठे मनोरे किंवा अगदी डोंगरसुद्धा या उंचीच्या खालीच आहेत. एका कल्पनातीत उंचीवर मी आहे.

मी खाली काय पाहतोय हे मला कळत नव्हतं. खोल खोल, ज्याला तळ नाही असं ते काहीतरी होतं. मी खाली ओढला जात होतो का? काही

कळत नव्हतं. माझं हृदय चिमटल्यासारखं झालं होतं. भीतीने मी अर्धमेला झालो होतो. परत खाली पाहणं भयानक होतं. मला वाटत होतं की आता माझा शेवटचा आधार सुटणार आणि खालच्या खोल गर्तेत पडून मी मरणार. म्हणून मी खाली बघत नव्हतो. पण न बघणं आणखी वाईट होतं. कारण एकसारखा मनात तोच विचार होता- अखेरचा आधार सुटला तर? आणि मला वाटू लागलं की अखेरचा आधार हळूहळू सुटतोय. माझी पाठ हळूहळू खालीखाली येतेय. आणखी एकच क्षण आणि मी पडणार. आणि मला एकदम वाटलं की हे खरं नसणार. केवळ स्वप्न असणार. जागा हो. मी स्वत:ला उठवण्याचा प्रयत्न केला. पण मी उठू शकलो नाही. 'आता काय करायचं? मी काय करावं?' मी स्वत:ला विचारलं. आणि मी वर पाहिलं. वर अनंत अवकाश होता. मी त्या अनंत, असीम अवकाशाकडे पाहिलं आणि खालच्या खोलखोल अवकाशाला विसरण्याचा प्रयत्न केला. आणि मी तो खरंच विसरलो. खालची असीमता मला घाबरवून टाकत होती. मी तिच्यापासून दूर जायला बघत होतो. वरची असीमता मला बळ देत होती. मी तिच्याकडे आकर्षित होत होतो. माझ्या पाठीला असणाऱ्या शेवटच्या आधारावर मी होतो. मी लोंबकळत होतो. पण तो आधार अजून निसटलेला नव्हता. मी फक्त वर बघायची खोटी की माझी भीती पळून जात होती. स्वप्नामध्ये घडतं त्याप्रमाणे एक आवाज आला. 'याच्याकडे लक्ष दे. हे ते आहे.' आणि मी आता वरच्या अनंत अवकाशाकडे जास्तजास्त पाहू लागलो. हळूहळू मी शांत होऊ लागलो. मला आठवतंय हे सर्व घडलेलं आणि कसंकसं घडलं हेही आठवतंय. मी माझे पाय कसे हलवले, मी कसा लोंबकळायला लागलो, माझा थरकाप कसा उडाला आणि शेवटी वरच्या अनंत अवकाशाकडे पाहिल्यामुळे मी कसा भीतिमुक्त झालो... हो, मला सर्व काही नीट आठवतंय. आणि मी विचारलं, ठीकाय. पण आता मी तसाच लोंबकळतोय ना? मी इकडेतिकडे फारसं बघितलं नाही. पण मला जाणवलं की मी एका आधारावर आहे. हेपण मला जाणवलं की मी अशा स्थितीत आहे की आता मी पडणार नाहीये. मी नीट सुस्थितीत आहे. मी स्वत:ला विचारलं की माझा तोल कसा सांभाळला गेलाय? मी इकडेतिकडे पाहिलं. चाचपडलं. माझ्या लक्षात आलं की माझ्या पाठीच्या बरोबर मधे एक आधार आहे आणि जेव्हा मी वर पाहतो तेव्हा मी अगदी सुरक्षित आणि सुस्थित असतो. त्या आधारानेच मी मघापासून सुरक्षित राहिलो होतो. आणि मग स्वप्नामध्ये घडतं त्याप्रमाणे मी या पलंगाच्या रचनेचा विचार केला. मला समजलं की ही रचना अगदी नैसर्गिक, सहजसुलभ

आणि खात्रीची आहे. पण जो जागा आहे त्याला ती निरर्थक वाटेल. ती रचना मला आधी कशी कळली नाही याचंच मला आश्चर्य वाटलं. हेसुद्धा स्वप्नातच. ती रचना अशी होती - माझ्या डोक्याखाली एक खांब होता. तो खांब काठीसारखा बारीक पण अगदी भलाभक्कम होता. त्याला काही आधार नव्हता. त्या खांबापासून एक दोरीचं वेटोळं लोंबत होतं. जर एखादा माणूस आपला मध्यभाग त्या वेटोळ्यात येईल अशा प्रकारे झोपला आणि त्याने वर पाहिले तर त्याच्याबाबतीत पडण्याचा काही प्रश्नच नव्हता. खरंच तो प्रकार फार साधा होता आणि तरी फार कौशल्याचा होता. हे सारं मला स्पष्ट झालं. आता माझं मन आनंदाने आणि शांतीने भरून गेलं. मला असं वाटलं की जणू काही कुणीतरी मला सांगितलं, 'हे तू लक्षात ठेव.'

...आणि मी जागा झालो.

१८८२

□